जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, ■ शुक्रवार २९ मे २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०




# उष्ण लाटेनंतर अवकाळीची एन्ट्री

## पुढील चार दिवस हवामान बदलणार

**नागपूर/प्रतिनिधी :** संपूर्ण मे महिन्यात उन्हाने होरपळलेल्या विदर्भातील नागरिकांना शुक्रवारपासून पुढचे चार दिवस अवकाळीच्या पावसाळी वातावरणाचा गारवा मिळण्याची दिलासादायक स्थिती निर्माण झाली आहे. बहुतेक जिल्ह्यात गुरुवारीही आकाशात ढगांची गर्दी झाली होती व उन्हाचे चटके काहीसे कमी झाले, पण ढगाळ वातावरणातही तापमान



उसळले आणि नागरिकांना उकाड्याचा त्रास सोसावाच लागला.

साधारणत: १० मे पासून नागपूरसहविदर्भात सूर्याने मुक्काम ठोकल्याची स्थिती होती. बहुतेक जिल्ह्यात तापमान ४४ अंशाच्या वर होते. सुरुवातीला अकोला, अमरावती व वर्धा देशातील सर्वाधिक उष्ण शहरांच्या यादीत टॉपवर होते व नंतर वर्धा, नागपूर, ब्रम्हपुरी, चंद्रपूरने उच्चांकी गाठली. ब्रम्हपुरीचे तापमान ४७ अंशाच्या पुढे गेले व दोन दिवस ते देशात सर्वात उष्ण शहर म्हणून नोंदविले गेले. नागपूरचेही तापमान गेल्या आठवडाभरापासून ४५ ते ४६ अंशाच्या वर-खाली स्थिरावले आहे. दोन दिवस लाखो लोकांच्या मोबाइलवर उष्ण लाटेचे सायरन वाजले. धक्कादायक म्हणजे बुधवार २७ मे रोजी उष्णतेच्या लाटेत तीन रेल्वे प्रवाशांसह १० जन दगावल्याची घटना घडली. ज्यामुळे उन्हाची तीव्रता ☞(पान २ वर)

# आसामनंतर महाराष्ट्रातही समान नागरी कायद्याची अंमलबजावणी होणार

## उपमुख्यमंत्री शिंदेंनी दिले संकेत

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-:** आसाममध्ये समान नागरी कायदा अर्थात 'यूसीसी' बद्दलचा निर्णय घेण्यात आला. यानंतर महाराष्ट्रातदेखील 'यूसीसी' लागू होणार का या चर्चेला गुरुवारी सुरुवात झाली. समान नागरी कायदा हे बाळासाहेब ठाकरे यांचे स्वप्न होते. ते पूर्ण होईल, असा विश्वास असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नवी दिल्लीतील पत्रकार परिषदेत सांगितले. समान नागरी कायद्याबद्दल आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांचे अभिनंदन करतो. सरकार स्थापन झाल्यानंतर तत्काळ त्यांनी समान नागरी कायद्याचा निर्णय घेतला. एक देश-एक समान कायदा असला पाहिजे, अशी शिवसेनेची सुरुवातीपासून भूमिका राहिलेली आहे, असे ते म्हणाले. बाळासाहेब ठाकरे यांचीदेखील तीच भूमिका राहिलेली आहे. नागरी कायद्यानुसार सगळ्यांना समान हक्क असले पाहिजेत, समान न्याय असला पाहिजे, ही बाळासाहेबांची भूमिका आहे. त्यामुळे एक देश-एक कायदा असला पाहिजे, ही भूमिका शिवसेनेची सुरुवातीपासून आहे. त्याचबरोबर या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीदेखील यासंबंधी अनेकवेळा उल्लेख केलेला आहे. एका देशात दोन कायदे कसे काय असू शकतात आणि त्यामुळे मला वाटते, आमची भूमिका ही सकारात्मक, स्पष्ट आणि समान नागरी कायद्याच्या




बाजूची आहे. याबाबतीमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करू, असे त्यांनी सांगितले.

बाळासाहेब ठाकरे यांची तीन स्वप्ने होती. यामध्ये अयोध्येत राम मंदिर बांधणे, कलम ३७० हटवणे आणि समान नागरी कायद्याचा समावेश होता. यापैकी दोन स्वप्ने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांनी पूर्ण केली आहेत. तिसरे स्वप्नदेखील पूर्ण होईल असा विश्वास आहे, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

समान नागरी कायद्यावरून विरोधकांवर टीका करताना एकनाथ शिंदे म्हणाले की, काही लोक याबद्दल गैरसमज पसरवतात. 'यूसीसी'मुळे काही लोकांवर अन्याय होईल, असे गैरसमज पसरवले जातात. गृहमंत्री अमित शहा यांनी याबाबतीत स्वतः स्पष्ट केले आहे की, यामध्ये कुठल्याही परिस्थितीमध्ये आदिवासी ☞(पान २ वर)

# डिझेलअभावी रुग्णवाहिका न मिळाल्याने हिंगोलीत गर्भवतीच्या पोटात अर्भक दगावले

**प्रशासनाचा निष्काळजीपणा भोवल्याचा नातेवाईकांचा आरोप**

**हिंगोली/वृत्तसंस्था- :** औंढा नागनाथ तालुक्यातील नालेगाव येथील गरोदर महिलेस वेळेवर रुग्णवाहिका मिळाली नसल्याने खासगी रुग्णवाहिकेद्वारे हिंगोलीच्या वैद्यकीय महाविद्यालयात आणले. मात्र, तेथे सिझेरियन शस्त्रक्रियेनंतर अर्भक दगावल्याचा आरोप महिलेच्या नातेवाईकांनी केला.

दरम्यान, डिझेल होते; पण चालक नसल्याने अडचण झाल्याचा दावा आरोग्य प्रशासनाने केला आहे. रुग्णाचे नातेवाईक आणि आरोग्य प्रशासनाच्या दाव्या-प्रतिदाव्यांमध्ये निष्पाप अर्भकाचा मात्र नाहक बळी गेल्याने संतापाची भावना व्यक्त होऊ लागली आहे.

नालेगाव येथील महिला मनीषा इंगळे यांची प्राथमिक आरोग्य केंद्रात तपासणी केल्यानंतर तेथील डॉक्टरांनी त्यांना पुढील उपचारांसाठी हिंगोलीच्या सरकारी रुग्णालयात नेण्याचा सल्ला दिला. त्यानुसार त्यांच्या नातेवाईकांनी तातडीने १०२ क्रमांकावर संपर्क साधून रुग्णवाहिकेची मागणी केली. मात्र, त्यांना डिझेल नसल्याचे सांगण्यात आले. १०८




क्रमांकावरूनही तातडीने प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे महिलेस खासगी रुग्णवाहिकेद्वारे हिंगोलीच्या सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे नातेवाईकांनी सांगितले.

हिंगोलीच्या सरकारी रुग्णालयात तपासणी केल्यानंतर मनीषा यांच्या गर्भाशयात प्रमाणापेक्षा जास्त पाणी असल्याने तातडीने सिझेरियन शस्त्रक्रिया करण्यात आली. मात्र, यामध्ये अर्भक दगावले. केवळ डिझेलअभावी वेळेवर रुग्णवाहिका न मिळाल्याने अर्भक दगावल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे.

**सविस्तर चौकशी करणार**

या अर्भक मृत्यूची सविस्तर चौकशी संबंधित ठिकाणी वैद्यकीय पथक पाठवून केली जाणारआहे. त्यानंतर पुढील निर्णय घेतला जाईल, अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके यांनी दिली.

# स्वस्त मद्य महागणार; विदेशी स्वस्त होणार

## नवीन उत्पादन शुल्क धोरण राज्यात लागू :

**अंकली /वृत्तसंस्था-** मद्यातील अल्कोहोलच्या प्रमाणावर आधारित कर आकारणी करणारे नवीन उत्पादन शुल्क धोरण राज्यात अधिकृतपणे



लागू करण्यात आले आहे. या निर्णयामुळे सर्वसामान्यांकडून सेवन केल्या जाणाऱ्या स्वस्त मद्याच्या किंमतीत २० ते ३० टक्क्यांपर्यंत वाढ होणार असून प्रीमियम आणि लक्झरी विदेशी मद्यांच्या किमतीत लक्षणीय घट होण्याची शक्यता आहे.

राज्यात अनेक दशकांपासून अस्तित्वात असलेली 'मोठ्या लिटर'वर आधारित करप्रणाली रद्द करुन सरकारने ११ मेपासून देशातील पहिले 'अल्कोहोल इन बेव्हरेज' उत्पादन शुल्क धोरण लागू केले आहे. या नवीन धोरणामुळे उत्पादन शुल्क महसुलात वाढ ☞(पान २ वर)

### भाववाढ अशी

पहिला स्लॅब : ८० रुपयांवरुन ९५ रुपयांपर्यंत
दुसरा स्लॅब : ९५ रुपयांवरुन ११० रुपयांपर्यंत
तिसरा स्लॅब : १२० रुपयांवरुन १३५ रुपयांपर्यंत
चौथा स्लॅब : १५० रुपयांवरुन १७० रुपयांपर्यंत

### स्थानिक उद्योगांवर परिणामाची भीती

सरकारच्या नवीन उत्पादन शुल्क धोरणाचा स्थानिक मद्य उद्योगांवर नकारात्मक परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपन्या किंमतीतील चढ-उतार सहज पेलू शकतात. पण, कमी बजेट आणि स्वस्त मद्य उत्पादनावर अवलंबून असलेल्या छोट्या स्थानिक उद्योगांना मोठा फटका बसू शकतो, अशी भीती केबीडीएच्या सदस्यांनी व्यक्त केली आहे.

# गझलचे जादूगार डॉ. बशीर बद्र काळाच्या पडद्याआड

**भोपाळ; वृत्तसंस्था :** आंतरराष्ट्रीय कीर्तीचे थोर उर्दू कवी, लेखक आणि पद्मश्री पुरस्कार विजेते डॉ. बशीर बद्र यांचे गुरुवारी भोपाळमधील त्यांच्या निवासस्थानी निधन झाले. आधुनिक उर्दू गझलचा एक सर्वात प्रभावी आणि बुलंद आवाज मानले जाणारे बशीर बद्र



९१ वर्षांचे होते. गेल्या काही वर्षांपासून ते दीर्घ आजारपण आणि स्मृतिभ्रंशाने त्रस्त होते.


बशीर बद्र यांच्या गझलांमधील शब्दांचा साधेपणा आणि मनाला भिडणारी भावनिक खोली यामुळे त्यांनी आधुनिक गझल प्रकाराला एका वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवले. सर्वसामान्य माणसाला समजेल अशा सोप्या भाषेत त्यांनी गझल लिहिली. त्यांनी १९७२ मध्ये (शिमला कराराच्या पार्श्वभूमीवर) लिहिलेला एक प्रसिद्ध शेर 'दुश्मनी जम कर करो...' हा आजही भारत-पाकिस्तान फाळणीच्या वेदना आणि संघर्षाचे प्रतिबिंब म्हणून ओळखला जातो. ☞(पान २ वर)

# १ जूनपासून समुद्रात मासेमारीला बंदी, नियमांचे उल्लंघन केल्यास कारवाई

**ठाणे /वृत्तसंस्था- :** समुद्रातील मासळीच्या साठ्याचे जतन करण्यासाठी आणि पावसाळ्यातील वादळी हवामानापासून मच्छीमारांच्या जीविताचे रक्षण करण्यासाठी शासनाने यंदा १ जून ते ३१ जुलै या कालावधीत पावसाळी मासेमारीवर अधिकृत बंदी जाहीर केली आहे. ठाणे-पालघर जिल्ह्याचे मत्स्यव्यवसाय सहाय्यक आयुक्त (तांत्रिक) दिनेश पाटील यांनी या संदर्भातील अधिकृत माहिती दिली आहे.

या दोन महिन्यांच्या कालावधीत समुद्रातील माशांचा प्रजोत्पादन काळ असतो, त्यामुळे या बंदीमुळे मासळीच्या बीज निर्मिती प्रक्रियेला मोठा वाव मिळून समुद्रातील मासळीचा साठा वाढण्यास मदत होते.

मत्स्यव्यवसाय विभागाने




दिलेल्या आदेशानुसार, ही पावसाळी मासेमारी बंदी सर्व प्रकारच्या यंत्रचलित आणि यांत्रिक नौकांना पूर्णपणे लागू राहील. मात्र, पारंपरिक पद्धतीने मासेमारी करणाऱ्या बिगर-यंत्रचलित नौकांना या बंदीतून सवलत देण्यात आली आहे. सध्या समुद्रात गेलेल्या सर्व यांत्रिक नौकांनी ३१ मे पूर्वीच आपापल्या बंदरांमध्ये परतणे बंधनकारक करण्यात आले असून, १ जून किंवा त्यानंतर कोणत्याही परिस्थितीत बंदरांवर मासे उतरवण्यास परवानगी दिली जाणार नाही. तसेच, राज्याच्या सागरी किनाऱ्यापासून १२ सागरी मैलांपर्यंतच्या क्षेत्राबाहेर खोल समुद्रात जाणाऱ्या नौकांना केंद्र शासनाचे धोरण व मार्गदर्शक सूचना लागू राहतील.

या शासकीय नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन सर्व मच्छीमार सहकारी संस्थांना करण्यात आले आहे. जर बंदीच्या काळात कोणतीही यांत्रिक नौका बेकायदेशीरपणे मासेमारी करताना आढळली, तर महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियमांतर्गत ती नौका, त्यावरील उपसाधने आणि पकडलेली मासळी जप्त करून संबंधित मालकावर अत्यंत कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. इतकेच नव्हे तर, बंदीच्या काळात समुद्रात जाऊन अपघात ☞(पान २ वर)




# गडचिरोली-छत्तीसगडच्या सीमावर्ती जंगलातून माओवाद्यांचा शस्त्रनिर्मिती कारखाना उद्ध्वस्त

**पोलिसांचा घातपात करण्याच्या हेतूने जंगलात ठेवली जातात शस्त्रास्त्रे लपवून, आठवडाभरात दुसरी कारवाई**

**गडचिरोली,/वृत्तसंस्था- ::** गडचिरोली व छत्तीसगड पोलिसांनी संयुक्तरित्या कारवाई करीत गडचिरोली-छत्तीसगड राज्याच्या सीमावर्ती जंगलातून नक्षल्यांनी जंगलात सुरु केलेला शस्त्र निर्मितीचा कारखाना उद्ध्वस्त केला. पोलिसांचा घातपात करण्याच्या हेतूने नक्षलवादी जंगलात स्फोटक साहित्य आणि शस्त्रे लपवून ठेवत असते. पोलिसांचे दुर्गम भागातील नक्षलविरोधी अभियान, विविध नक्षल सप्ताह आणि निवडणुकीच्या वेळी नक्षलवादी या स्फोटकांचा वापर करीत



असत. परंतु पोलिसांनी १६ मे रोजी राबविलेल्या 'ऑपरेशन अंतिम प्रहार' अंतर्गत आत्मसमर्पण केलेल्या नक्षल्यांनी चौकशीदरम्यान गडचिरोली व छत्तीसगड राज्यातील नारायणपूर जिल्ह्यातील काकूर पोलिस ठाण्यापासून अवघ्या ७ किलोमीटर अंतरावरील जंगलात स्फोटके लपवून ठेवली असून, तेथे शस्त्रे तयार केली जातात, अशी माहिती दिली.

त्यानंतर पोलिस अधीक्षक एम.रमेश यांच्या मार्गदर्शनात २६ मे रोजी पोलिसांनी जंगलात अहेरी येथील प्राणहिता पोलिस उपमुख्यालयातील ४ पथके, बॉम्ब शोधक व नाशक विभागाची २ पथके आणि नारायणपूर येथील डीआरजीचे एक पथक त्या भागात रवाना केले.

**हे आढळले साहित्य**

दुसऱ्या दिवशी पोलिसांनी जंगलात शोध घेतला असता तेथे मोठ्या प्रमाणावर स्फोटके, शस्त्रे आणि अन्य साहित्य आढळून आले. त्यात एक इन्सास रायफल, २ सिंगल शॉट रायफल, २ बारा बोअर रायफल, एसएलआर रायफलची २ जिवंत काडतुसे, ३०३ रायफलची १२ जिवंत काडतुसे, बारा बोअर रायफलची ४ जिवंत काडतुसे, २५ किलोग्रॅम आयईडी स्फोटके, २ क्लेमोरे, ११० डिटोनेटर्स, कॉर्टेक्स वायर, पाचशेहून अधिक बीजीएल सेल, बीजीएल बनविण्याचे ☞(पान २ वर)

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# दिल्लीहुन परतताच पद्मश्री पुरस्कार राष्ट्रसंताच्या समाधीचरणी केला अर्पण

## -पद्मश्री जनार्दनपंत बोथेनी भावुक होत घेतले दर्शन

**तिवसा/प्रतिनिधीः-** भारत सरकारच्या वतीने अतिशय प्रतिष्ठेचा असलेल्या पद्मश्री पुरस्काराने सन्मानित होताच अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवा मंडळाचे सरचिटणीस जनार्दनपंत बोथे यांनी दिल्लीहुन मंगळवारी मध्यरात्री १ वाजता परतताच हा पद्मश्री पुरस्कार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या समाधीचरणी अर्पण करून भावुक होत दर्शन घेतले.

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे निजी सचिव तसेच अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवामंडळाचे सरचिटणीस जनार्दनपंत बोथे (गुरुजी) यांना भारत सरकारतर्फे प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला होता.हा पुरस्कार त्यांना २५ मे रोजी देशाच्या महामहिम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते व देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.

१९५२ च्या दशकापासून जनार्दनपंत बोथे गुरुजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज



यांच्या समवेत सेवा कार्यात सक्रियपणे सहभागी होते.राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांचा प्रसार व प्रचार अधिक व्यापक व्हावा यासाठी गुरुकुंज आश्रमाच्या माध्यमातून बोथे गुरुजींचे योगदान अत्यंत मोलाचे ठरले आहे.या संपूर्ण कार्याची दखल घेत भारत सरकारने त्यांना हा पुरस्कार प्रदान केला. या पुरस्काराबाबत प्रतिक्रिया देताना बोथे गुरुजी यांनी हा सन्मान राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या चरणी अर्पण करत, त्यांच्या विचारांवर चालणाऱ्या अखिल भारतीय गुरुदेव सेवामंडळातील सर्व सेवाभावी कार्यकर्त्यांचा हा गौरव असल्याचे नमूद केले. त्यांचे कार्य आज अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.दिल्लीहुन मंगळवारी मध्यरात्री १ वाजताचे दरम्यान ते गुरुकुंज आश्रम याठिकाणी पोहचले व त्यांनी त्याचक्षणी समाधीचे दर्शन घेत हा पुरस्कार समाधी चरणी अर्पण केला.त्यावेळी बोथे गुरुजी हे अतिशय भावुक झाले होते,त्यांचे डोळे अक्षरशः पाणावले होते. राष्ट्रसंताच्या समाधीस्थळी पुरस्काराबाबत प्रतिक्रिया देतांना त्यांनी सांगितले की, हा पुरस्कार अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळ अंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे विचार,कार्य तळागाळापर्यत पोहचविण्याचे काम करणाऱ्या प्रत्येक गुरुदेवभक्त,प्रचारकांचा आहे.माझ्यासारख्या छोट्या माणसाला एवढा मोठ्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले, हे खरोखर मी माझे अहोभाग्य समजतो.त्याबद्दल त्यांनी भारत सरकारचे आभार व्यक्त केले.

# ट्रॅक्टर-दुचाकीच्या धडकेत जखमी तरुणाचा मृत्यू

## मंगरूळ दस्तगीर येथील घटना

**धामणगाव रेल्वे/प्रतिनिधीः-** जळगाव-मंगरूळ दस्तगीर फाट्यावर ट्रॅक्टर व दुचाकीच्या धडकेत जखमी झालेल्या तरुणाचा उपचारादरम्यान जिल्हा सामान्य रुग्णालयात मृत्यू झाल्याची घटना बुधवारी समोर आली आहे. प्रतीक सुधीर हिवरकर (वय ३०,मंगरूळ दस्तगीर ) असे मृतक तरुणाचे नांव आहे. माहितीनुसार प्रतीक हिवरकर सोमवारी रात्री धामणगाव येथून काम संपल्यावर दुचाकीने मंगरूळ दस्तगीर येथे आपल्या गावी जात होता. त्यावेळी जळगाव फाट्यावर त्याच्या दुचाकीला ट्रॅक्टरने जोरदार धडक दिली. या धडकेत प्रतीक गंभीर जखमी



झाला. त्याला नागरिकांनी धामणगाव ग्रामीण रुग्णालयात तातडीने दाखल केले. प्रकृती गंभीर असल्यामुळे डॉक्टरांनी त्याला उपचारासाठी अमरावती रेफर केले. जिल्हा सामान्य रुग्णालयामध्ये उपचार सुरू असताना त्याची प्राणज्योत मावळली. त्याच्या मृत्यूची बातमी पसरतात मंगरूळ दस्तगीर मध्ये शोककळा पसरली आहे. पोलिसांनी घटनेसाठी जबाबदार ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# विभागीय आयुक्त कार्यालयात स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर यांना अभिवादन



**अमरावती :** स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त विभागीय आयुक्त कार्यालयात आज नायब तहसीलदार श्यामसुंदर देशमुख यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.


यावेळी अव्वल कारकुन शरद लोणारे, कामेश महाजन यांच्यासह अन्य अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनीही स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले.

# जिल्हाधिकारी कार्यालयात जयंती



**अमरावती :** स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी अधिक्षक निलेश खटके यांच्यासह अन्य अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनीही स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले.

# महानगरपालिकेत स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती



**अमरावती/प्रतिनिधीः-** स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती निमित्य गुरुवार दिनांक २८ मे, २०२६ रोजी हारार्पण कार्यक्रम अमरावती महानगरपालिकेत संपन्न झाला. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंती निमित्य महापौर श्रीचंद तेजवानी यांचे हस्ते स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे प्रतिमेस हारार्पण विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे करण्यात आले.

यावेळी अभिनेता सर्जेराव गलपट यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यावर आधारित गीत सादरीकरण केले. यावेळी महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा, स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, झोन सभापती स्वाती कुलकर्णी, नगरसेवक मिलींद बांबल, संजय तिरथकर, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त नरेंद्र वानखडे, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, प्रमोद मोहोड, भुषण खडेकार, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या वेशभुषेत सर्जेराव गलपट उपस्थित होते.

# १ व १० वरील उर्वरित

### उष्ण लाटेनंतर अवकाळीची

लक्षात येते. दरम्यान गुरुवारी सकाळपासून आकाश ढगांनी व्यापले होते. दिवसभर उन-सावल्यांचा खेळ सुरू राहिला. यात अमरावती शहरात ८ मिमी. पावसाचीही नोंद झाली. वर्धा येथेसुद्धा तुरळक सरी बरसल्या. मात्र ढगांचे आवरण तापमान रोखू शकले नाही. वर्ध्यात १.८ अंशाने पारा चढला व सर्वाधिक ४६.८ अंशाची नोंद झाली. नागपूरला सुद्धा तापमान ०.७ अंशाने उसळून ४६.४ अंशावर पोहचले. त्यामुळे उकाड्याचा त्रास जाणवत राहिला. गोंदियातसुद्धा ४६.१ अंशाची नोंद झाली. पाऊस बरसलेल्या अमरावतीकरांना उष्ण लाटेचा सामना करावा लागला. येथे तापमान ४५.२ अंश होते, जे सरासरीपेक्षा ४.३ अंशाने अधिक आहे. यासह चंद्रपूर ४५.४, गडचिरोली व अकोल्यात ४५ तापमानाची नोंद झाली.

**यामुळे आला पाऊस-** उत्तरप्रदेश ते आंध्र प्रदेशच्या समुद्र काठापर्यंत झंझावात तयार झाला आहे. दुसरीकडे उत्तर झारखंड व आसपासच्या परिसरात सायक्लोनिक सर्क्युलेशन तयार झाले आहे. याशिवाय अरबी समुद्र व बंगालच्या खाडीतही सायक्लोनिक सर्क्युलेशन तयार झाले असून या प्रभावाने मध्य भारत व विदर्भासह महाराष्ट्रात पावसाळी वातावरण तयार झाले आहे. २९ मे ते १ जूनपर्यंत विदर्भाच्या विविध भागात वादळीवारे व विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस होण्याची शक्यता आहे. या काळात तापमान ३ ते ५ अंशापर्यंत घसरेल व उन्हापासून दिलासा मिळेल.

### आसामनंतर महाराष्ट्रातही समान

समाजाचे हक्क, संस्कृती, परंपरा, चालिरीती याच्यावर कोणताही परिणाम होणार नाही. काही लोक म्हणतात की, आरक्षण जाईल; पण आरक्षण आणि समान नागरी कायदा याचा कुठेही संबंध नाही. आरक्षण हा विषय घटनेने दिलेला आहे. मी एवढेच सांगेन की, याबाबतीमध्ये आम्ही सकारात्मक आहोत, असे ते म्हणाले.

### स्वस्त मद्य महागणार

होण्याबरोबरच मद्यसेवनाचे प्रमाण कमी होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. नवीन धोरणानुसार उत्पादन शुल्काच्या पट्ट्यांची संख्या १६ वरुन ८ पर्यंत कमी करण्यात आली आहे. करप्रणाली सुलभ झाली असली तरी त्याचा थेट परिणाम स्वस्त मद्य खरेदी करणाऱ्या ग्राहकांवर होणार आहे. सर्वसामान्यांकडून मोठ्या प्रमाणावर वापरल्या जाणाऱ्या व्हिस्की, रम, ब्रँडी आणि व्होडकाच्या किंमती वाढणार आहेत. विशेषतः १८० मिली (क्वार्टर) टेट्रा पॅक व बाटल्यांच्या दरात २० ते ३० टक्क्यांनी वाढ अपेक्षित आहे.

कर्नाटक ब्रुअर्स अँड डिस्टिलर्स असोसिएशनच्या (केबीडीए) माहितीनुसार मद्याच्या पहिल्या पाच श्रेणींवरील अतिरिक्त उत्पादन शुल्कात २० ते ३० टक्क्यांनी वाढ करण्यात आली आहे. राज्याच्या एकूण उत्पादन शुल्क महसुलात या पहिल्या पाच श्रेणींचा वाटा ७० ते ७५ टक्के असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे, सर्वसामान्यांच्या पसंतीच्या स्वस्त मद्यावर अधिक कर आकारण्यात आल्याने यावरुन वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. आर्थिकदृष्ट्या सक्षम ग्राहकांसाठी प्रीमियम आणि आयातीत मद्य स्वस्त होणार आहे.

डिआजिओ, पर्नोड रिकार्ड आणि युनायटेड स्पिरिट्स यासारख्या बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या मद्यांच्या किमती १६ ते २० टक्क्यांनी कमी होण्याची शक्यता आहे. ६ ते ८ एसपीएबी अंतर्गत येणाऱ्या मद्यांवरील अतिरिक्त उत्पादन शुल्क १० ते १५ टक्क्यांनी घटविण्यात आले आहे. त्यामुळे, बहुराष्ट्रीय कंपन्यांना मोठा फायदा होणार असल्याचा आरोपही करण्यात येत आहे.

### गझलचे जादूगार

संसदेपासून ते राजकीय सभांपर्यंत अनेक दिग्गज नेत्यांनी त्यांच्या शेरो-शायरीचा आपल्या भाषणात वारंवार वापर केला आहे. १५ फेब्रुवारी १९३५ रोजी उत्तर प्रदेशातील अयोध्या येथे बशीर बद्र यांचा जन्म झाला. १९८७ मध्ये मेरठमध्ये झालेल्या भीषण जातीय दंगलीत त्यांचे घर आणि सर्वकाही जळून खाक झाले होते. या दुर्दैवी घटनेनंतर त्यांना मेरठ सोडावे लागले आणि ते मध्य प्रदेशातील भोपाळ येथे येऊन स्थायिक झाले. त्यांनी आपले उच्च शिक्षण प्रसिद्ध अलीगढ मुस्लिम युनिव्हर्सिटीमधून पूर्ण केले. पुढे १९७४ ते १९९० या काळात त्यांनी मेरठ कॉलेजमध्ये उर्दूचे प्राध्यापक म्हणून काम केले. त्यांच्या लेखनात सामाजिक समता, धर्मनिरपेक्षता आणि विविधतेत एकता या मूल्यांचा नेहमीच आग्रह असायचा. उर्दू साहित्यातील त्यांच्या अतुलनीय योगदानाबद्दल भारत सरकारने १९९९ मध्ये त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले होते.

### १ जूनपासून समुद्रात

झाल्यास अशा नौकेला शासनाकडून कोणतीही आर्थिक नुकसान भरपाई मिळणार नाही, असेही शासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे सर्व नौकामालकांनी नियमांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन मत्स्यव्यवसाय विभागाकडून करण्यात आले आहे.

### गडचिरोली-छत्तीसगडच्या सीमावर्ती

साहित्य, ७ बीजीएल लाँचर, ३ ट्यूब लाँचर, लोखंडी सळ्या २ लेथ मशिन, २ मोटर, ग्राइंडर मशिन, इन्व्हर्टर, बॅटरी, वायर बंडल, सोलर प्लेट इत्यादी साहित्य आढळून आले. पोलिसांनी स्फोटक साहित्य घटनास्थळीच नष्ट केले. मागील आठवड्यात भामरागड तालुक्यातील बिनागुंडानजीकच्या जंगलातूनही असाच शस्त्रनिर्मितीचा कारखाना पोलिसांनी उदध्वस्त केला होता. त्यानंतर पोलिसांना मिळालेलं हे दुसरं यश आहे.

### विधान परिषदेसाठी प्रवीण

विविध आघाड्यांचे कार्यकर्ता व समर्थक उपस्थित राहणार आहे. घोषणाबाजी, ढोल ताशे आणि रॅलीच्या माध्यमातून भाजपाकडून जोरदार वातावरण निर्मिती करण्यात येणार आहे. यामुळे भाजपा पदाधिकारी कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला आहे. विशेष असे की तीन महिन्या पूर्वी भारतीय जनता पार्टीमधील अंतर्गत कलह वाढला होता. पोटे यांचे नाव कटावे म्हणून राणा दाम्पत्याने मोठी फिल्डिंग लावली होती परंतु पोटे यांनी अडथळ्याची शर्यत पार केली आहे आणि भाजपाने त्यांना हिरवी झंडी दाखवली. गुरुवारी ते नामांकन अर्ज दाखल करतील. विधान परिषदेसाठी सलग दोन वेळा प्रवीण पोटे यांनी प्रतिनिधित्व केले आहे. ते तिसऱ्यांदा निवडणूक लढवत आहे. २०१२ आणि २०१८ मध्ये त्यांनी निवडणूक लढवली होती. त्यावेळेस मुख्यमंत्री फडणवीस यांच्या मंत्रिमंडळात त्यांना पालकमंत्री म्हणून जबाबदारी दिली होती. विधान परिषद निवडणुकीची घोषणा होण्यापूर्वीच प्रवीण पोटे यांनी प्रचाराला सुरुवात केली होती. अमरावती जिल्ह्यातील नगरपालिका, नगरपरिषद, महानगरपालिका सदस्यांच्या भेटीगाठी करून त्यांनी मतदारसंघ जणू पिंजून काढला होता.

### राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा धक्का

दिली, त्याबद्दल त्यांनी पक्ष नेतृत्वाचे आभार मानले असून, आपला राजीनामा स्वीकारण्यात यावा अशी विनंती केली आहे.

शुक्ला हे परतवाडा शहरातील राष्ट्रवादी काँग्रेसचे आक्रमक व सक्रिय चेहरा म्हणून ओळखले जात होते. अनेक स्थानिक प्रश्नांवर त्यांनी पक्षाची भूमिका ठामपणे मांडली होती. युवकांमध्ये त्यांचा प्रभाव मानला जात असल्याने त्यांच्या राजीनाम्यामुळे पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. विशेषतः आगामी स्थानिक राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर हा राजीनामा राष्ट्रवादी काँग्रेससाठी धक्कादायक मानला जात आहे.

दरम्यान, त्यांच्या राजीनाम्यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी, शहरातील राजकीय वातावरण तापले असून विविध तर्कवितर्कांना उधाण आले आहे. आगामी काळात अभिषेक उर्फ रिंकू शुक्ला कोणती भूमिका घेणार आणि त्यांच्या पुढील राजकीय वाटचालीचा निर्णय काय असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### अमरावतीत युवक काँग्रेसचे वाढत्या

अध्यक्ष नितिन काळे, वैभव देशमुख, संकेत कुलट, सर्वेश खांडे, आशीष यादव, संदीप शेंडे, तालुका अध्यक्ष श्रेयस बर्वे, संदीप मुंडे, अंकुश जुनघरे, आशीष शिंदे, दीपक भगत, सत्यजीत विधळे, ऋषिकेश वाढोकार, जय घोरे, प्रशांत गोरले, राहुल गाठे, अमित बेलकर, शुभम बांबल, लोकेश पडोळे, मयूर देशमुख, श्रीनेत राऊत, तुषार गायन, अभी बोंडे, धनराज अठोले, जय झाडखंडे, निखिल कटोलकर, जसबीर ठाकूर, श्रेयस तायवाडे, सूरज धूमनखेडे, अंकुश देशमुख, राहुल राठोड, आशीष चव्हाळे, ऋषिकेश जगताप, मनीष धुर्वे, मयूर खैरकर, राजेंद्र कासदेकर, पंकज अमोदे, रोशन झासकर, शुभम निंभोरकर, धीरज देशमुख, चेतन इतनारे, वेदांत केने, सुमेध खंडारे, लक्ष्मण राठोड हेमंत सूरजे ,शैलेष कासदेकर , चिंटू झाड़खंडे ,बलराम बेठेकर यांच्यासह युवक काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी केंद्र सरकारच्या जनविरोधी धोरणांविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. वाढत्या इंधन दरवाढीमुळे सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक कंबरडे मोडले असून केंद्र सरकारने तात्काळ पेट्रोल-डिझेल दर कमी करावेत, अशी मागणी युवक काँग्रेसच्या वतीने करण्यात आली

### महर्षी पब्लिक स्कूलमधील

लेनोवा कंपनीचा लॅपटॉप व पेनड्राइव्ह अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याचे त्यांनी तक्रारीत नमूद केले होते. यावरून गाडगेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

दरम्यान, या गुन्ह्याचा तपास सुरू असताना गाडगेनगर डीबी पथकाला विश्वसनीय माहिती मिळाली की, एक इसम सहकार नगर चौक परिसरात चोरीचा लॅपटॉप विक्रीसाठी घेऊन आला आहे. त्यानुसार पोलिसांनी तातडीने सापळा रचून संशयिताला पकडण्याचा प्रयत्न केला. पोलिसांची चाहूल लागताच आरोपी पळून जाण्याचा प्रयत्न करीत होता. मात्र पोलिसांनी पाठलाग करून त्याला ताब्यात घेतले. चौकशीत आरोपीने आपले नाव सुनिल सतीश परते (वय ३०, रा. निरोंगी, पोस्ट कोतलकुंड, तहसील भैसदेही, मध्यप्रदेश) असे सांगितले. तसेच महर्षी पब्लिक स्कूलमधून चोरी केल्याची कबुली दिली. आरोपीकडून एक लेनोवा कंपनीचा लॅपटॉप, सात पेनड्राइव्ह, लॅपटॉप चार्जर, माऊस, कनेक्टर व डोंगल असा एकूण ४६ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, सहाय्यक पोलीस आयुक्त कैलास पुंडकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सदर कारवाई पोउपनि. सागर ठाकरे, प्रकाश मेश्राम, निलेश जुनघरे, अमोल यादव, विनोद मालवे, आशिष ठाकरे, सिद्धार्थ शृंगारे व सचिन गौरखेडे यांनी केली.

### रहाटगांव येथे होणार ५० खाटांचे

जिल्हास्तरावर आयुष रुग्णालयाची नितांत गरज असल्याने अमरावतीच्या आमदार सुलभा खोडके यांनी शासनाकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा सुरु केला.

केंद्र सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनानुसार जिल्हास्तरावर आयुष रुग्णालयाच्या इमारती करिता साधारणतः ३ ते ४ एकर जागा असणे आवश्यक आहे. जागा निश्चित न झाल्याने अमरावती येथे आयुष रुग्णालय स्थापन करण्याला घेऊन विलंब लागत होता.अशातच आ. सुलभा खोडके यांनी जागेसंदर्भात शासन -प्रशासन स्तरावर पाठपुरावा चालू केला असता ,मौजे रहाटगांव येथे शेत सर्व्हे नं. १२१ एकुण क्षेत्र ९.५६ हे. आर पैकी १.२१ हे. आर जागा उपलब्ध असल्याने ती जागा जिल्हास्तर आयुष रुग्णालय अमरावती करिता निश्चित करण्याबाबत सूचना केली. महसूल विभागाच्या सर्व नियम व अटींनुसार जलद कामकाज करण्यात आल्याने आता अमरावती येथे ५० खाटांच्या जिल्हा आयुष रुग्णालयासाठी मौजा रहाटगांव येथे शेत सर्व्हे नं. १२१ एकुण क्षेत्र ९.५६ हे. आर पैकी १.२१ हे. आर जागा मंजूर करण्यात आली आहे.

अमरावती येथील ५० खाटांच्या जिल्हास्तरीय आयुष रुग्णालय सुरु करण्यासाठी त्याठिकाणी एकुण १,६७४.६२ स्के.मी. बांधकाम व आयुर्वेदीक वनस्पती करिता उद्यान साकारण्यात येणार आहे. तसेच पंचकर्म, क्षारसूत्र, उत्तरबस्ती, रक्तमोक्षण, अग्निकर्म, फिजिओथेरपी, प्रयोगशाळा इत्यादी सोयी सुद्धा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या संदर्भात एक चांगला कृती आराखडा तयार करून शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याची सूचना आ. सुलभा खोडके यांनी जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय अमरावती यांना केली आहे. त्यामुळे आता लवकरच अमरावती येथे ५० खाटांचे नवीन जिल्हा आयुष् रुग्णालय स्थापन होण्याचा मार्ग अधिक प्रशस्त झाला आहे.

**नागरिकांना आयुर्वेदिक आरोग्य सेवेचा लाभ -**

आयुर्वेद ही अत्यंत प्राचीन अशी औषधी चिकित्सा पद्धती आहे. अनेक दुर्मिळ व जुनाट आजारांची गुणकारी चिकित्सा ही आयुर्वेदातून शक्य असल्याचे संशोधन आहे. आजही बरेच रुग्ण आयुर्वेद औषधी चिकित्सा करीत असून ही चिकित्सा पद्धती कमी खर्चिक असल्याने रुग्णाचा याकडे विशेष कल आहे. म्हणूनच सामान्य व गरजू रुग्णांना आयुर्वेद चिकित्सेची सेवा व लाभ घेता यावा , म्हणून अमरावती येथे शासकीय आयुष रुग्णालय सुरु करण्यासाठी पाठपुरावा करण्यात आला. या संदर्भात अमरावती येथे जागेला मंजुरी मिळाली असल्याने आता लवकरच आयुष रुग्णालय स्थापन करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचा विश्वास आ. सुलभा खोडके यांनी व्यक्त केला आहे.

### नांदगावात भोगवटाधारक नियमानुकूल

नागरिकांची जागा नियमानुकूल करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. उद्घाटन नगरपंचायत चे मुख्य अधिकारी निवृत्ती भालकर यांच्या हस्ते व नगराध्यक्ष प्राप्ती मारोटकर यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. मेळाव्याला नगरसेवक प्रीती इखार, मो. साजिद प्रकाश मारोटकर, ओकार ठाकरे, प्रमोद कोहळे, तालुकाप्रमुख यांची उपस्थित होती. या मेळाव्याचे प्रास्ताविक ओकार ठाकरे, संचालन रुपेश बेहरे तर आभार मेघा बनकर यांनी केले. मेळाव्यात मुख्याधिकारी यांचे सह नगरपंचायत अधिकारी राहील अहमद, विकास सपकाळ, संजय औवत, राहुल सावळे यांचा सत्कार करण्यात आला. मेळावा यशस्वीते करिता निलेश इखार, रवी ठाकूर, गोपाल बनकर, कविता बनकर, प्रतीक्षा राऊत, नीलिमा भोयर, नीता वैश्य, जयश्री सुहागपुरे, प्रकाश ब्राह्मणवाडे, मनोज खेडकर, प्रशांत हुकरे आदींनी परिश्रम घेतले.

### मुऱ्हा देवी येथील मिनी बँकेत

ले, तेव्हा त्यांना फसवणूक झाल्याचे लक्षात आले. मात्र या प्रकरणी सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा अंजनगाव सुर्जी यांच्याकडे विचारणा केली असता, त्यांनी धक्कादायक उत्तर दिले आहे. मिनी बँक संचालकावर आमचा कोणताही अधिकार नाही, तो अधिकार मिनी बँक चालवणाऱ्या कंपनीचा आहे, असे सांगून बँकेने आपली जबाबदारी झटकली आहे. बँकेच्या या भूमिकेमुळे 'मग आम्ही विश्वास कोणावर ठेवायचा?' असा संतप्त सवाल खातेदार विचारत आहेत.

सध्या मुऱ्हा देवी येथील गुंतवणूकदारांमध्ये प्रचंड घबराट असून, पोलीस प्रशासन आणि बँकिंग लोकपालांनी या प्रकरणात तात्काळ हस्तक्षेप करून गरीब जनतेचे पैसे परत मिळवून द्यावेत, अशी मागणी शिवसेना शिंदे गटाचे शहरप्रमुख मुन्ना उर्फ योगेश इसोकार यांनी उपविभागीय पोलिस अधिकारी मनिष ठाकरे यांना निवेदन देऊन केली आहे.

**खातेदारांचे पैसे कोण देणार?**

मिनी बँक चालवणारी खाजगी कंपनी आणि मुख्य बँक यांच्यातील कराराच्या तांत्रिक बाबींमध्ये सर्वसामान्य खातेदार भरडला जात आहे. बँकेचा बोर्ड लावून व्यवसाय करायचा आणि अडचणीच्या वेळी 'आमचा संबंध नाही' म्हणायचे, हा बँकांचा पवित्रा बेकायदेशीर असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

### तारांगण नगर बगीच्यात

निपाने, प्राचार्य दिलीपसिंह खांबरे, प्राचार्य दादाराव दाभाडे यांनी सुद्धा पुष्पगुच्छ देवुन सत्कार केला.

अमरावती शहरातील तारांगण नगर बगीचा येथील बगीचा हा परिसरातील नागरिकांसाठी विरंगुळा, भेटीगाठी व सामाजिक संवादाचे महत्त्वाचे ठिकाण आहे. या बगीच्यात दररोज मोठ्या संख्येने ज्येष्ठ पुरुष, महिला तसेच महिला मंडळातील सदस्य एकत्र येत असतात. मात्र, सदर ठिकाणी बसण्यासाठी पुरेशी व्यवस्था नसल्याने तसेच उन्हाळा व पावसापासून संरक्षणासाठी शेड नसल्याने नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. यामुळे बगीच्यामध्ये एक सुंदर वाटिका उभारण्यात यावी, त्यावर मजबूत शेडची व्यवस्था करण्यात यावी, जेणेकरून अंदाजे २० ते २५ वृद्ध नागरिक बसू शकतील, अशी परिसरातील नागरिकांची मागणी असल्याचे निवेदन व महिला मंडळासाठी हॉल बांधुन मिळण्याबाबचे निवेदन तसेच करडे नगर येथे महिला ज्येष्ठ नागरिक मंडळासाठी सामाजिक भवन देण्यासाठीचे निवेदन खासदार बळवंत वानखडे यांना दिले.

प्राचार्य दिलीपसिंह खांबरे यांनी सांगितले की शेडसह वाटिकेमुळे या परिसरातील ज्येष्ठ नागरिकांना बसण्यासाठी आरामदायी जागा उपलब्ध होईल. तसेच ज्येष्ठ महिला मंडळासाठी हॉल ची गरज आहे. याठिकाणी छोटेखानी बैठका, सामाजिक उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम आणि परिसरातील विविध मिटींग घेण्यासाठीही हे ठिकाण अत्यंत उपयुक्त ठरेल. यामुळे परिसरातील सामाजिक एकोपा अधिक वृद्धिंगत होईल आणि नागरिकांना एक सुसज्ज सार्वजनिक जागा उपलब्ध होईल. खासदार वानखडे नेहमीच जनतेच्या प्रश्नांबाबत संवेदनशील राहून विकासकामांना प्राधान्य देत आले आहेत. त्यामुळे आपण दिलेल्या निवेदनामधील मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून लवकरात लवकर योग्य ती कार्यवाही करतील अशी अपेक्षा मनोगतामधुन व्यक्त केली.

खासदार वानखडे यांनी तारांगण नगर वाशियांनी विशेषतः खांबरे परिवारांनी यथोचित सत्कार केल्याबद्दल आभार व्यक्त केले. तसेच खांबरे परिवार दर्यापूर तालुक्यातील लेहगाव रेल्वे व माझेही मुळ गाव तेच असल्याने आमचे जुने संबंध आहेत. आजपर्यंत ते जपलेले आहेत. मला दिलेल्या निवेदनामधील मागणी प्रमाणे सर्व कामे लवकरात लवकर करून देण्यात येईल,असे आश्वासन खासदार यांनी दिले.

### वादळासह अवकाळी पावसाचा

निंभा, भातकुली, गणोजादेवी, सोलर भातकुली आणि आसरा फिडरवरील वीज खांब व वाहिन्यांचे नुकसान झाले असून महावितरणचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याचा अंदाज आहे.

वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी महावितरणच्या शेकडो कर्मचाऱ्यांसह तीन कंत्राटदार एजन्सी युद्धपातळीवर कार्यरत आहेत. रात्रीच्या अंधारामुळे पेट्रोलिंग आणि दुरुस्ती कार्यात अडथळे निर्माण होत असले तरी टप्प्याटप्प्याने वीजपुरवठा सुरळीत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

मुख्य अभियंता अशोक साळुंके आणि अधीक्षक अभियंता दिपक देवहाते संपूर्ण परिस्थितीवर लक्ष ठेवून असून, वीज ग्राहकांनी या काळात संयम व सहकार्य करावे, असे आवाहन कार्यकारी अभियंता प्रफुल्ल लांडे यांनी केले आहे.

### चांगापूर परिसरातील कार्यालयामध्ये

कार्यालयातील २ लाख ४४ हजार ९०७ रोकड सुरक्षित असल्याचा फोटो काढून व्हॉट्स ॲपद्वारे समीर यांना पाठवला होता. त्यानंतर कार्यालय बंद करून सर्व कर्मचारी घरी गेले.

मात्र, दुसऱ्या दिवशी सकाळी सुमारे ६ वाजता समीर कार्यालयात पोहोचले असता, आतमध्ये सर्व साहित्य व पार्सल विस्कळीत अवस्थेत आढळले. तपासणीदरम्यान सीसीटीव्ही कॅमेऱ्याची वायर कापलेली दिसून आली. रोकड ठेवलेल्या ठिकाणी पाहणी केली असता संपूर्ण रक्कम गायब असल्याचे स्पष्ट झाले. अज्ञात चोरट्यांनी कार्यालयाचे कुलूप तोडून ही चोरी केल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. घटनेची माहिती मिळताच गाडगेनगर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला असून, परिसरातील हालचालींचा तपास सुरू आहे.

### पैसे दुप्पट करण्याचे आमिष, १९.५०

कंपनीमध्ये गुंतवणूक करण्यास प्रवृत्त केले. या कंपनीत गुंतवणूक केल्यास पैसे अल्पावधीत दुप्पट किंवा त्याहून अधिक वाढतील, असे आमिष आरोपींनी दाखविले.

पीडित महिलेने १ जानेवारी २०२४ ते २१ जानेवारी २०२५ या कालावधीत टप्प्याटप्प्याने एकूण १९.५० लाख रुपये आरोपींकडे दिले. मात्र, ठरल्याप्रमाणे परतावा न मिळाल्याने महिलेने आरोपींकडे पैशांची मागणी केली.

दरम्यान, आरोपींनी पैसे परत करण्यासाठी महिलेच्या हाती एक धनादेश दिला. परंतु संबंधित धनादेश बँकेत जमा केल्यानंतर तो वटला नसल्याचे समोर आले. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे स्पष्ट होताच महिलेने गाडगेनगर पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. बुधवार (दि.२७) मे रोजी प्राप्त झालेल्या लेखी तक्रारीच्या आधारे पोलिसांनी चारही आरोपींविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा नोंदविला असून पुढील तपास सुरू आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शुक्रवार, २९ मे २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## वान नदीच्या छाताडावर जेसीबीचा कहर!

### दानापूरमध्ये विकासाच्या नावाखाली पर्यावरणाची हत्या? ग्रामस्थ संतप्त

### उच्चस्तरीय चौकशीची मागणी

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

अकोट–अमलाखुर्द रेल्वे प्रकल्पाच्या कामासाठी दानापूर येथील वान नदीपात्रात सुरू असलेल्या बेकायदा आणि अमर्याद उत्खननामुळे संपूर्ण परिसरात संतापाची लाट उसळली आहे. विकासाच्या नावाखाली नदीचे अस्तित्व संपविण्याचा प्रकार सुरू असल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला असून, 'नदी वाचवा'चा एल्गार आता प्रशासनाच्या दारात पोहोचला आहे. जेसीबी आणि भारी यंत्रसामग्रीच्या साहाय्याने नदीच्या छाताडावर अक्षरशः घाव घातले जात असल्याचे चित्र सध्या दानापूर परिसरात पाहायला मिळत आहे.





ग्रामस्थांच्या आरोपानुसार, मंजूर मर्यादेपेक्षा अधिक खोल उत्खनन करून नदीपात्रातील नैसर्गिक मुरूम, वाळू आणि इतर सामग्री मोठ्या प्रमाणात बाहेर नेली जात आहे. एवढेच नव्हे तर नदी परिसरात काळी माती टाकून नैसर्गिक प्रवाहाशी छेडछाड केली जात असल्याचा धक्कादायक प्रकारही समोर आला आहे. यामुळे भविष्यात वान नदी कोरडी पडण्याचा धोका निर्माण झाला असून भूजल पातळी घसरणे, विहिरी आटणे आणि शेती उद्ध्वस्त होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

'हा विकास नसून पर्यावरणावर चाललेला बुलडोझर आहे,' अशा संतप्त प्रतिक्रिया ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहेत. अनेक शेतकऱ्यांनी प्रशासनावर दुर्लक्षाचा आरोप करत संबंधित कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली आहे. 'रेल्वे प्रकल्पाच्या नावाखाली नदीचे पोट फाडण्याचा अधिकार कुणी दिला?' असा थेट सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

या गंभीर प्रकाराविरोधात ग्रामपंचायत, शेतकरी आणि स्थानिक नागरिक एकत्र आले असून त्यांनी मुख्यमंत्री कार्यालय, रेल्वे मंत्री, रेल्वे बोर्ड, दक्षिण मध्य रेल्वे प्रशासन, जिल्हाधिकारी आणि तहसीलदार कार्यालयाकडे तक्रारींचा पाऊस पाडला आहे. छायाचित्रे, बातम्या आणि अन्य पुरावे जोडून संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. दोषींवर फौजदारी कारवाई करण्याची मागणीही आता जोर धरू लागली आहे.

दरम्यान, वाढता रोष पाहता वान प्रकल्प व्यवस्थापन उपविभाग, तेल्हारा यांनी या प्रकरणाची दखल घेतली आहे. अधिकृत पत्राद्वारे उद्या सकाळी ११ वाजता प्रत्यक्ष मोका पाहणी करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. मात्र, ग्रामस्थांचा प्रशासनावर अजूनही पूर्ण विश्वास बसलेला नाही. 'पाहण्या अनेक झाल्या; पण कारवाई कधी होणार?' असा सवाल आता उघडपणे विचारला जात आहे. सामाजिक कार्यकर्ते रजनीश पोटे यांनीही या प्रकारावर तीव्र संताप व्यक्त केला आहे. 'आज नदी वाचवली नाही तर उद्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागेल. विकासाच्या नावाखाली निसर्गाचा गळा घोटणाऱ्यांना जनता माफ करणार नाही,' असा इशारा त्यांनी दिला.

दानापूर परिसरात सध्या एकच चर्चा रंगली आहे — 'रेल्वे प्रकल्पासाठी नदी संपविणार का?' प्रशासनाने वेळीच कठोर पावले उचलली नाहीत तर हा प्रश्न मोठ्या जनआंदोलनात रूपांतरित होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

## करोडी फाटा–जऊळखेड–दहीहंडा फाटा रस्त्याचे काम रखडले

### शिवसेना स्टाईल आंदोलनाचा इशारा

■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट तालुक्यातील करोडी फाटा ते जऊळखेड मार्गे दहीहंडा फाटा या महत्त्वाच्या रस्त्याचे काम गेल्या पाच महिन्यांपासून अर्धवट अवस्थेत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. रस्त्याचे अवघे २५ टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित ७५ टक्के काम रखडल्याने वाहनधारकांसह ग्रामस्थांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.



या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोट येथील कार्यकारी अभियंत्यांना वेळोवेळी निवेदने देण्यात आली. मात्र, त्यानंतरही विभागाकडून कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आली नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. रस्त्याच्या कामाबाबत विचारणा केल्यास अधिकाऱ्यांकडून उडवाउडवीची उत्तरे दिली जात असल्याचीही तक्रार करण्यात आली आहे. डांबर महाग झाल्याचे तसेच टेंडर व निधी उपलब्ध नसल्याचे कारण पुढे केले जात असले, तरी कोणतीही तयारी नसताना काम सुरू करून नागरिकांची गैरसोय करण्यात आल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते तथा शिवसैनिक जीवन खवले यांनी केला आहे.

रस्त्याचे काम तातडीने सुरू न झाल्यास समस्त नागरिकांच्या वतीने सार्वजनिक बांधकाम विभागाविरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे. पुढील दोन ते चार दिवसांत कामाला सुरुवात न झाल्यास 'शिवसेना स्टाईल' आंदोलन करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

> 'करोडी फाटा ते जऊळखेड मार्गे दहीहंडा फाटा या रस्त्याचे काम अर्धवट अवस्थेत सोडण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. चार दिवसांत काम सुरू न झाल्यास सार्वजनिक बांधकाम विभाग अकोट कार्यालयाविरोधात तीव्र आंदोलन करण्यात येईल.'
>
> **जीवन खवले,**
> सामाजिक कार्यकर्ते तथा शिवसैनिक, अकोला जिल्हा

## ठेवीदारांच्या घामाच्या पैशांवर डल्ला

### गजानन नागरी पतसंस्थेच्या १६.७९ कोटी घोटाळ्याप्रकरणी दोन ताब्यात



■ प्रतिनिधी | अकोला ■

'विश्वासाने ठेवलेली आयुष्यभराची कमाई परत मिळेल का?' या प्रश्नाने शेकडो ठेवीदारांना झोप उडालेली असतानाच गजानन नागरी पतसंस्था घोटाळ्यात आर्थिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत तब्बल १६ कोटी ७९ लाख २७ हजार ९३० रुपयांच्या आर्थिक फसवणूक प्रकरणातील दोन प्रमुख संशयित आरोपींवर शिकंजा आवळला आहे. ठेवीदारांच्या विश्वासाला तडा देत कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार करणाऱ्या संस्थेच्या कारभारामुळे शहरात संतापाची लाट उसळली आहे.

डाबकी रोड परिसरातील गजानन नागरी पतसंस्थेत सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, कामगार आणि निवृत्त कर्मचाऱ्यांनी सुरक्षित गुंतवणुकीच्या आशेने मोठ्या प्रमाणावर ठेवी जमा केल्या होत्या. मात्र मुदतपूर्ती झाल्यानंतरही ठेवीदारांना त्यांचे पैसे परत न देता संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी टोलवाटोलवी सुरू ठेवली. अखेर हा प्रकार मोठ्या आर्थिक घोटाळ्यात परिवर्तित झाल्याचे उघड झाल्यानंतर आर्थिक गुन्हे शाखा सक्रिय झाली. जिल्हा विशेष लेखा परीक्षक स्मिता प्रल्हाद जाधव यांनी दिलेल्या तक्रारीनंतर पोलीस स्टेशन डाबकी रोड येथे अप. क्र. ३९६/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३१६(२), ३१६(५), ३(५) तसेच महाराष्ट्र ठेवीदार हित संरक्षण अधिनियम (MPID Act) १९९९ अंतर्गत गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपासादरम्यान संस्थेचे अध्यक्ष, व्यवस्थापक, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि संचालक मंडळाने संगनमताने ठेवीदारांचा विश्वास संपादन करून कोट्यवधी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार केल्याचे प्राथमिक चौकशीत निष्पन्न झाले. विशेष म्हणजे, अनेक ठेवीदारांना 'पैसे सुरक्षित आहेत', 'लवकरच परतावा मिळेल' अशी आश्वासने देत वेळकाढूपणा करण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी नंदकिशोर नारायण अवारे (वय ५७), व्यवसाय व्यवस्थापक, रा. गजानन नगर गल्ली नं. २, डाबकी रोड, अकोला यास आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेत अटक केली. न्यायालयाने आरोपीस दि. ०३ जून २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली असून चौकशीदरम्यान आणखी धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, दुसरा संशयित आरोपी नारायण काशिराम अवारे याची प्रकृती अस्वस्थ असल्याने त्याच्यावर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, अकोला येथे उपचार सुरू आहेत. वैद्यकीय स्थिती स्थिर झाल्यानंतर त्याचीही सखोल चौकशी करण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी सन २०२२ पासून सुरू होती. जिल्हा उपनिबंधक कार्यालयामार्फत झालेल्या तपासात आर्थिक गैरव्यवहाराचे गंभीर स्वरूप उघडकीस आले. आतापर्यंत तब्बल १८२ गुंतवणूकदारांनी तक्रारी नोंदवल्या असून फसवणुकीची रक्कम आणखी वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. अनेक ठेवीदारांनी आयुष्यभराची साठवणूक या संस्थेत गुंतवली होती. काहींनी मुलांच्या शिक्षणासाठी, तर काहींनी मुलींच्या लग्नासाठी ठेवलेली रक्कम अडकल्याने कुटुंबीय आर्थिक संकटात सापडले आहेत. 'विश्वासाच्या नावाखाली आर्थिक दरोडा' अशी संतप्त प्रतिक्रिया आता ठेवीदारांकडून उमटू लागली आहे. आरोपींनी नेमका पैसा कुठे वळवला? कोणाच्या नावावर मालमत्ता खरेदी झाली? आणखी कोणकोण या रॅकेटमध्ये सहभागी आहेत? याचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडून युद्धपातळीवर सुरू आहे. ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक व अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अनिल जुमळे आणि त्यांच्या तपास पथकाने पार पाडली. ठेवीदारांचे हित सुरक्षित ठेवण्यासाठी कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशाराही पोलिस प्रशासनाने दिला आहे.

## वाशीम जिल्ह्यात ईद उल अजहा उत्साहात साजरी !



■ प्रतिनिधी | वाशिम ■

देशभरात ईद उल अजहा सण मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येते. वाशीम जिल्ह्यात देखील हा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.या ईदची सामुहिक नमाज अदा करून मुस्लिम बाँधवानी एकमेकांना गळाभेट देत ईदच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी मोठ्या संख्येने ईदगावर मुस्लिम बांधव एकवटले होते.

संपूर्ण देशभरात मुस्लिम बांधवाचा ईद उल अजहा अर्थात बकरी ईद हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. दरम्यान वाशीम शहरासह रिसोड, मालेगांव, मंगरूळपीर, कारंजा, मानोरा तालुक्यात देखील हा सण मोठ्या उत्साहात आणि शांततेत साजरा करण्यात आला.वाशीम येथील ईदगाहवर ईद उल अजहाची सामूहिक नमाज सकाळी ९ वाजता पठण करण्यात आली. नमाज पठण केल्यावर जगात शांतता राहावी यासाठी प्रार्थना करण्यात आली. त्यानंतर मुस्लिम बांधवानी एकमेकांच्या गळाभेटी देत ईदच्या शुभेच्छा दिल्या.यावेळी मोठ्या संख्यने ईदगाहवर मुस्लिम बाँधव उपस्थित होते.दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलीस प्रशासनाकडून ईदगाहसह शहरात तगडा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

## अडगाव खुर्द–सिरसोली मार्गावर ओव्हरलोड अवजड वाहनांचा उच्छाद

### रस्त्याची झाली दुरावस्था ; कारवाई न झाल्यास 'रस्ता बंद' आंदोलनाचा ग्रामस्थांचा इशारा

■ प्रतिनिधी | अकोट ■

तालुक्यातील अडगाव खुर्द परिसरात सुरू असलेल्या गौण खनिजाच्या अवैध उत्खननामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे. नदी-नाल्यांमधून मोठ्या प्रमाणात मातीचे उत्खनन करून रात्री-अपरात्री अवजड वाहनांद्वारे वाहतूक केली जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. क्षमतेपेक्षा अधिक भार वाहून नेणाऱ्या वाहनांमुळे अडगाव खुर्द ते सिरसोली हा रस्ता अक्षरशः खिळखिळा झाला असून, ठिकठिकाणी मोठे खड्डे पडल्याने अपघातांचा धोका वाढला आहे.



> 'रेल्वे मार्गासाठी मोठ्या प्रमाणात मातीचे उत्खनन सुरू असून, क्षमतेपेक्षा अधिक भार वाहतुकीमुळे रस्त्याची मोठी हानी होत आहे. अपघाताच्या घटनांमध्ये वाढ झाली असून रात्री सुरू असलेली वाहतूक संशयास्पद आहे.'
>
> **- अमन गवई,** निवेदनकर्ते

या संदर्भात ग्रामस्थांनी २६ मे रोजी उपविभागीय अधिकारी अकोट यांना निवेदन सादर करून तातडीने कारवाईची मागणी केली. प्रशासनाने दुर्लक्ष केल्यास गौण खनिज वाहतूक करणाऱ्या वाहनांसाठी 'रस्ता बंद' आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

ग्रामस्थांच्या माहितीनुसार, अडगाव खुर्द ते सिरसोली हा सुमारे पाच किलोमीटरचा रस्ता गेल्या वर्षीच तयार करण्यात आला होता. मात्र, १० टन क्षमतेच्या या रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात ओव्हरलोड वाहतूक सुरू असल्याने रस्त्याची दुरवस्था झाली आहे. रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडले असून, वाहनांमधून माती सांडत असल्याने दुचाकीस्वारांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रेल्वे मार्गाच्या बांधकामासाठी या मार्गावरून मोठ्या प्रमाणात मातीची वाहतूक होत असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, रात्रीच्या वेळी सुरू असलेली ही वाहतूक नियमबाह्य व परवानगीविना होत असल्याचा संशय ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. प्रशासनाने तातडीने उत्खनन स्थळाची पाहणी करून अवैध उत्खनन व ओव्हरलोड वाहतुकीवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या निवेदनावर अमन गवई, प्रफुल लायडे, अनिल घोंगे, वैभव बुरंगे, अनिकेत गवई, शेषराव गवई यांच्यासह बहुसंख्य ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## 'सत्याचा विजय!' – काजळेश्वरच्या सरपंचांची अपात्रता रद्द

### विरोधकांच्या आरोपांना मंत्रालयाचा दणका

**कारंजा (लाड) :** कारंजा तालुक्यातील काजळेश्वर ग्रामपंचायतीचे सरपंच नितीन विष्णू उपाध्ये यांना अखेर ग्रामविकास मंत्रालयाकडून मोठा दिलासा मिळाला असून, त्यांच्या अपात्रतेचा आदेश राज्य शासनाने रद्दबातल ठरवला आहे. अमरावती विभागाच्या अपर आयुक्तांनी दिलेला अपात्रतेचा निर्णय ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी अंतिम सुनावणीनंतर रद्द केल्याने गावाच्या राजकीय वर्तुळात मोठी चर्चा रंगली आहे. विरोधकांनी केलेल्या तक्रारीनंतर निर्माण झालेला राजकीय संघर्ष आता मंत्रालयाच्या निर्णयामुळे नव्या वळणावर पोहोचला आहे. काजळेश्वर ग्रामपंचायतीमध्ये सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत आयुर्वेदिक दवाखान्याची आवारभिंत, पोचमार्ग तसेच ड्रेनेज दुरुस्तीची विविध विकासकामे मंजूर करण्यात आली होती. या कामांमध्ये प्रशासकीय आणि आर्थिक अनियमितता झाल्याचा आरोप करत विरोधी गटाच्या ज्योती गणेशपुरे यांनी तक्रार दाखल केली होती. विशेषतः ई-निविदा प्रक्रियेचे उल्लंघन झाल्याचा मुद्दा पुढे करत या प्रकरणाची चौकशी मागण्यात आली होती. या तक्रारीची दखल घेत अमरावती विभागाच्या अपर आयुक्तांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ३९(१) अंतर्गत सरपंच नितीन उपाध्ये यांना दोषी ठरवत १३ ऑक्टोबर २०२५ रोजी अपात्र घोषित केले होते. या निर्णयामुळे तालुक्याच्या राजकीय वातावरणात मोठी खळबळ उडाली होती. विरोधकांनी या कारवाईचे स्वागत केले होते, तर सरपंच समर्थकांनी हा निर्णय राजकीय दबावातून घेतल्याचा आरोप केला होता.



## मालेगाव शहरातील मुख्य रस्त्यासह चौकात सीसीटीव्ही लावण्याची गरज

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

शहराचा वाढता व्याप तसेच वाढते गुन्हे तसेच अनुसुचित घटनांना आळा बसण्यासाठी शहरातील मुख्य चौकासह मुख्य मार्गावर ठिकठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याची नितांत गरज असून यासाठी नगरपंचायत प्रशासनाने व पोलीस प्रशासनाने पुढाकार घेऊन उच्च दर्जाचे सीसीटीव्ही कॅमेरे लावणे गरजेचे झाले आहे. मालेगाव पोलीस स्टेशनच्या वतीने जुन्या बस स्थानकावर पोलीस स्टेशन समोर लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यामुळे मागील महिन्यात जुने बस स्थानकावर सीसीटीव्ही कॅमेऱ्यामुळे मुख्य रस्त्यावर अल्पवयीन मुले दुचाकी ट्रिपल सीट अतिवेगाने चालविणे तसेच विविध दुकानासमोर दुचाकी, चारचाकी वाहने बेशिस्तपणे उभे करणे, गळ्यातील मंगळसूत्र तोडून पळविणे किंवा पोलीस असल्याची बतावणी करून नागरिकांना लुटणे अशा बऱ्याच गुन्ह्यांना आळा बसू शकतो किंवा असे झाल्यास सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या मदतीने त्याचा तपास लागू शकतो. त्यामुळे शहरातील अकोला फाटा, जोगदंड हॉस्पिटल, शिव चौक, शेलू फाटा, तहसील चौक, नवीन बसस्थानक, लहुजी पुतळा चौक, इत्यादी ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावणे गरजेचे आहे.

## राज्यात लाळखुरकत लसीकरण मोहिमेची जय्यत तयारी

### १ कोटी १९ लाख लस मात्रा उपलब्ध होणार

■ प्रतिनिधी | वाशिम ■

राज्यातील पशुधनाला लाळखुरकत (FMD) रोगापासून सुरक्षित ठेवण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने लसीकरण फेरी-९ ची व्यापक तयारी सुरू केली आहे. या मोहिमेसाठी मे महिनाअखेरीस तब्बल १ कोटी १९ लाख लस मात्रा राज्याला उपलब्ध होणार असून, लसींचा सुरक्षित साठा व सुरळीत वितरणासाठी विभागाने नियोजनाला वेग दिला आहे.

लसींच्या मोठ्या साठवणुकीसाठी राज्यात नव्याने २० 'वॉक-इन कोल्ड-रूम' उभारण्यात आल्या आहेत. प्रत्येक नवीन शीतगृहामध्ये सुमारे ३ लाख लस मात्रा सुरक्षितपणे साठवण्याची क्षमता असून त्यामुळे राज्याची एकूण शीतसाखळी क्षमता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. याशिवाय, पूर्वीपासून कार्यरत असलेली शीतगृहेही पूर्ण क्षमतेने वापरात राहणार आहेत.



राज्यात आतापर्यंत लाळखुरकत लसीकरणाच्या ८ फेऱ्या यशस्वीपणे राबविण्यात आल्या आहेत. सातत्यपूर्ण आणि प्रभावी लसीकरणामुळे गत काही वर्षांत राज्यात लाळखुरकत रोगाचा कोणताही उद्रेक आढळून आलेला नाही. देशातील ९ राज्यांमध्ये महाराष्ट्राचा लाळखुरकत रोगमुक्त पट्टा निर्माण करण्यासाठी समावेश करण्यात आला असून, सलग दोन वर्षे रोगप्रादुर्भाव न आढळल्यास राज्याला 'लाळखुरकत रोगमुक्त' दर्जा प्राप्त होण्याची शक्यता आहे. हा दर्जा मिळाल्यानंतर राज्यात उत्पादित होणाऱ्या दूध, मांस आणि अंडी यांसारख्या पशुजन्य उत्पादनांच्या निर्यातीस मोठी चालना मिळणार आहे.

केंद्र शासनाच्या मानक कार्यप्रणालीनुसार लसीकरणाची ८ वी फेरी पूर्ण करण्यात आली असून, ९ व्या फेरीसाठी शीतसाखळी मूल्यांकन, जनजागृती तसेच खाजगी लसीकरणकर्त्यांची नियुक्ती यासंदर्भातील कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

पशुचिकित्सालय स्तरावरील तसेच सर्व शीतगृहांमधील उपलब्ध साठवणूक क्षमतेची जिल्हानिहाय अचूक माहिती तातडीने सादर करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. प्रत्येक जिल्ह्याला आवश्यकतेनुसार पुरेसा लससाठा उपलब्ध व्हावा आणि वितरण प्रक्रिया सुलभ व्हावी यासाठी महत्त्वपूर्ण आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. माहे ऑगस्ट २०२६ पासून प्रत्यक्ष लसीकरण मोहिमेला प्रारंभ करण्याचे नियोजन विभागामार्फत करण्यात येत आहे. असे पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १८१ ■ शुक्रवार, २९ मे २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# तीन मिनिटांच्या वादळाने सेलूचा थरकाप

## मान्सूनपूर्व पावसाचा जबर तडाखा; बैलासह ३०० कोंबड्यांचा मृत्यू

### घरांचे प्रचंड नुकसान

**सेलू जनमाध्यम :** आभाळ काळवंडलं आणि काही क्षणांतच वादळाने रौद्ररूप धारण केलं. गुरुवारी दुपारी सेलू तालुक्यात आलेल्या अवघ्या तीन मिनिटांच्या वादळाने शहरासह ग्रामीण भाग अक्षरशः हादरून गेला. वादळी वाऱ्यासह झालेल्या मान्सूनपूर्व पावसाने अनेक घरांचे छप्पर उडवले, झाडे उन्मळून पाडली, वीज यंत्रणा कोलमडून टाकली तर शेतकरी आणि व्यापाऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान केले. या अचानक आलेल्या संकटामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

गुरुवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास अचानक हवामानात बदल झाला. प्रचंड वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यासह मुसळधार पावसाने काही मिनिटांतच थैमान घातले. सेलू शहरातील विकास चौक, कोथीवाडा, आठवडी बाजार परिसरात वादळाचा सर्वाधिक फटका बसला. रस्त्यालगतच्या पानटपऱ्या कोसळल्या, अनेक दुकानांचे नुकसान झाले तर घरांवरील टिनपत्रे अक्षरशः हवेत उडून गेली. घोराड येथील सोनिया नगरात तर धक्कादायक प्रकार







घडला. घराबाहेर ठेवलेला लोखंडी पलंग प्रचंड वाऱ्यामुळे हवेत उडून थेट विजेच्या खांबावरील तारांमध्ये जाऊन अडकला. हा प्रकार पाहून नागरिकांची भीतीने गाळण उडाली.

असे वादळ यापूर्वी कधीच पाहिले नव्हते, अशा प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करीत होते. वादळामुळे घोराड येथील शेतकरी देवराव राऊत यांच्या शेतात झाडाखाली बांधून ठेवलेल्या बैलजोडीजवळ वीज कोसळली. यात एका बैलाचा जागीच मृत्यू झाला. ऐन खरीप हंगामाच्या तोंडावर बैल दगावल्याने शेतकऱ्यावर मोठे आर्थिक संकट ओढावले आहे. सुदैवाने जवळ लोकवस्ती असूनही अन्य जीवितहानी झाली नाही.



याच वादळात घोराड येथील उमेश वरटकर यांच्या कुक्कुटपालन केंद्रावरील शेड कोसळले. शेडखाली दबून तब्बल ३०० कोंबड्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे कुक्कुटपालकाचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. दरम्यान, वादळामुळे अनेक झाडे रस्त्यावर कोसळली. आर्वी-वर्धा मार्गावरील एक भलेमोठे झाड रस्त्यावर पडल्याने काही काळ वाहतूक ठप्प झाली.

दुचाकी व चारचाकी वाहनधारकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. पंचायत समिती परिसरातील वृक्ष कोसळून विजेच्या तारा तुटल्या तर पोलीस ठाण्यासमोरील विद्युत रोहित्रावर मोठी फांदी कोसळल्याने वीजपुरवठा विस्कळीत झाला. अनेक भागांतील विजेचे पोल वाकल्याने संपूर्ण परिसर काही काळ अंधारात गेला.

ग्रामीण रुग्णालयाच्या प्रवेशद्वारावर मोठे झाड कोसळल्याने रुग्ण व नागरिकांची धावपळ उडाली. अनेक शेतांमधील केळी बागांचेही मोठे नुकसान झाल्याचे सांगण्यात येत आहे. पहिल्याच पावसात नगरपंचायत प्रशासनाच्या कारभाराची पोलखोल झाली. शहरातील नाल्या तुंबल्याने सांडपाणी थेट रस्त्यावर आले. त्यामुळे नागरिकांनी प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला. वादळानंतर शहरातील रस्त्यांवर झाडांच्या फांद्यांचा अक्षरशः खच पडल्याचे चित्र दिसून आले.

# शेकापूर बाईत रेती माफियांचा जल्लोष!

## -नदीपात्रात दिवसाढवळ्या रेती उत्खनन; प्रशासनाचे 'मौनव्रत' संशयाच्या भोवऱ्यात

### बोट, पोकलँडच्या सहाय्याने हजारो ब्रास रेतीचा उपसा; बंदीपूर्वी साठेबाजीचा काळाबाजार तेजीत

**वर्धा जनमाध्यम :** हिंगणघाट तालुक्यातील शेकापूर बाई परिसरात रेती माफियांनी अक्षरशः हैदोस घातला असून नदीपात्राचे उघडपणे ओरबाडणे सुरू आहे. बोट, पोकलँड आणि जेसीबीच्या सहाय्याने दिवस-रात्र रेतीचा उपसा सुरू असताना तालुका प्रशासन मात्र संशयास्पद शांतता बाळगून असल्याने नेमकं कुणाच्या आशीर्वादाने सुरू आहे हा काळा धंदा असा प्रश्न नागरिक विचारू लागले आहेत.

९ जूनपासून मान्सून कालावधीतील रेती उपशावर बंदी लागू होणार असल्याने रेती माफियांनी आतापासूनच नदीपात्रावर तुटून पडल्याचे चित्र आहे. बंदी काळात चढ्या दराने विक्री करून लाखो रुपयांची कमाई करण्यासाठी हजारो ब्रास रेतीचा साठा केला जात असल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, नदीपात्रात थेट बोट उतरवून ४० फुट बूम असलेल्या पोकलँडच्या सहाय्याने उपसा केला जात आहे. हा प्रकार इतक्या बिनधास्तपणे सुरू आहे की कायद्यालाच जणू खुलं आव्हान देण्यात येत आहे.

उपसा केलेली रेती शेकापूर बाई परिसरातच मोठ्या प्रमाणात नियमबाह्यरीत्या साठवली जात



पर्यावरणाची चिंता कुणालाच नसल्याने निसर्गप्रेमींमध्ये संताप उसळला आहे.

दरम्यान, जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः पुढाकार घेत तातडीने कारवाई करावी, रेती माफियांचे 'आर्थिक साम्राज्य' उद्ध्वस्त करावे आणि संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करावी, अशी जोरदार मागणी आता नागरिकांतून होत आहे. अन्यथा मान्सूनपूर्व काळातच शेकापूर बाईचे नदीपात्र रेती



असून त्यातील निम्म्याहून अधिक रेतीची आधीच विल्हेवाट लावण्यात आल्याची चर्चा आहे. परवानगीपेक्षा अधिक रेती उपसा करून शासनाच्या महसुलाला कोट्यवधींचा चुना लावला जात असताना महसूल विभाग, खनिकर्म विभाग आणि स्थानिक प्रशासन मात्र हातावर हात धरून बसल्याचे चित्र संतापजनक आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, हा संपूर्ण प्रकार रात्रंदिवस सुरू असतानाही संबंधित अधिकारी घटनास्थळी साधी पाहणीसुद्धा करत नाहीत. त्यामुळे अधिकाऱ्यांचे डोळे झाकले आहेत की खिसे भरले आहेत अशी दबक्या आवाजातील चर्चा आता उघडपणे होऊ लागली आहे. नदीपात्र उद्ध्वस्त होत असताना माफियांच्या तावडीत पूर्णपणे उद्ध्वस्त होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

### ईटीएस मोजणी करा, रेती घोटाळ्याचे पितळ उघड

शेकापूर बाई येथील नदीपात्रातून नेमका किती रेती उपसा झाला, किती रेती नियमबाह्यरीत्या साठवली गेली आणि शासनाला किती महसुलाचा फटका बसला, यासाठी तातडीने ईटीएस मोजणी करण्याची मागणी होत आहे. ईटीएस सर्वेक्षण झाल्यास हजारो ब्रास रेतीच्या काळ्या व्यवहाराचे 'काळे गणित' बाहेर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# वर्धा काँग्रेसमध्ये 'पॉवर पॉलिटिक्स'चा तमाशा

## शेंडे गटानंतर, कांबळे गटाचे शक्तिप्रदर्शन फुस्स; ऐनवेळी कार्यक्रम पुढे ढकलला

**वर्धा जनमाध्यम :** जिल्हा काँग्रेसमधील गटबाजी आता उघडपणे रस्त्यावर उतरू लागली असून, कोण मोठा याची स्पर्धाच पक्षात रंगली आहे. २२ मे रोजी युवक काँग्रेसच्या माध्यमातून शेंडे गटाने मोठे शक्तिप्रदर्शन करत आपली ताकद दाखवण्याचा प्रयत्न केला होता. त्याच अनुषंगाने कांबळे गटाने आज २८ मे रोजी युवक काँग्रेसचे शक्तिप्रदर्शन आयोजित केले होते. मात्र ऐनवेळी हा कार्यक्रम पुढे ढकलण्यात आल्याने काँग्रेसमधील अंतर्गत संघर्ष पुन्हा चव्हाट्यावर आला आहे.

जिल्ह्यात काँग्रेसचे संघटन बळकट करण्यापेक्षा नेत्यांमध्ये स्वतःचे वर्चस्व सिद्ध करण्याचीच चढाओढ सुरू असल्याचे चित्र आहे. कार्यकर्त्यांची गर्दी, बॅनरबाजी, शक्तीप्रदर्शन आणि वरिष्ठ नेत्यांचे लक्ष वेधण्याची धडपड यामुळे काँग्रेसमध्ये सध्या जनतेचे प्रश्न की नेत्यांचा अहंकार असा प्रश्न उपस्थित होत आहे.





विशेष म्हणजे, शेंडे गटाने मार्च महिन्यात युवक काँग्रेसच्या माध्यमातून मोठा शो ऑफ करत आपले राजकीय वजन दाखवले होते. त्यानंतर कांबळे गटानेही आपली ताकद दाखवण्यासाठी स्वतंत्र शक्तिप्रदर्शनाची जोरदार तयारी केली होती. जिल्ह्यातील अनेक कार्यकर्त्यांना एकत्र करण्यासाठी हालचालीही सुरू होत्या. मात्र आजचा कार्यक्रम अचानक पुढे ढकलण्यात आल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. उपस्थितीचा अंदाज, अंतर्गत विसंवाद की वरिष्ठांचा दबाव? यावर आता काँग्रेस वर्तुळात जोरदार चर्चा रंगली आहे. सामान्य कार्यकर्त्यांमध्ये मात्र या गटबाजीबद्दल तीव्र नाराजी दिसून येत आहे. जनतेचे प्रश्न सोडून नेते स्वतःची ताकद मोजण्यात व्यस्त आहेत, अशी संतप्त प्रतिक्रिया काही कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसमध्ये सुरू असलेली ही 'शक्तिप्रदर्शनाची स्पर्धा' पक्षासाठी घातक ठरणार का, असा प्रश्न आता उपस्थित होऊ लागला आहे. वर्ध्यात काँग्रेसची संघटना मजबूत करण्याऐवजी गटबाजीचे राजकारण अधिकच तीव्र होत असल्याचे चित्र सध्या दिसत आहे.

### काळजाला भिडणारी भेट

# अपघातग्रस्त चिमुकलीच्या डोळ्यांत अश्रू, खासदार अमर काळेंचे डोळेही पाणावले

**हिंगणघाट/जांगोना जनमाध्यम :** राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वर सगुणा फॅक्टरीजवळ घडलेल्या भीषण अपघाताने कुर्ला (ता. समुद्रपूर) येथील वानखेडे कुटुंब अक्षरशः उद्ध्वस्त झाले. या दुर्घटनेत गजानन वानखेडे, पल्लवी वानखेडे आणि सहा वर्षीय आरोही वानखेडे यांचा जागीच मृत्यू झाला. या हृदयद्रावक घटनेनंतर संपूर्ण हिंगणघाट परिसरात शोककळा पसरली असून गावागावांत हळहळ व्यक्त होत आहे.

या कुटुंबातील जुळी दुसरी मुलगी आर्या मात्र सुदैवाने जांगोना येथे आजोळी असल्याने वाचली.



अपघाताची माहिती मिळताच खासदार अमर काळे यांनी जांगोना येथे धाव घेत वानखेडे कुटुंबीयांची भेट घेतली आणि त्यांचे सांत्वन केले. राजू काकडे यांच्या निवासस्थानी झालेल्या या भेटीत वातावरण अत्यंत भावनिक झाले होते. सहा वर्षीय आर्या जेव्हा समोर आली, तेव्हा ती निरागसपणे उभी होती. आई-वडील आणि जुळ्या बहिणीच्या मृत्यूचे वास्तव समजण्याच्या पलीकडे असलेल्या त्या चिमुकलीकडे पाहून उपस्थितांचेही डोळे पाणावले. खासदार अमर काळे यांनाही क्षणभर काय बोलावे हे सुचले नाही. त्यांनी आर्याला जवळ घेत तिच्या डोक्यावरून मायेने हात फिरवत केवळ मुक सांत्वन दिले.

यानंतर खासदारांनी तत्काळ प्रशासनाशी संपर्क साधून अपघातग्रस्त कुटुंबाला सर्व शासकीय मदत, नुकसानभरपाई आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून तातडीने मदत देण्याचे निर्देश दिले. तसेच प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करण्यास सांगितले. या भेटीदरम्यान गावकऱ्यांनीही विविध समस्या मांडल्या. त्यावर तात्काळ दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना कार्यवाहीचे आदेश देण्यात आले. या संपूर्ण भेटीत शोक, संवेदना आणि मानवी करुणेचे अतिशय हृदयस्पर्शी चित्र दिसून आले.

# भाच्याला वाचवताना मामाला जलसमाधी
## रेती उत्खननाच्या खड्ड्यांनी घेतला बळी?

### वणा नदीतील हृदयद्रावक घटना;

**हिंगणघाट जनमाध्यम :** शेकापूर बाई येथील वणा नदीपात्रात भाच्याचा जीव वाचवताना मामाचा बुडून मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना २७ रोजी घडली. राहुल अनिल कोळसे (वय ३८) रा. शेकापूर बाई असे मृताचे नाव असून, या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

राहुल कोळसे हे निलेश कोळसे आणि १० वर्षीय भाचा भावेश डोमकावळे यांच्यासोबत चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील वणा नदीत आंघोळीसाठी गेले होते. आंघोळ सुरू असताना भावेश खोल पाण्यात जाऊन बुडू लागला. हे लक्षात येताच राहुल यांनी क्षणाचाही विलंब न करता नदीत उडी घेत भाच्याला सुरक्षित बाहेर काढले. मात्र, स्वतः नदीपात्रातील खोल खड्ड्यात अडकले.



पाण्याखालील खड्ड्याचा अंदाज न आल्याने त्यांचा बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. घटनेची माहिती परिसरात पसरताच नदीकाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. ग्रामस्थांनी नदीपात्रातील मोठ्या प्रमाणातील रेती उत्खननामुळे पाण्याखाली खोल खड्डे निर्माण झाल्याचा आरोप केला आहे. या खड्ड्यांमुळेच राहुल कोळसे यांचा जीव गेला, असा संताप ग्रामस्थांनी व्यक्त केला.

माहिती मिळताच वडनेर पोलिस तसेच हिंगणघाटचे उपविभागीय पोलिस अधिकारी सुशीलकुमार नाईक यांनी घटनास्थळी धाव घेतली. संबंधित घटना वरोरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडल्याने पुढील तपास वरोरा पोलिस करीत आहेत.

# मामा-भांजा दर्ग्याजवळ भीषण अपघात
## समोरासमोर धडकेत दुचाकीस्वार गंभीर

**वर्धा जनमाध्यम :** पवनार येथील मामा-भांजा दर्ग्याजवळ गुरुवारी सकाळी दोन दुचाकींची समोरासमोर जोरदार धडक होऊन भीषण अपघात झाला. या अपघातात एका दुचाकीस्वाराला गंभीर दुखापत झाली असून दुसरा जण किरकोळ जखमी झाला आहे. सकाळी नऊच्या सुमारास ही घटना घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, सकाळच्या वेळेत महामार्गावर वाहतुकीची मोठी वर्दळ सुरू असताना दोन दुचाकी अचानक एकमेकांवर आदळल्या. धडक इतकी जबरदस्त होती की दोन्ही वाहनचालक रस्त्यावर फेकले गेले. अपघात होताच परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. स्थानिक नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत जखमींना मदत केली व रुग्णवाहिकेच्या सहाय्याने जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले.

गंभीर जखमी झालेल्या युवकावर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती सूत्रांनी दिली. अपघातानंतर काही काळ




वाहतुकीवर परिणाम झाला होता. नागरिकांनी वाहतूक सुरळीत करण्यासाठी पुढाकार घेतला. दरम्यान, मामा-भांजा दर्गा परिसरात वारंवार अपघात होत असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. या मार्गावर वेगमर्यादा, चेतावणी फलक व वाहतूक नियंत्रणासाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# वाऱ्याने भडकली आग अन् नंदपूरवर ओढवले संकट

## सरपंचांची धावपळ, आमदारांचा तातडीचा आदेश अन् अग्निशमन दलाची शर्थ; काही क्षण उशीर झाला असता तर नंदपूर झाले असते राख

**सिंदी रेल्वे जनमाध्यम :** नंदपूर गावाने बुधवारी सायंकाळी अक्षरशः मृत्यूचे थैमान डोळ्यांसमोर पाहिले! गावालगतच्या शेतात पेटविण्यात आलेल्या धुऱ्याने अचानक रौद्ररूप धारण केले आणि जोरदार वाऱ्यामुळे आग थेट गावाच्या दिशेने धावू लागली. पाहता पाहता लालभडक ज्वाळांनी अर्धा किलोमीटरचे अंतर पार करत गावाच्या वेशीवर धडक दिली. काही क्षण उशीर झाला असता तर संपूर्ण नंदपूर गाव आगीच्या विळख्यात सापडून बेचिराख झाले असते.

सायंकाळी पाच वाजताच्या सुमारास ही थरारक घटना घडली. उन्हाळी मशागतीदरम्यान काही शेतकऱ्यांनी शेतातील धुरा पेटविला होता. मात्र अचानक सुटलेल्या वादळी वाऱ्यामुळे आगीने विक्राळ रूप घेतले. शेतातील कोरडे गवत, झुडपे आणि वाऱ्याचा वेग यामुळे ज्वाळा थेट गावाकडे झेपावू लागल्या. धुराचे



लोट आणि आगीचे रौद्ररूप पाहून ग्रामस्थांमध्ये एकच घबराट उडाली. मात्र याच वेळी नंदपूरकरांनी दाखविलेली जागरूकता गावासाठी देवदूत ठरली. ग्रामस्थांनी तातडीने सरपंच दुर्गाताई ढोने यांना माहिती दिली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत सरपंचांनी क्षणाचाही विलंब न करता आमदार समीर कुणावार यांच्याशी संपर्क साधला. घटनेची माहिती मिळताच आमदारांनी सिंदी रेल्वे नगरपालिकेच्या नगराध्यक्षा राणी कलोडे यांना तातडीने अग्निशमन बंब पाठविण्याच्या सूचना दिल्या.

# टोल नाक्यावर 'सिनेस्टाईल' सापळा; घरफोडी करणारी आंतरराज्यीय टोळी जेरबंद

## ४६ लाखांचा मुद्देमाल जप्त, तेलंगणा पोलिसांच्या स्वाधीन

**हिंगणघाट जनमाध्यम :** नागपूर-हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गावरील दारोडा टोल नाका सोमवारी मध्यरात्री अक्षरशः 'क्राईम थ्रिलर'चा सेट बनला होता. तेलंगणात घरफोड्या करून महाराष्ट्राच्या दिशेने धूम ठोकणाऱ्या आंतरराज्यीय सराईत टोळीला वडनेर पोलिसांनी सिनेस्टाईल पद्धतीने जेरबंद करत धाडसी कारवाई केली. आरोपींनी पोलिसांना चकवा देण्यासाठी कार भरधाव रिव्हर्स घेत पळण्याचा प्रयत्न केला; मात्र पोलिसांनी क्षणाचाही विलंब न लावता गाडीला घेराव घालत तिघांनाही ताब्यात घेतले.

तेलंगणातील आदिलाबाद येथील वन टाऊन पोलिस स्टेशन हद्दीतील शांतिनगर परिसरात २३ मे रोजी घरफोडीची घटना घडली होती. या प्रकरणाचा तपास करताना सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपी महाराष्ट्राच्या दिशेने पळत असल्याची माहिती आदिलाबाद पोलिसांना मिळाली. विशेष म्हणजे, पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी आरोपींनी बनावट नंबर प्लेट आणि बनावट फास्टॅगचा वापर केला होता. आदिलाबाद, कामारेड्डी आणि वारंगल परिसरात सलग घरफोड्या केल्याचेही उघड झाले.

याची माहिती तत्काळ वर्धा पोलिसांना देण्यात आली. त्यानंतर वडनेर पोलिसांनी दारोडा टोल नाक्यावर सापळा रचला. संशयित कार टोल नाक्यावर पोहोचताच पोलिसांनी ती अडवण्याचा प्रयत्न केला. मात्र आरोपींनी कार भरधाव रिव्हर्स घेत पळ काढण्याचा प्रयत्न केला. या थरारक क्षणी पोलिसांनी जीवाची पर्वा न करता कारला चारही बाजूंनी घेरले आणि तिघांनाही अलगद ताब्यात घेतले. या कारवाईमुळे टोल नाका परिसरात एकच खळबळ उडाली होती. ताब्यात घेतलेल्या आरोपींमध्ये जयचंद (रा. पूर्व दिल्ली), प्रेम शालिकराम खत्री (रा. नागपूर) आणि सतेंद्र गुप्ता (रा. भिलगाव, नागपूर) यांचा समावेश आहे. हे तिघेही सराईत गुन्हेगार असून त्यांच्यावर हत्या, दरोडा, चेन स्नॅचिंगसारखे गंभीर गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली. आरोपींकडून तब्बल ४६ लाख ४६ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ही धडक कारवाई पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे, उपविभागीय पोलिस अधिकारी सुशीलकुमार नायक यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार घनश्याम पाटील यांच्या नेतृत्वात पोलिस उपनिरीक्षक भारत वर्मा, समीर कामडी, प्रशांत भाईमारे आणि संदीप बदकी यांनी पार पाडली. अखेर तिन्ही आरोपींना मुद्देमालासह आदिलाबाद पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले.


## जाहीर सुचना

माझे अशील श्री. स्वप्नील शरदराव हताजरे हे मौजा- वर्धा, ता. व जि. वर्धा येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे मालक आहेत. सदर मिळकत मौजा क्र. २५५ (जुना), ८५ (नवीन), नजुल शीट क्र. ५०, भूखंड क्र. ६९१८, नगर परिषद वर्धा हद्दीत, वार्ड क्र. ०८, झोन क्र. ०२, मालमत्ता क्र. डब्लु.ए.आर. डी ०००१४११९, जुना मालमत्ता क्र. ०८०००११८ व मॅन्युअल मालमत्ता क्र. ०८-१०७, क्षेत्रफळ ९९.९७ चौ. मी. म्हणजेच १०७५.६७ चौ. फूट तसेच बांधकाम क्षेत्र ४६.२९ चौ. मी. म्हणजेच ४९८.०८ चौ. फूट अशी आहे. सदर मिळकतीच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे आहेत :-

पूर्वेस – श्री. रामराव मारोतराव डबाले यांचे घर,पश्चिमेस – श्री. दयारामजी पेंडाम यांचे घर ,उत्तरेस – रस्ता,दक्षिणेस – श्री. जावंधिया यांची जागा की, कु. प्रतिक्षा शरदराव हताजरे व सौ. विद्या शरदराव हताजरे यांनी भूखंड क्र. ६९१८, क्षेत्रफळ ९९.९७ चौ. मी. म्हणजेच १०७५.६७ चौ. फूट तसेच बांधकाम क्षेत्र ४६.२९ चौ. मी. म्हणजेच ४९८.०८ चौ. फूट बाबतचा हक्कसोड पत्र दिनांक ०३/०४/२०२४ रोजी दस्त नोंदणी क्र. १४४६/२०२४ अन्वये उपनिबंधक, वर्धा यांच्या समक्ष श्री. स्वप्नील शरदराव हताजरे यांच्या नावे निष्पादित केला आहे. त्यानुसार श्री. स्वप्नील शरदराव हताजरे हे सदर मिळकतीचे मालक झाले आहेत. की, सदर व्यवहाराची फेरफार नोंद महसूल प्राधिकरणाने दिनांक ०७/०६/२०२४ रोजी फेरफार क्र. २१०५७ अन्वये मंजूर केलेली आहे.की, माझ्या अशिलांकडील मूळ विक्रीपत्र दिनांक १२/०४/१९७८ चे दस्त नोंदणी क्र. १५८६/१९७८ हरवले आहे त्यांनी दि चोलामंडलम इन्व्हेस्टमेंट ॲन्ड फायनान्स कंपनी लिमिटेड. येथे कर्ज प्रस्ताव सादर केलेला आहे.

याद्वारे सर्वसामान्य जनतेस जाहीर सूचना देण्यात येते की, वरील व्यवहाराबाबत कोणास काही हरकत अथवा आक्षेप असल्यास किंवा हरवलेले मूळ विक्रीपत्र कोणास मिळून आल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्कसाधावा.

**ॲड.आर.आर.तिवारी,**
**रामनगर, वर्धा. मो.९९२२४२६१६८**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त

### मनोज जरांगे पाटील यांचे ३० मे पासून आमरण उपोषण



**मुंबई**-मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी आक्रमक भूमिका घेत येत्या ३० मे पासून आमरण उपोषणाला बसणार आहेत असे जाहीर केले आहे. जरांगे यांनी अंतरवाली सराटीत पत्रकार परिषद घेत त्यांच्या आंदोलनाची माहिती दिली. तसेच यावेळी त्यांनी 'या रखरखत्या उन्हात उपोषणाला बसणार आहे. त्यावेळी उष्माघाताने माझे काही बरं वाईट झालं तर त्याला सरकार जबाबदार असेल', असा इशारा त्यांनी सरकारला दिला आहे.यावेळी मी रखरखत्या उन्हात बाज टाकून उपोषण करणार आहे. पायात चप्पल नसेल, अन्नपाणी नसेल, काय व्हायचं ते होऊ द्या, असेही जरांगे म्हणाले. यावेळी जरांगे यांनी मराठा समाजातील बांधवांनी अंतरवाली सराटीकडे येऊ नये असे आवाहन देखील केले आहे.

### पहिली 'वॉटर मेट्रो' मुंबईत दाखल

**मुंबई**-मुंबईकरांचा प्रवास अधिक वेगवान आणि पर्यावरणपूरक करण्यासाठी 'मुंबई वॉटर मेट्रो' आता प्रत्यक्ष रूपात अवतरणार आहे. या वॉटर मेट्रोच्या ताफ्यातील पहिली अत्याधुनिक स्वीडिश इलेक्ट्रिक बोट मुंबई बंदरात दाखल झाली असून, जूनच्या पहिल्या आठवड्यापासून तिच्या मार्गिका चाचण्यांना (ट्रायल्स) सुरुवात होणार आहे. मत्स्यव्यवसाय आणि बंदरे मंत्री नितेश राणे यांनी ही खुशखबर दिली.महाराष्ट्राला लाभलेल्या ८७७ किलोमीटर लांबीच्या विस्तीर्ण किनारपट्टीचा वापर करून राज्यातील जलवाहतूक अधिक सक्षम करण्यासाठी राज्य सरकारकडून वेगाने पावले उचलली जात आहेत. मुंबईच्या रस्त्यांवरील वाहतूक कोंडी, खड्डे आणि वेळेचा अपव्यय टाळण्यासाठी वॉटर मेट्रो हा एक उत्तम पर्याय ठरणार आहे.वॉटर मेट्रोच्या ताफ्यात दाखल झालेली 'कॅन्डेला पी-१२' ही बोट स्वीडनहून मागवण्यात आली असून ती इलेक्ट्रिक प्रपल्शन आणि हायड्रोफॉइल तंत्रज्ञानावर आधारित आहे. ही बोट २५ नॉट्स (सुमारे ४६ किमी प्रति तास) या वेगाने धावणार असून, सध्या प्राथमिक चाचणीसाठी दाखल झालेल्या बोटीची प्रवासी क्षमता ३० इतकी आहे.अत्याधुनिक हायड्रोफॉइल तंत्रज्ञानामुळे ही बोट चालताना पाण्याचा कमीत कमी रोध होतो. परिणामी, ती पाण्याच्या पृष्ठभागावरून तरंगत उडत असल्याचा आभास होतो. ही बोट इतर पारंपरिक डिझेल फेऱ्यांच्या तुलनेत ८० टक्के कमी ऊर्जा वापरते. शून्य कार्बन उत्सर्जन करणारी ही नौका पूर्णपणे प्रदूषणमुक्त आणि आवाजरहित आहे. त्यामुळे समुद्री पर्यावरणाला कोणतीही हानी पोहोचणार नाही.



### विमानात तांत्रिक बिघाड

**दिल्ली**-दिल्लीहून सॅन फ्रान्सिस्कोला जाणाऱ्या एअर इंडियाच्या विमानात बुधवारी तांत्रिक बिघाडामुळे पुन्हा दिल्लीला परतल्याची धक्कादायक घटना घडली. विशेष म्हणजे, हे विमान तब्बल ८ तासांपेक्षा जास्त वेळ हवेत होते. विमानातील तांत्रिक बिघाड लक्षात आल्यानंतर वैमानिकाने सुरक्षेची काळजी घेत विमान दिल्लीच्या दिशेने वळवले. सुदैवाने विमानाचे दिल्ली विमानतळावर सुरक्षित लँडिंग झाले.एअर इंडियाचे ए ११७३ हे बोइंग ७७७-३३० ईआर विमान दिल्लीहून सॅन फ्रान्सिस्कोसाठी रवाना झाले होते. विमान हवेत असतानाच अचानक त्यात तांत्रिक बिघाड झाल्याचे वैमानिकाच्या निदर्शनास आले.

## महायुतीचे अखेर ठरले

# जळगावमधील विधान परिषदेची जागा शिवसेनेला, तर नाशिक भाजपला?

**जळगाव**-जिल्ह्यातील विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीतील जागावाटपाचा तिढा दिवसेंदिवस चिघळताना दिसत असला, तरी अखेर भाजप आणि शिवसेना शिंदे गट यांच्यातील चर्चेला निर्णायक वळण मिळाल्याची माहिती राजकीय सूत्रांकडून समोर येत आहे. विशेषतः जळगाव आणि नाशिक या दोन महत्त्वाच्या विधान परिषद जागांवरून गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेली रस्सीखेच आता अंतिम टप्प्यात पोहोचल्याचे बोलले जात आहे.

महायुतीतील वरिष्ठ नेत्यांची दिल्लीमध्ये नुकतीच महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका, विधान परिषद निवडणुका आणि उत्तर महाराष्ट्रातील राजकीय समीकरणांवर सविस्तर चर्चा झाल्याचे सांगितले जात आहे. मात्र, बैठकीनंतरही अधिकृत जागावाटप जाहीर करण्यात आले नसल्याने स्थानिक पातळीवरील इच्छुक उमेदवार आणि कार्यकर्त्यांमध्ये मोठा संभ्रम निर्माण झाला आहे. जळगाव आणि नाशिक या दोन्ही जागा प्रतिष्ठेच्या मानल्या जात असल्याने भाजप आणि शिवसेना दोन्ही पक्षांकडून या जागांवर आपापला दावा अधिक आक्रमकपणे मांडला जात असल्याचे चित्र आहे. जळगाव विधान परिषद मतदारसंघावर भाजपने सुरुवातीपासूनच ठाम भूमिका घेतली होती. जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भाजपचे मजबूत संख्याबळ, संघटनात्मक ताकद आणि गेल्या काही वर्षांत पक्षाने वाढवलेला प्रभाव याच्या आधारावर भाजपकडून ही जागा स्वतःकडे ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न सुरू होते. अनेक स्थानिक नेत्यांनी मुंबई आणि दिल्ली येथे पक्षश्रेष्ठींच्या भेटी घेत आपली भूमिका मांडल्याचेही सांगितले जात आहे. भाजपमधील इच्छुक उमेदवारांनीही गेल्या काही दिवसांपासून जोरदार



मोर्चेबांधणी सुरू केली असून, विविध माध्यमांतून आपली ताकद दाखवण्याचा प्रयत्न केला जात आहे. मात्र दुसरीकडे शिवसेनेकडूनही जळगावची जागा प्रतिष्ठेची मानली जात असल्याने त्यांनी कोणत्याही परिस्थितीत ही जागा सोडण्यास स्पष्ट नकार दिल्याचे समोर येत आहे. उत्तर महाराष्ट्रात पक्षाची ताकद वाढवण्यासाठी आणि आगामी निवडणुकांच्या दृष्टीने संघटन अधिक मजबूत करण्यासाठी जळगावची जागा महत्त्वाची असल्याची भूमिका शिवसेनेच्या वरिष्ठ नेत्यांनी घेतल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे महायुतीतील चर्चांमध्ये या जागेवरून अनेकदा मतभेद निर्माण झाल्याची माहितीही सूत्रांकडून समोर येत आहे. दरम्यान, नाशिकमध्ये भाजपची ताकद आणि स्थानिक राजकीय समीकरणे पाहता ती जागा भाजपच्या वाट्याला जाण्याची शक्यता अधिक बळकट झाली आहे. नाशिकमधील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भाजपची पकड मजबूत असल्याने वरिष्ठ नेतृत्वाकडून त्या जागेवर भाजपचाच उमेदवार देण्याचा कल असल्याचे सांगितले जात आहे. त्याच्या बदल्यात जळगावची जागा शिवसेनेला देऊन दोन्ही पक्षांमध्ये समतोल राखण्याचा प्रयत्न केला जात असल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे आता जळगावमध्ये शिवसेनेचा उमेदवार कोण असणार?, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. जळगावमध्ये महायुतीतील सध्या इच्छुक उमेदवारांची मोठी गर्दी दिसून येत आहे. अनेकांनी पक्षश्रेष्ठींकडे आपापली बाजू मांडण्यासाठी मुंबईत तळ ठोकला असून, काही नेत्यांनी थेट दिल्लीपर्यंत संपर्क साधल्याचे सांगितले जात आहे. गेल्या दोन दिवसांत अनेक गुप्त बैठका झाल्याची चर्चा आहे. स्थानिक स्तरावर राजकीय हालचालींना मोठा वेग आला आहे. जागा वाटपाच्या अंतिम निर्णयानंतर जिल्ह्यातील राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलू शकतात, अशी चर्चा सुरू झाली आहे. महायुतीतील वरिष्ठ नेतृत्वाकडून जागावाटपाचा अधिकृत फॉर्म्युला आज उशिरापर्यंत किंवा उद्या जाहीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यानंतरच जळगाव आणि नाशिकमधील उमेदवारांचे चित्र स्पष्ट होणार आहे. विशेषतः जळगावची जागा अंतिमतः कोणाच्या वाट्याला जाणार?, कोणत्या पक्षाचा उमेदवार रिंगणात उतरणार?, याकडे आता संपूर्ण उत्तर महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

## जूनमध्ये महागाई आणखी वाढणार, कर्जदारांच्या खिशावरही ताण पडणार

**मुंबई**-इंधनाच्या दरात चौथ्यांदा झालेली वाढ आणि सोने-चांदीच्या आयात शुल्कात केंद्र सरकारने केलेल्या वाढीचा जोरदार झटका सर्वसामान्यांना बसणार आहे. जूनमध्ये किरकोळ महागाईचा दर पाच टक्क्यांवर जाण्याचा अंदाज वर्तविला जात आहे. महागाईचा दर वाढल्यास नाईलाजाने आरबीआयला व्याजदरात वाढ करावी लागेल, यामुळे कर्जदारांना जास्तीचा ईएमआय भरावा लागेल, असा अंदाज अर्थतज्ज्ञांनी वर्तवला आहे.

अवघ्या ११ दिवसांत पेट्रोलच्या दरात लिटरमागे ७.३८ रुपये, तर डिझेलच्या दरात ७.४८ रुपये वाढ करण्यात आली आहे. पेट्रोलियम उत्पादनांच्या किमतीत वाढ झाल्यामुळे किरकोळ महागाईत पाऊण टक्का वाढ होईल. मे



महिन्यात किरकोळ महागाईचा दर ४ ते ४.५ टक्के राहील, तर जून महिन्यात हाच दर ४.५ ते ५ टक्क्यांवर जाईल. मे महिन्यातील किरकोळ महागाईची आकडेवारी १२ जूनला जाहीर होणे अपेक्षित आहे. किरकोळ महागाईचा दर ५ टक्क्यांच्या पुढे गेल्यास रिझर्व्ह बँकेकडून व्याजदर वाढ सुरू होईल, असा अंदाज 'ईवाय इंडिया'चे मुख्य धोरण सल्लागार डी. के. श्रीवास्तव यांनी व्यक्त केला आहे.

## रेशनिंग व्यवस्था हायटेक होणार

**मुंबई**-पंतप्रधान गरीब कल्याण योजने अंतर्गत सरकार दर महिन्याला ८० कोटी लोकांना रेशन देत आहे. ही व्यवस्था आणखी मजबूत करण्यासाठी केंद्र सरकारने तीन महत्त्वाचे बदल केले आहेत. त्यासाठी सार्थक–पीडीएस योजनेला मंजुरी देण्यात आली आहे. यामध्ये रेशनिंग व्यवस्था आधुनिक व पारदर्शक केली जाणार आहे. त्याचबरोबर राज्यांना अन्न पुरवठ्यात मदत आणि रेशन दुकानदारांना सहाय्य केले जाणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज एक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. या निर्णयाचा थेट परिणाम देशातील ८० कोटी शिधावाटप लाभार्थ्यांवर होणार आहे.शिधावाटप प्रणालीसंदर्भात 'सार्थक–पीडीएस' योजना सुरू करण्यात आली आहे. या संपूर्ण योजनेवर अंदाजे २५ हजार ५३० कोटी रुपये खर्च केले जातील. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर मंत्री अश्विनी वैष्णव यांनी याबाबतची माहिती दिली.

शिधावाटप दुकानांपर्यंत धान्य पोहोचवताना राज्य सरकारांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत होता. यासाठी आता केंद्र सरकार राज्याच्या संबंधित विभागांना अर्थसहाय्य करेल.



त्यामुळे वाहतूक खर्च कमी होईल आणि गरिबांपर्यंत अन्नधान्य वेळेत पोहोचेल. दुर्गम भागांना याचा सर्वाधिक लाभ होईल. रेशन दुकानदारांना सहाय्य-रेशन दुकान धारकांना डिजिटल उपकरणे दिली जातील. अन्नधान्य व्यवस्थित साठवता यावे यासाठी रेशन दुकानदारांना मदत केली जाईल. यामुळे दुकानांचे जाळे आणि कार्यक्षमता वाढेल. रेशन पुरवठ्यातील अपहार, गोंधळ कमी होतील. पीडीएसचे अत्याधुनिकीकरण-सार्वजनिक पुरवठा यंत्रणेचे आधुनिकीकरण करण्याचा सरकारचा मानस आहे. रेशन व्यवस्था आधुनिक करण्यासाठी एआयसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाची अधिकाधिक जोड दिली जाईल. यामध्ये ऑटोमेशन, डिजिटल ट्रॅकिंग, ऑनलाईन मॉनिटरिंग, स्मार्ट डिव्हाईस यांचा समावेश आहे.

## नागपुरमध्ये उष्णतेची तीव्र लाट

**नागपूर**-नागपूरमध्ये उष्णतेची तीव्र लाट कायम आहे. गेल्या २४ तासांत उष्माघातामुळे ११ जणांचा मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. नागपुरात सलग सात दिवस तापमान ४५ अंश सेल्सिअसच्या वर होते. नागपूरसह संपूर्ण विदर्भात सध्या तीव्र उष्णतेची लाट असून, नागरिकांना या उन्हाचा प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. नागपूरमध्ये बुधवारी सलग सातव्या दिवशी तापमान ४५ अंश सेल्सिअसच्या वर नोंदवले गेले. या भीषण उष्णतेच्या काळात गेल्या २४ तासांत उष्माघाताच्या संशयास्पद स्थितीमुळे ११ जणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. तीव्र उन्हामुळे शहरातील रुग्णालयांच्या शवागारांमध्ये अज्ञात मृतदेहांची संख्या वाढली आहे. गेल्या तीन दिवसांत शहराच्या विविध भागांतून एकूण १४ मृतदेह हाती आले असून, त्यापैकी फक्त बुधवारीच ११ मृतदेह आढळली आहेत. बहुतांश मृतदेह दुपारच्या कडक उन्हाच्या वेळेत आढळल्याने हे मृत्यू उष्माघाताशी संबंधित असल्याचा दाट संशय आहे.

## मच्छिमार कामगारांच्या सामाजिक, आर्थिक सुरक्षेला प्राधान्य-राणे

**मुंबई**-महाराष्ट्र मच्छिमार उद्योगातील मच्छिमार आणि इतर श्रमजीवी कामगार मंडळाच्या कामकाजाचा आढावा घेताना राज्यातील मच्छिमार कामगारांच्या सामाजिक व आर्थिक सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल, असे मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी स्पष्ट केले.मंत्रालयात महाराष्ट्र मच्छिमार उद्योगातील मच्छिमार आणि इतर श्रमजीवी कामगार मंडळ स्थापनेनंतर झालेल्या कार्यवाहीबाबत आढावा बैठकीत मंत्री राणे बोलत होते. यावेळी मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव रामास्वामी एन, मत्स्यव्यवसाय आयुक्त प्रेरणा देशभ्रतार, महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश खपले यांच्यासह कामगार विभागाचे अधिकारी उपस्थित होते.मंडळाच्या माध्यमातून कामगारांना अधिकाधिक लाभ मिळतील. यासाठी प्रशासनाने पारदर्शक आणि उत्तरदायी पद्धतीने काम करावे. तसेच जास्तीत जास्त मच्छिमारांची नोंदणी करण्यासाठी मत्स्य व्यवसाय विभाग व कामगार विभाग यांनी संयुक्तपणे नियोजन करण्याचे आदेश दिले आहेत. प्रलंबित लेखापरीक्षण आणि न्यायालयीन प्रकरणे वेळेत निकाली काढण्यावरही भर दिला जाईल. तसेच कामगार मंत्री यांच्याकडे याविषयी लवकरच बैठक घेऊन सकारात्मक निर्णय घेतला जाईल,असेही त्यांनी यावेळी सांगितले.

## फेसबुक, इन्स्टाग्राम आणि व्हॉट्सॲप वापरण्यासाठी मोजावे लागणार पैसे

### मेटाचा मोठा निर्णय



**नवी दिल्ली**-जगभरातील कोट्यवधी वापरकर्त्यांच्या पसंतीस उतरलेल्या फेसबुक, इन्स्टाग्राम आणि व्हॉट्सॲप या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मसाठी आता पैसे मोजावे लागणार आहेत. मेटा कंपनीने या तिन्ही ॲप्ससाठी नवीन पेड सबस्क्रिप्शन योजना जाहीर केल्या असून 'प्लस' वर्गाच्या माध्यमातून वापरकर्त्यांना प्रीमियम सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. मेटाच्या या निर्णयाचा परिणाम हिंदुस्थानातील वापरकर्त्यांवरही होणार असून सोशल मीडिया वापराचा अनुभव आता अधिक खर्चिक होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

मेटाने कमाई वाढवण्यासाठी हा नवा पर्याय स्वीकारला आहे. याआधी एक्स (पूर्वीचे ट्विटर) या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मने पेड सेवा सुरू केल्यानंतर त्यांना मोठा आर्थिक फायदा झाल्याचे दिसून आले होते. त्याच धर्तीवर आता मेटाने फेसबुक प्लस, इन्स्टाग्राम प्लस आणि व्हॉट्सॲप प्लस या नावाने प्रीमियम सेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

या प्लस वर्गामध्ये वापरकर्त्यांना अनेक खास टूल्स आणि कस्टमायझेशन फीचर्स मिळणार आहेत. मोफत आवृत्तीत उपलब्ध नसलेले काही पर्याय आता फक्त पेड सबस्क्राइबर्सनाच वापरता येणार आहेत. विशेषतः व्हॉट्सॲप प्लसमध्ये वैयक्तिक संदेशवहन अधिक आकर्षक आणि सोयीस्कर करण्यावर भर देण्यात आला आहे. वापरकर्त्यांना कस्टम थीम, वेगवेगळ्या प्रकारच्या रिंगटोन, खास स्टिकर्स तसेच अधिक चॅट्स पिन करण्याची सुविधा दिली जाणार आहे. सध्या सामान्य वापरकर्ते केवळ ३ चॅट्स पिन करू शकतात, मात्र पेड आवृत्तीत ही मर्यादा वाढवण्यात येणार आहे.

मेटाने जाहीर केलेल्या माहितीनुसार इन्स्टाग्राम प्लस आणि फेसबुक प्लससाठी दरमहा ३.९९ डॉलर म्हणजेच सुमारे ३८७ रुपयांचे शुल्क आकारले जाईल. तर व्हॉट्सॲप प्लससाठी दरमहा २.९९ डॉलर म्हणजेच जवळपास २९० रुपये मोजावे लागतील. मात्र हिंदुस्थानातील वापरकर्त्यांसाठी अंतिम शुल्क किती असेल, याबाबत अद्याप अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही.

दरम्यान, सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील मोफत सुविधांमध्ये कपात होण्याची शक्यता असल्याने अनेक वापरकर्त्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. तर दुसरीकडे प्रीमियम सेवा वापरणाऱ्यांना अधिक सुरक्षित, वैयक्तिक आणि जाहिरातमुक्त अनुभव देण्याचा प्रयत्न मेटाकडून केला जाणार असल्याचे बोलले जात आहे.

सोशल मीडिया क्षेत्रात वाढती स्पर्धा आणि महसूल वाढवण्याची गरज लक्षात घेता मेटाचा हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

## पेट्रोल-डिझेलवर व्हॅट आणि सरचार्ज तत्काळ रद्द करा

**मुंबई**-गेल्या पंधरा दिवसात पेट्रोल व डिझेलच्या दरात तब्बल ८ रुपयांनी वाढ करण्यात आली आहे. या दरवाढीचा थेट फटका सामान्य नागरिकांना बसत आहे. दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंच्या किमती देखील वाढल्या आहेत. पेट्रोल व डिझेलच्या दरवाढीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून पेट्रोल व डिझेलवर राज्य सरकारकडून लावण्यात येणारा व्हॅट व सरचार्ज तत्काळ रद्द करावा अशी मागणी केली आहे.

'आखाती देशातील युद्धामुळे महाराष्ट्रासह देशाच्या आर्थिक परिस्थितीवर प्रचंड ताण येत आहे. महागाई प्रचंड वाढली आहे, खाद्य तेल, भाजीपाला, जीवनावश्यक वस्तूंच्या दरात मोठी वाढ झाली आहे. याचा फटका थेट सामान्य माणसाला बसत आहे. त्यात भरीस भर पेट्रोल डिझेलचे वाढणारे दर घातक आहेत.

केंद्र सरकारकडून वारंवार पेट्रोल व डिझेलचे दर वाढवले जात आहे. आज पेट्रोल डिझेलचे दर पुन्हा वाढले आहेत. पेट्रोल २ रुपये ६१ पैशांनी तर डिझेल २ रुपये ७१ पैशांनी वाढले आहे. मागील १० दिवसांत सलग चौथ्यांदा ही वाढ केली जात आहे. आज घडीला मुंबईत १११.१२ रु. प्रति लिटर पेट्रोल मिळत आहे तर डिझेल ९६.८६ रु. प्रति लिटर मिळत. त्यामुळे



### जयंत पाटील यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

या महागाईमुळे सामान्य जनतेचे कंबरडे मोडले आहे. या संकटसमयी आपण पुढाकार घेऊन नागरिकांना दिलासा दिला पाहिजे', असे जयंत पाटील यांनी पत्रात म्हटले आहे. 'राज्य सरकार इंधनावर व्हॅट आणि सरचार्ज आकारते जे मुंबई, ठाणे आणि नवी मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्र राज्यात लागू आहे. राज्यात पेट्रोलवर अंदाजे २५० व्हॅट १०.१२ प्रति लिटर सरचार्ज लावला जातो तर डिझेलवर अंदाजे २४१६ व्हॅट ३.०० प्रति लिटर सरचार्ज लावला जातो. राज्य शासनाने पेट्रोल-डिझेलवरील व्हॅट व सरचार्ज रद्द करून टाकावा.

यामुळे आज १११ रुपयांना मिळणारे पेट्रोल व डिझेल थेट ७०-८० रुपयात मिळू शकते. असे झाल्यास या कठीण काळात नागरिकांना मोठा दिलासा मिळू शकतो. आपण या सुचनेचा सकारात्मक विचार करावा व तात्काळ पेट्रोल डिझेलवरील व्हॅट व सरचार्ज रद्द करून नागरिकांना दिलासा द्यावा अशी अपेक्षा करतो', अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

## कांदा प्रश्नावर दहा दिवसांत तोडगा

### अमित शहांच्या भेटीनंतर सुनेत्रा पवार यांची माहिती



**नवी दिल्ली**-कांद्याच्या प्रश्नावर येत्या दहा दिवसांत सकारात्मक तोडगा काढण्यात येईल, असे आज उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी जाहीर केले. कांदा प्रश्नावर केंद्रासोबत झालेल्या बैठकीनंतर त्या बोलत होत्या. कांद्याचा भाव पडल्याने हवालदिल झालेले शेतकरी गेल्या काही दिवसांपासून आंदोलन करीत आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यातील काही मंत्र्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची आज भेट घेऊन कांदा आणि साखर उद्योगांच्या प्रश्नांवर चर्चा केली. या बैठकीनंतर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी ही माहिती दिली. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांसंदर्भात केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा, कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या उपस्थितीत महत्त्वाची चर्चा झाली. यावेळी कांद्यावरील निर्यातबंदी उठवण्यात आली आहे. त्याचा फायदा नक्कीच होईल, असेही त्यांनी सांगितले.

# नाशिक कुंभमेळ्यासाठी ६,१६२ कोटींच्या कामांना मंजूरी

**नाशिक**-आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकमधील पायाभूत सुविधांच्या विकासावर भर दिला जात आहे. कुंभमेळ्यात भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी कोट्यवधींच्या कामांचा धडाका नाशिक महापालिकेने लावला आहे. दरम्यान, कुंभमेळ्यासाठी ६,१६२ कोटींच्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे विकास कामांना अधिक गती मिळेल.

कुंभमेळ्यासाठी मंजूर झालेल्या ६,१६२ कोटींच्या कामांमध्ये प्रामुख्याने घाट बांधणी, जोडरस्ते, रिंगरोड, जलशुद्धीकरण केंद्र, सीसीटीव्ही बसविणे, पूल बांधणी, पावसाळी गटाराची कामे, विद्युत वाहिन्या, ऑप्टिकल फायबर पाईप टाकणे, वाढीव पाणीपुरवठा आदी ६८ प्रकारची कामे मार्गी लावली जाणार आहेत.

कुंभमेळ्याच्या निमित्ताने नाशिकवरील पाणीपुरवठा, घनकचरा व्यवस्थापन आरोग्य सुविधा, विद्युत पुरवठा, सुरक्षा व्यवस्था आदी पायाभूत सुविधांवर मोठ्या प्रमाणावर ताण येणार आहे. त्याकरिता नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाकडून कुंभमेळ्याकरिता दोन टप्प्यांमध्ये ६८ पायाभूत



सुविधा प्रकल्पांचे प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविण्यात आले होते.

यात वाहतुकीच्या नियोजनाकरिता रेल्वे, महामार्गाला जोडणारे रस्ते प्रामुख्याने बांधले जाणार आहेत. याशिवाय गोदावरीच्या घाटाकडे जाणाऱ्या रस्त्यांची दुरुस्ती केली जाणार आहे. कुंभमेळ्याच्या निमित्ताने नाशिकमध्ये येणाऱ्या वाहनांचे नियोजन करण्याकरिता अनेक ठिकाणी वाहनतळ उभारली जाणार आहेत. या वाहनतळांना प्रमुख ठिकाणांशी जोडणारे रस्ते विकसित केले जातील.

घाट बांधणी आणि दुरुस्तीकरिताही मोठ्या प्रमाणावर निधीची तरतूद करण्यात आली आहे.

मुकणे धरणावरील पंपिंग स्टेशनची क्षमता वाढविण्याकरिता व जलशुद्धीकरणाकरिता सुमारे ४०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. तर सुरक्षेकरिता सर्वत्र बसविण्यात येणाऱ्या सीसीटीव्ही यंत्रणेकरिता सुमारे ३७२ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

**ओझर विमानतळासाठी ५७२ कोटी**

नाशिकमधील ओझर विमानतळ विकासाकरिता ५७२ कोटी खर्च करण्यात येणार आहेत. तर त्र्यंबकेश्वर परिसरातील पाणीसाठे पूर्णपणे भरण्याकरिता आणि गोदावरी नदी कायमस्वरूपी प्रवाहित राहण्याकरिता गौतमी गोदावरी धरण ते त्र्यंबकेश्वर उपसा प्रणाली योजनेकरिता सुमारे ३२९ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. बहुतांश कामे नाशिक महानगरपालिका, त्र्यंबकेश्वर नगरपालिका, जलसंपदा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, एमएसआयडीसीच्या माध्यमातून केली जाणार आहेत.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## इंधन दरवाढ आणि महागाई

अमेरिका, इस्त्रायल, इराण युद्धामुळे इंधनाची सातत्याने दरवाढ होत आहे. पेट्रोल, डिझेलपाठोपाठ सीएनजीच्या दरातही १० दिवसांमध्ये चौथ्यांदा वाढ झाली आहे. इंधनात दरवाढ झाली की, महागाई आपोआप वाढते. महागाईवर नियंत्रण ठेवणे कोणालाच शक्य नाही. युद्धबंदीच्या चर्चा होतात, पुन्हा हल्ले होतात. यामुळे इंधनासाठी अवलंबून असलेले भारतासारखे देश होरपळून चालले आहेत. तोंड दाबून बुक्क्यांचा मार खाण्याची वेळ या देशांवर आली आहे. युद्धाबाबत अमेरिका व इराण कोणीही लवचिक भूमिका घेत नसल्याने युद्ध लांबण्याची शक्यता आहे. जगात कुठेही युद्ध पेटले की त्याची राख सर्वप्रथम सामान्य माणसाच्या चुलीवर पडते. आज नेमके तेच घडत आहे. अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यात वाढत चाललेल्या संघर्षाने संपूर्ण जगाला अस्थिरतेच्या खाईत ढकलले आहे. युद्धाच्या बातम्या टीव्हीवर दिसतात, क्षेपणास्त्रांचे आवाज मध्यपूर्वेत घुमतात; पण त्याचे भारतासारख्या विकसनशील देशांना चटके बसतात. कारण युद्ध जिथे होते, तिथे फक्त बॉम्ब पडत नाहीत, तर त्यासोबत जागतिक अर्थव्यवस्थेचे कंबरडे मोडते. तेलाच्या किमती उसळतात, डॉलर मजबूत होतो, आयात खर्च वाढतो आणि त्याचा थेट फटका सामान्य नागरिकांच्या खिशाला बसतो. भारत आजही मोठ्या प्रमाणावर इंधनासाठी परदेशांवर अवलंबून आहे. कच्च्या तेलाची आयात थांबली किंवा दर वाढले की संपूर्ण अर्थचक्र हादरते. पेट्रोल-डिझेलच्या दरवाढीनंतर आता सीएनजीचे दरही दहा दिवसांत चौथ्यांदा वाढले आहेत. ही केवळ आकड्यांची वाढ नाही, तर ती सामान्य नागरिकांच्या जगण्यावर चाललेली आर्थिक चढाई आहे. रोज सकाळी पेट्रोल पंपावर दर बदलतात आणि त्याच वेगाने बाजारातील वस्तूंचे भाव वाढतात. भाजीपाला, दूध, धान्य, बांधकाम साहित्य, वाहतूक, औद्योगिक उत्पादन या सर्वच क्षेत्रांवर या इंधन दरवाढीचा परिणाम होतो. महागाई ही केवळ आर्थिक संज्ञा नाही; ती गरिबाच्या थाळीतून कमी होणारी भाकरी आहे. जेव्हा इंधन महाग होते, तेव्हा ट्रकचे भाडे वाढते, वाहतूक खर्च वाढतो आणि त्याचा भार शेवटी ग्राहकावर टाकला जातो. त्यामुळे महागाई नियंत्रणाबाहेर जाते. सरकार कितीही आश्वासने देत असले, तरी वास्तव असे आहे की, इंधन दरवाढ झाली की महागाईला लगाम घालणे जवळपास अशक्य बनते. आज भारतातील मध्यमवर्ग आणि गरीब वर्ग अक्षरशः तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करत आहे. पगार वाढत नाहीत, रोजगाराची स्थिती स्थिर नाही, पण खर्च मात्र दिवसेंदिवस वाढत आहे. शहरांमध्ये कामावर जाणाऱ्या सामान्य कर्मचाऱ्यापासून ते ग्रामीण भागातील शेतकऱ्यापर्यंत प्रत्येकजण या महागाईच्या आगीत भाजत आहे. या सर्व परिस्थितीमागे मध्यपूर्वेतील युद्धजन्य वातावरण मोठ्या प्रमाणावर जबाबदार आहे. अमेरिका आणि इस्त्रायल यांनी इराणविरोधात घेतलेली आक्रमक भूमिका आणि त्याला इराणकडून मिळणारे प्रत्युत्तर यामुळे परिस्थिती अधिक धोकादायक बनत आहे. युद्धबंदीच्या चर्चा होतात, शांततेच्या घोषणा केल्या जातात; पण दुसऱ्याच दिवशी पुन्हा हल्ले सुरू होतात. यामुळे जागतिक बाजारपेठेत अस्थिरता निर्माण होते. तेल उत्पादक प्रदेशात तणाव वाढला की कच्च्या तेलाच्या पुरवठ्याबाबत भीती निर्माण होते आणि लगेच आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाचे दर वाढतात. अमेरिकेला तिची महासत्ता टिकवायची आहे, इस्त्रायलला स्वतःची सुरक्षा सिद्ध करायची आहे आणि इराणला झुकायचे नाही. या तीन शक्तींच्या अहंकाराच्या संघर्षात भारतासारख्या देशांची आर्थिक कोंडी होत आहे. युद्धात सहभागी नसतानाही भारताला त्याची किंमत मोजावी लागत आहे. कारण भारताकडे तेलाचे प्रचंड साठे नाहीत. देशाला ऊर्जा हवी असेल, उद्योग चालवायचे असतील, वाहतूक सुरळीत ठेवायची असेल तर आयात केलेल्या तेलावर अवलंबून राहावेच लागते. युद्ध जितके लांबेल, तितका भारतावरचा आर्थिक दबाव वाढणार आहे. डॉलरच्या तुलनेत रुपया कमजोर झाला की, आयात अधिक महाग होते. सरकार कर कमी करून नागरिकांना काहीसा दिलासा देण्याचा प्रयत्न करू शकते; पण त्यालाही मर्यादा आहेत. कारण सरकारलाही महसूल हवा असतो. परिणामी सामान्य नागरिक दोन्हींकडून भरडला जातो, एकीकडे महाग इंधन आणि दुसरीकडे वाढती महागाई. आज परिस्थिती इतकी गंभीर बनली आहे की, लोकांच्या आर्थिक नियोजनाचा पूर्णतः बोजवारा उडाला आहे. सीएनजी दरवाढीचा सर्वात मोठा फटका रिक्षाचालक, टॅक्सीचालक आणि छोट्या वाहतूक व्यावसायिकांना बसत आहे. त्यांचे उत्पन्न वाढत नाही; पण खर्च मात्र प्रचंड वाढतो आहे. शेवटी तेही भाडेवाढ करतात आणि त्याचा भार पुन्हा सामान्य माणसालाच सहन करावा लागतो. सर्वात मोठी शोकांतिका म्हणजे या संकटावर कोणाकडेही ठोस उपाय दिसत नाही. युद्ध थांबवण्यासाठी आंतरराष्ट्रीय संघटना निष्प्रभठरत आहेत. संयुक्त राष्ट्रसंघाच्या बैठका होतात, निवेदने दिली जातात; पण प्रत्यक्षात युद्धबंदी घडताना दिसत नाही. अमेरिका आणि इराण दोघेही माघार घेण्याच्या मनःस्थितीत नाहीत. इस्त्रायलची भूमिका देखील अधिक आक्रमक होत चालली आहे. त्यामुळे हा संघर्ष दीर्घकाळ सुरू राहण्याची भीती वाढत आहे. भारताने आता या परिस्थितीकडे केवळ प्रेक्षक म्हणून पाहून चालणार नाही. दीर्घकालीन ऊर्जा धोरण अधिक मजबूत करावे लागेल. पर्यायी ऊर्जा स्त्रोत, इलेक्ट्रिक वाहनांचा प्रसार, सौरऊर्जा, जैवइंधन आणि स्थानिक ऊर्जा उत्पादन यावर आक्रमक गुंतवणूक करण्याची वेळ आली आहे. अन्यथा प्रत्येक आंतरराष्ट्रीय युद्धानंतर भारताला अशाच आर्थिक संकटांना सामोरे जावे लागेल. जगातील महासत्ता आपापल्या राजकीय आणि सामरिक स्वार्थासाठी संघर्ष करत राहतील; पण त्याची किंमत भारतातील सामान्य माणूस रोज पेट्रोल पंपावर, बाजारात आणि घरखर्चात चुकवत राहणार आहे. हे युद्ध फक्त मध्यपूर्वेत सुरू नाही, तर ते भारतातील प्रत्येक घराच्या अर्थसंकल्पावर चालले आहे.

# एक हंगाम सुट्टी हे आंदोलनच



**शेती फायद्याची करायची असेल तर अन्नधान्याचा तुटवडा निर्माण होणे गरजेचे आहे. त्यासाठी एक हंगाम सुट्टी घेऊन पाहूया. नाहीतरी या खरीप हंगामात शेती करायला अनंत अडचणी येणार आहेतच.**

**उत्तरार्ध**

अहिल्यानगर जिल्ह्यातील पुणतांब्यातून, जून २०१७ मध्ये शेतकरी संपाच्या आंदोलनाला सुरुवात झाली होती. तीन चार दिवस काही जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनी प्रतिसाद दिला मात्र लवकरच आंदोलन शिथिल झाले. पुढे सरकार बरोबर बोलणी करून संप मागे घेण्यात आला. त्या संपात शेतकऱ्यांकडे तयार असलेला भाजीपाला फेकून द्यावा लागला, दूध फेकून द्यावे लागले. मोठे आर्थिक नुकसान होत होते म्हणून शेतकरीच संप फोडण्याचा प्रयत्न करू लागले. सक्तीने शेतीमाल थांबवण्याचा प्रयत्न केला तर आमच्यावर गुन्हे दाखल झाले. सुट्टी घेतल्यावर हा प्रश्न येणार नाही. ज्याला वाटते या हंगामात काही नफा शिल्लक राहणार नाही त्यांनी आपल्या शेतात काही पिकवायचे नाही किंवा घरी खायला लागेल इतकेच पिकवायचे. म्हणजे नाही पिकवले तर खायचे काय, हा प्रश्न येणार नाही आणि फेकून द्यायला काही असणार नाही.

**विकत घेऊन खाल्लेले परवडते**

आपण पिढ्या न पिढ्या शेती करत आलो, पण हिशेब कधी केलाच नाही. या वर्षी पेरणीच्या अगोदर हिशेब करूया. नांगरट, पाळी, पेरणी, शेणखत, रासायनिक खत, तणनाशक, कीटकनाशक, मजुरी, सिंचनाचा खर्च, वाहतूक वगैरे सर्व निविष्ठांचा व मजुरीचा खर्च काढा. या क्षेत्रातून किती धान्य मिळेल ते काढा आणि तितके धान्य, खळ्याच्या वेळेला काय भावाने बाजारात मिळते ते पाहा. इतका खर्च, कष्ट, मानसिक त्रास सहन करून पिकवलेल्या धान्यापेक्षा बाजारातून मिळणारे धान्य कमी पैशात मिळेल. पाहा एकदा हिशेब करून! शेतकऱ्यांनी सुट्टी घेतली तर देशाच्या अन्न सुरक्षेचे काय? असा प्रश्न पुढे येणे साहजिकच आहे. ही जबाबदारी फक्त शेतकऱ्यांनीच घ्यायची का? 'फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया'च्या गोदामात लाखो टन धान्याची नासाडी होते ते रोखण्यासाठी काही केले जात नाही. मोठमोठ्या हॉटेल्समध्ये कित्येक टन अन्न फेकून दिले जाते, तेव्हा अन्न सुरक्षा पाहिली जात नाही. पाण्याची टंचाई नसताना धरणांच्या तीरावर असलेल्या शेतकऱ्यांचा विद्युत पंपांचा वीजपुरवठा खंडित करून पिके जाळली जातात तेव्हा अन्न सुरक्षा नाही आठवत का? धरणातले पाणी शहरांना पिण्यासाठी व औद्योगिक क्षेत्रातील कारखाने चालविण्यासाठी राखीव केले जाते, शेतीचा गळा घोटून, ते चालते का? तेव्हा अन्न सुरक्षेला धोका नाही निर्माण होत का?

शेतकऱ्यांचे मातीशी भावनिक नाते जडलेले असते. जमीन पडीक कशी राहू द्यावी, असा विचार मनात येत राहतो. पण या भावनिक गुंत्यामुळे आपण हिशेब करणे टाळतो, नफा-तोट्याचा विचार करत नाही. याचा फायदा सत्तेतील सरकार घेते आणि देशाची धान्याची कोठारे भरून घेते. निवडणुका जिंकण्यासाठी जनतेला दोन रुपये किलो किंवा फुकट धान्य, वाटायला मोकळे होते; कारण आपण शेती करताना हिशेब करत नाही. भावनिक होऊन जास्तीत जास्त पिकण्याचा प्रयत्न करतो अन् फसतो,तोट्यात जातो, कर्जबाजारी होतो. हे दुष्टचक्र थांबवायचे असेल, शेती फायद्याची करायची असेल तर अन्नधान्याचा तुटवडा निर्माण होणे गरजेचे आहे. त्यासाठी एक हंगाम सुट्टी घेऊन पाहूया. नाहीतरी या खरीप हंगामात शेती करायला अनंत अडचणी येणार आहेतच.

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना काही दिवसांपूर्वी संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषी संघटनेतर्फे (एफएओ) रोम येथील मुख्यालयात २०२६ साठी प्रतिष्ठेच्या 'ॲग्रीकोला' पदकाने सन्मानित करण्यात आले. भारतात आणि जागतिक स्तरावर अन्नसुरक्षा, शाश्वत कृषी आणि ग्रामीण विकास, यासारख्या क्षेत्रांमधील त्यांच्या 'असाधारण' नेतृत्वाची दखल घेऊन हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार मोदींनी देशातील शेतकरी, कष्टकरी, कृषी शास्त्रज्ञांना अर्पण केला. देशातील शेतकरी, कष्टकरी खुश झाले असतील. पण मोदी सरकारचे निर्णय पाहिले तर ते शेतकरी विरोधीच आहेत. अनेक शेतीमालावर निर्यातबंदी, साठ्यांवर मर्यादा आज ही आहेत. अन्यायकारक शून्य कर आकारून शेतीमालाची आयात, वायदे बाजारातून अनेक शेतीमालाची गच्छंती, जबरदस्तीने भूमी अधिग्रहण वगैरे असे अनेक अन्याय सुरूच आहेत. आंतरराष्ट्रीय पातळीवर मात्र शेतकऱ्यांचा कळवळा दाखविला जात आहे, याला शेतकऱ्यांनी भुलू नये.

**'भाग मिल्खा भाग'**

सरदार मिल्खा सिंग हे भारतातील एक आदरणीय व्यक्तिमत्त्व. एक जागतिक कीर्तीचे धावपटू, त्यांनी अनेक आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भारताला सुवर्णपदके मिळवून दिली आहेत. त्या काळात मात्र सरदार मिल्खासिंग यांच्या नावावर अनेक विनोद तयार केले जात. त्यातील एक असा होता एकदा धावपटू मिल्खासिंग आपल्या घराबाहेर बागेत, अर्धी चड्डी, बनियन घालून व्यायाम करत होते. एक चोर खिडकीतून त्यांच्या काही चीजवस्तू चोरण्याचा प्रयत्न करत होता. मिल्खासिंगच्या हे लक्षात आल्यावर ते चोराला पकडण्यासाठी त्याच्या मागे धावू लागले. चोर धावत धावत हमरस्त्यावर आला. मागे मिल्खासिंग ! पाहणाऱ्या लोकांना वाटले दोघांत स्पर्धा सुरू आहे आणि मिल्खासिंग मागे पडत आहेत. लोकांनी मिल्खासिंग यांना प्रोत्साहन देण्याच्या हेतूने चिअर अप करायला सुरुवात केली, 'बक अप मिल्खासिंग, कम ऑन मिल्खासिंग.' मिल्खा सिंगला वाटले आपण जिंकलेच पाहिजे म्हणून ते आणखी जोरात धावू लागले व चोराला पकडायचे सोडून त्याच्या पुढे निघून गेले! आपले तसे नको व्हायला पदक अर्पण केले म्हणून चोर पकडायचे सोडून अधिक उत्पादन करण्याच्या फंदात पडू नये! शेतकरी भावांनो, देशाला आपली गरज आहे, आपण गुलाम नाही, हे दाखवून देण्याची ही संधी आली आहे, ती परत येणार नाही. एक हंगाम सुट्टी घेणे एक सोपे आंदोलन आहे, फायद्याचे आंदोलन आहे, काहीच करायचे नाही, एक हंगाम सुट्टी घ्या! बस !

**अनिल घनवट**
मो.९९२३७०७६४६

# कांदा का रडवतो?


कांद्याचे भाव न्यूनतम पातळीवर गेल्यामुळे राज्यभर कांद्याला भाव मिळण्यासाठी आंदोलने सुरू आहेत. देशातील वार्षिक कांदा उत्पादन सुमारे ३०० ते ३२० लाख टन आहे. त्यापैकी महाराष्ट्रात ११० ते १३० लाख टन कांदा उत्पादन होते. लासलगाव ही आशियातील सर्वात मोठी कांदा बाजारपेठ मानली जाते. नाशिक, अहिल्यानगर, पुणे, सोलापूर, जळगाव, धुळे आणि छत्रपती संभाजीनगर हे प्रमुख कांदा उत्पादक जिल्हे आहेत. स्वाभाविकरीत्या हे जिल्हे सध्याच्या आंदोलनाचे केंद्र बनले आहेत.

**कांद्याचे राजकारण**

संख्येने खूप अधिक असलेल्या ग्राहकांची मर्जी टिकावी यासाठी कांद्याचे भाव वाढले की सरकार तातडीने हस्तक्षेप करते. भाव पाडले जातात. शेतकऱ्यांना दोन पैसे मिळण्याची संधी नाकारत तत्परतेने निर्यातबंदी, निर्यात शुल्कात वाढ किंवा किमान निर्यातमूल्य यासारखी साधने वापरली जातात; मात्र कांद्याचे भाव पडतात तेव्हा शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी सरकारच्या वतीने पुरेशी तत्परता दाखवली जात नाही. या वेळीही तेच झाले आहे.

**अजब निर्णय**

शेतकऱ्यांनी केलेल्या तीव्र आंदोलनामुळे राज्य सरकारने नाफेडद्वारे १२३५ रुपये प्रतिक्विंटल प्रमाणे कांदा खरेदी करण्याची घोषणा केली. मात्र सध्या कांद्याला १३००-१४०० रुपये भाव बाजारात मिळत असल्यामुळे ही घोषणा कुचकामी ठरली. आंदोलनांमुळे केंद्र सरकारने थोडी वाढ करून तो १५८० रुपये प्रतिक्विंटल केला, मात्र हा दर केवळ नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी असेल, असे नमूद केले. हा निर्णय अजब म्हणावा असा आहे. सरकार केवळ एका जिल्ह्यापुरता असा भाव कसा काय जाहीर करू शकते? नाशिक बाजार समितीत नगर किंवा पुण्याच्या शेतकऱ्यांनी आपला कांदा नेला तर त्याला हा भाव सरकार देणार की नाही, असे प्रश्न यामुळे उपस्थित झाले. मुळात सरकारने एखाद्या जिल्ह्याचा अशा प्रकारे उल्लेख करून उर्वरित जिल्ह्यांवर अन्याय करणे हे सर्वथा गैर आहे. शिवाय जो भाव जाहीर केला आहे तो आणि शेतकऱ्यांची मागणी यात मोठी तफावत आहे.



कांद्याचा उत्पादन खर्चच १५०० ते १८०० रुपये प्रतिक्विंटल असताना सरकारने १५८० रुपये भाव जाहीर करणे अन्यायकारक आहे.

**उपाय**

आज शेतकऱ्यांना तत्काळ सहाय्य करण्याच्या दृष्टिकोनातून किमान १५०० रुपये प्रतिक्विंटल अनुदान जाहीर करणे; तसेच ३००० रुपये प्रतिक्विंटल प्रमाणे पुरेशा प्रमाणात नाफेडद्वारे कांद्याची सरकारी खरेदी करणे हे उपाय अवलंबले पाहिजेत. शिवाय योग्य निर्यात धोरण, नाफेड व बफर स्टॉकचा योग्य वापर, साठवण क्षमतेत वाढ, भाव स्थिरीकरण कोष यासारखे दीर्घकालीन उपाय केले पाहिजेत. शेतकऱ्यांनी आंदोलने केली की दीर्घकालीन उपायांबद्दल तात्पुरती चर्चा होते. किसान सभेने नाशिक ते मुंबई काढलेल्या लॉंग मार्चमध्येही अशीच चर्चा झाली. समिती निर्माण करून दीर्घकालीन उपाय करण्याचे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. याबाबत सातत्याने पाठपुरावा करण्यात आला; मात्र सरकारकडून नंतर प्रतिसाद मिळाला नाही.

**योग्य निर्यात धोरण**

कांद्याचे भाव पडण्यात केंद्र सरकारच्या आयात-निर्यात धोरणाचा मोठा वाटा आहे. महागाई नियंत्रणाच्या नावाखाली सरकारने वेळोवेळी कांदा निर्यातीवर बंदी, किमान निर्यात मूल्य आणि निर्यात शुल्क लादल्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत भारतीय कांद्याची स्पर्धात्मकता कमी झाली आहे. ऑगस्ट २०२३ मध्ये केंद्राने कांद्यावर ४० टक्के निर्यात शुल्क लावले, त्यानंतर ऑक्टोबर २०२३मध्ये ८०० डॉलर प्रतिटन किमान निर्यातमूल्य निश्चित केले आणि डिसेंबर २०२३ पासून मार्च २०२४पर्यंत संपूर्ण निर्यातबंदी लागू केली. नंतर ही बंदी 'पुढील आदेशापर्यंत' वाढविण्यात आली. या धोरणांचा थेट परिणाम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांवर झाला. निर्यात बंद झाल्यानंतर लासलगावसारख्या प्रमुख बाजारांमध्ये कांद्याचे घाऊक दर ४५०० रुपये प्रतिक्विंटलवरून १२०० रुपयांपर्यंत घसरले. भारताने २०२२-२३ मध्ये विक्रमी २५ लाख टन कांदा निर्यात केला होता; मात्र निर्बंधांमुळे निर्यातीत मोठी घट झाली. मे २०२४ मध्ये सरकारने बंदी उठवली तरी ५५० डॉलर प्रति टन किमान निर्यात मूल्य आणि ४० टक्के शुल्क कायम ठेवले. त्यामुळे निर्यात मर्यादितच राहिली. परिणामी, देशांतर्गत पुरवठा वाढून भाव कोसळले, दुसरीकडे पाकिस्तान, चीन, इजिप्त यांसारख्या देशांनी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील भारताचा हिस्सा हस्तगत केला. सतत बदलणाऱ्या निर्यात धोरणामुळे भारतीय कांद्याची जागतिक बाजारपेठेतील विश्वासार्हता कमी झाली.

**साठवण क्षमता**

राज्यात २०१५-१६ मध्ये कांदा साठवण क्षमता सुमारे १५ लाख टन होती. सरकारने ती २० टक्क्यांनी वाढवण्याची घोषणा केली होती; मात्र महाराष्ट्रात दर वर्षी ११० ते १३० लाख टन कांदा उत्पादन होत असताना आधुनिक साठवण क्षमता त्याच्या तुलनेत खूपच कमी आहे. राज्यात सुमारे सात लाख कांदा चाळी असल्याचे सरकारने सांगितले होते आणि त्या ८.५ लाखांपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तरीही प्रत्यक्षात उत्पादित कांद्यापैकी मोठा हिस्सा शेतकऱ्यांना तातडीने बाजारात विकावा लागतो आहे. रब्बी हंगामातील सुमारे ६० टक्के कांदा साठवणुकीस योग्य असला तरी अत्याधुनिक गोदामांची कमतरता असल्याने त्याचा पुरेसा फायदा होत नाही. पारंपरिक साठवणुकीत कांद्याचे ३० ते ४० टक्के नुकसान होते. कांदा कुजणे, वजन घटणे, मोड येणे यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. ऀइ च्या सुधारित साठवण तंत्रज्ञानामुळे नुकसान १४ ते १५ टक्क्यांपर्यंत कमी होऊ शकते; मात्र अशा आधुनिक साठवण सुविधांचा विस्तार अत्यंत मर्यादित आहे. परिणामी काढणीनंतर मोठ्या प्रमाणावर कांदा एकाच वेळी बाजारात येतो आणि भाव कोसळतात. सरकारने ही बाब लक्षात घेऊन शेतकऱ्यांना मोफत किंवा अल्प दरात साठवण सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्राधान्य देण्याची आवश्यकता आहे.

**'नाफेड'चा दुरुपयोग**

सरकार कांद्याचे पडलेले भाव सावरण्यासाठी नाफेडद्वारे कांद्याची खरेदी करते. कांदा खरेदी करताना सरकार चालू बाजारभावाच्या सरासरीप्रमाणे शेतकऱ्यांकडून कांदा खरेदी करत असल्यामुळे व ही खरेदी मुख्यत: कांद्याचे भाव पडलेले असताना केली जात असल्यामुळे शेतकऱ्यांकडून, सरकार पडलेल्या भावात कांदा खरेदी करते. मात्र हा खरेदी केलेला कांदा, कांद्याचे भाव वाढले असताना व शेतकऱ्यांना दोन पैसे मिळत असताना बाजारात ओतला जातो. शेतकऱ्यांचा कांदा, सरकारकडून शेतकऱ्यांसाठीचे भाव पाडण्यासाठी साधन म्हणून वापरला जातो. शेतकऱ्यांच्या मदतीसाठी उभारण्यात आलेली यंत्रणा प्रत्यक्षामध्ये शेतकऱ्यांच्या विरोधात वापरली जाते. यामुळे जेव्हा कांद्याचे भाव पडतात तेव्हा पडलेल्या सरासरी भावाने नव्हे तर उत्पादन खर्चाच्या दीडपट भावाने सरकारने कांदा खरेदी केला तरच यातून शेतकऱ्यांना काही प्रमाणात दिलासा मिळू शकतो.(साभार मटा)

**-डॉ. अजित नवले**

## नवदाम्पत्याची अनोखी भेट

हल्ली लग्न म्हणजे प्रचंड खर्चाची बाब झाली आहे.देखावे,प्रचंड झगमगाट, सोने चांदीचा थाट असा काहीसा साज असतो.मात्र याला अपवाद नांदेडमधील एका विवाहाने एक नवीन धडा घालून दिला आहे . नांदेड मधील कंधार तालुक्यातील बहाद्दरपुरा येथील सिद्धेश्वर पेठकर यांचा विव्हाह नुकताच २० मे रोजी पार पडला. सामाजिक भान राखत या पेठकर कुटुंबीयांनी संपूर्ण गावाची विमा पॉलिसी काढली.गावातील सुमारे ३४६५ नागरिकांना प्रत्येकी एक लाख रुपयांचे विमा कवच त्यांनी दिले.विशेष म्हणजे गावातील एकही पात्र नागरिक या पासून वंचित राहू नये या दृष्टीने पेठकर कुटुंबीयांनी नियोजन केले होते.या विमा कवचामुळे सर्व गावकऱ्यांचे जीवन सुखकर होणार हाच एक आनंद पेठकर कुटुंबीयांनी व्यक्त केला आहे.जेणेकरून त्याचा समाजाला उपयोग होईल.

**शांताराम वाघ**

## चायनिज पदार्थ हानिकारकच

अनेकजण बाहेर जेवायला जायचे म्हटले तर बरेच जण चायनिज पदार्थांचाच बेत करतात. मात्र भारतात आणि चीनमध्ये मिळणाऱ्या पदार्थात खूप फरक आहे. भारतात चायनिज पदार्थांच्या नावाखाली जिभेला पूरक ठरतील असे चवीचे पदार्थ तयार केले जातात. रस्त्याशेजारी, फुटपाथवर, गल्लीबोळात स्वस्त आणि सहज मिळणारे गडावरील चायनिज पदार्थ खाण्याकडे सर्वांचा कल असते त्यातही या गाड्यांवर तरुणाईच अधिक दिसते.चायनिज गाड्यांवर तरुणाईची झुंबड उडाल्याचे दिसते.हॉटेल आणि रेस्टॉरंटच्या तुलनेत येथे स्वस्तात पदार्थ मिळतात हे त्या मागचे मुख्य कारण आहे. त्यात निकृष्ट प्रकारच्या पदार्थांच्या भाज्या आणि तेल वापरले जाते. चायनिज पदार्थांमध्ये अजिनिमोटो हा पदार्थ वापरला जातो. पदार्थांना चव आणण्यासाठी या पदार्थांचा वापर केला जातो. आवश्यकतेपेक्षा जास्त अजिनिमोटो हा पदार्थ वापरला गेला तर त्याचा परिणाम पचनसंस्थेवर होऊ शकतो. चायनिज पदार्थांमध्ये मोनोसोडियम ग्लुटामेट, शेजवान सॉस, कृत्रिम रंग, स्टार्च कॉर्न यासारखे जिन्नस वापरल्यामुळे पचन संस्था बिघडू शकते. भात बांबूचे मूळ, मशरूम, नूडल्स, चिकन, मांस अर्धवट शिजवले जातात त्यामुळे ते पचायला जड जातात चांगल्या प्रतीचा मैदा नसल्यास तो आतड्यास चिकटू शकतो. चायनिज पदार्थांमध्ये वापरला जाणारा तांदूळही पॉलिश आणि रिफाईंड असल्याने पचन संस्थेसाठी हितकारक नसतो. त्यामुळे चायनिज पदार्थांचे सेवन आरोग्यासाठी हानिकारकच आहे.

**श्याम ठाणेदार**

## महत्वकांक्षी निर्णय!

महाराष्ट्राचे व्हिजन डॉक्युमेंट -२०४७ अंतर्गत मराठी भाषेला जागतिक स्तरावर पोहोचविण्यासाठी राज्य सरकारने मराठी पाचशे पुस्तकांचे जगातील पन्नास भाषांमध्ये भाषांतर करण्याचा घेतलेला महत्वकांक्षी निर्णय समाधान देणारा आहे. यामुळे मराठी साहित्याचा जागतिक स्तरावर प्रसार होऊन विविधांगी साहित्याची ओळख जगापुढे जाईलच शिवाय त्यांनाही त्यांच्या भाषेतून मराठी साहित्याची सहजतेने, चांगल्या प्रकारे ओळख होईल असे म्हणावयास हरकत नाही.मात्र हे भाषांतर पुस्तकाच्या मुळ नावासह, लेखकाचे विचार, पुस्तकाची मूळ संकल्पना, आशय लेखन याला धक्का न लागता तो कायम रहावा एवढीच माफक अपेक्षा. कारण भविष्यात एखादं भाषांतरित साहित्य वादाचा विषय ठरू नये इतकेच.

**विश्वनाथ पंडित**

## भारतात नद्याजोड प्रकल्प राबवावा

सातत्याने होणारा हवामानातील बदल, अवेळी पडणारा पाऊस यामुळे काही ठिकाणी जास्त तर कुठे कमी पाऊस पडतो त्यामुळे गंभीर परिस्थिती निर्माण होवून अनेकांना फटका बसतो. त्यावर मात करायची असेल तर 'नदी जोड प्रकल्प.' संपुर्ण देशांमध्ये राबवून जलसंपत्तीच्या अधिक प्रभावी आणि सुयोग्य वापरासाठी हा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. मराठवाडा, विदर्भ आणि दुष्काळ यासह राज्यातील पाणीटंचाई, सिंचनाची गरज, आणि जलस्त्रोतांचा अपुरा वापर लक्षात घेता, विविध नद्या एकमेकांशी जोडणे महत्वाचे आहे. यामुळे विविध जिल्ह्यांमध्ये पाणीपुरवठा, सिंचन सुविधा आणि जलस्त्रोतांच्या संरक्षणाला प्रोत्साहन मिळू शकते.विदर्भ, मराठवाडा भागांमध्ये पाणीटंचाई ही मोठी समस्या आहे. पाणीटंचाईमुळे कृषी उत्पादनावर साहजिकच वाईट परिणाम होत असतो तसेच, नागरी क्षेत्रांमध्येही पाण्याचा प्रचंड तुटवडा जाणवतो. पाण्याच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे शेतकऱ्यांना व शेतीला मोठ्या प्रमाणावर संकटांचा सामना करावा लागतो. या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी 'नदी जोड प्रकल्प' एक महत्त्वपूर्ण उपाय ठरू शकतो.नदीजोड प्रकल्पातून मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातील सिंचन व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास मोठी मदत होणार आहे.

**राजू जाधव**

शुक्रवार, दि. २९ मे २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

# काँग्रेसने समाजात फूट पाडली, संविधानाच्या चौकटीतच देश पुढे जाईल - रामदास आठवले

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. २८ :** रामदास आठवले सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री यांनी यवतमाळ येथे आयोजित पत्रकार परिषदेत संविधान, आरक्षण, सामाजिक सलोखा आणि राज्यातील राजकीय परिस्थितीवर भाष्य करत विरोधका सह मित्रपक्षांना सल्ला देत जोरदार टीका केली. कालकथीत रूपाताई नागसेन मानकर यांच्या अर्धाकृती पुतळ्याच्या लोकार्पण कार्यक्रमासाठी ते यवतमाळ येथे आले होते.

देशात प्रत्येक धर्माचे सण-उत्सव शांततेत आणि उत्साहात साजरे झाले पाहिजेत, असे सांगत मुस्लिम समाजाच्या धार्मिक कार्यक्रमांनाही सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. काही भागांत नमाज पठणावेळी किरकोळ वाद झाले असले तरी कोणताही गंभीर अनुचित प्रकार घडलेला नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. हिंदू-मुस्लिम, जातीय किंवा भाषावादाचे प्रश्न देशात नवीन नसून संविधानाच्या चौकटीत राहूनच सर्वांनी वागले पाहिजे, असे त्यांनी म्हटले. संविधानिक शपथ घेतलेल्या व्यक्तींनी वादग्रस्त वक्तव्ये टाळावीत, असा अप्रत्यक्ष टोला त्यांनी राणे यांना लगावला. काँग्रेस पक्षाने समाजात फूट पाडण्याचे काम केले असून आजही दलितांवरील अत्याचार थांबले नसल्याचा आरोप त्यांनी केला. मुस्लिम समाजालाही ईडब्ल्यूएस आरक्षणाचा लाभ मिळणार असल्याचे सांगत लोकसंख्या नियंत्रणाबाबत "हम दो, हमारे दो" या सूत्राचे पालन करण्याचे आवाहन त्यांनी केले. एससी प्रवर्गातील उपवर्गीकरणाबाबत सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानंतर समिती स्थापन झाल्याचे त्यांनी सांगितले. शिक्षणाच्या अभावामुळे काही समाजघटक आरक्षणाचा पुरेसा लाभ घेऊ शकले नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांमुळे वंचित समाजाला नवी दिशा मिळाल्याचे ते म्हणाले. काँग्रेस पक्षावर टीका करताना "गांधी टोपी घालून गांधी होता येत नाही," असे म्हणत काँग्रेसने समाजात फूट पाडण्याचे काम केल्याचा आरोप त्यांनी केला. राहुल गांधी यांच्यावर निशाणा साधताना ते कायम विरोधी पक्षनेते म्हणूनच दिसतील, असा टोला त्यांनी लगावला. आपण स्वतः अनेक वर्ष काँग्रेसमध्ये राहिलो आणि मंत्रीपद ही भूषविले, मात्र काँग्रेसची भूमिका समाजाला विभाजित करणारी असल्याचे त्यांनी नमूद केले. राजकीय समीकरणांवर भाष्य करताना रिपब्लिकन पक्षाला भविष्यात अधिक राजकीय वाटा मिळावा, अशी मागणी त्यांनी केली. पेट्रोल, डिझेल आणि गॅस दरवाढीमागे आखाती देशांतील युद्धस्थिती कारणीभूत असल्याचे सांगत राज्य सरकार शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सकारात्मक भूमिका घेत असल्याचे त्यांनी नमूद केले. या पत्रकार परिषदेला सुधाकर तायडे, नवनीत महाजन, गोविंद मेश्राम,अश्विनी शेळके, मोहन भोयर यासह अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गजानन सुरोसे हत्येनंतर महागांवात संतापाचा उद्रेक

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ किरण नरवाडे

## आरोपींवर मकोका लावण्याची मागणी



**महागांव, दि. २८ :** उमरखेड तालुक्यातील सुकळी शिवारात उमरखेड–महागांव राष्ट्रीय महामार्गावर गोवंश तस्करी रोखण्याच्या प्रयत्नात गोरक्षक गजानन मारोती सुरोसे (रा. वडद-मुडाणा, ता. महागांव, जि. यवतमाळ) यांची निर्घृण हत्या झाल्यानंतर महागांव तालुक्यात संतापाची तीव्र लाट उसळली आहे.

समस्त हिंदू समाज, गोरक्षक संघटना आणि नागरिकांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवी यांना आक्रमक निवेदन सादर करत आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई करून फास्ट ट्रॅक न्यायालयात खटला चालवण्याची मागणी केली आहे. तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी यांच्या मार्फत सादर करण्यात आलेल्या निवेदनात राज्यातील वाढत्या गोतस्करीच्या घटनांवर तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. "गाय ही हिंदू समाजाच्या श्रद्धेचे प्रतीक असून भारतीय संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. गोवंश रक्षणासाठी जीव धोक्यात घालणाऱ्या गोरक्षकाची हत्या ही केवळ एका व्यक्तीची हत्या नसून हिंदू समाजाच्या भावनांवर झालेला थेट आघात आहे," असा संतप्त सूर निवेदनात उमटला.

निवेदनानुसार, २४ मे २०२६ रोजी उमरखेड परिसरात गोवंश तस्करी रोखण्याचा प्रयत्न करत असताना गजानन सुरोसे यांनी गोतस्करांना विरोध केला. त्यावेळी आरोपींनी त्यांच्यावर दगड व काठ्यांनी अमानुष हल्ला करून हत्या केली. या घटनेमुळे परिसरात भीती, संताप आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. आंदोलकांनी शासनासमोर कठोर मागण्यांची यादी मांडली आहे. महाराष्ट्र गोहत्या प्रतिबंधक कायद्याची राज्यभर कठोर अंमलबजावणी करावी, गोतस्करांवर तातडीने कठोर कारवाई करावी, आरोपींवर मकोका अंतर्गत गुन्हे दाखल करावेत तसेच गोरक्षकांना विशेष सुरक्षा द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय गजानन सुरोसे यांना "शहीद गोरक्षक" घोषित करून त्यांच्या कुटुंबाला ५० लाखांची आर्थिक मदत आणि एका सदस्याला शासकीय नोकरी देण्याची मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.

> **"गोसेवकांचे बलिदान व्यर्थ जाऊ देणार नाही. आरोपींना कठोर शिक्षा झाली नाही तर राज्यभर तीव्र आंदोलन छेडले जाईल," असा इशाराही आंदोलकांनी दिला.**
> **दरम्यान, या घटनेनंतर महागांव तालुक्यात वातावरण चांगलेच तापले असून विविध हिंदू संघटना आणि गोरक्षक बांधवांकडून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.**

# घटना-घडामोडी

## मनसे नेते राजू उंबरकरांसह तिघांवर मुकुटबन ठाण्यात गुन्हा दाखल

**झरी :** मनसेचे नेते राजू उंबरकर यांच्यासह तिघांविरुद्ध मुकुटबन पोलिसात मंगळवारी गुन्हा दाखल करण्यात आला. मुकुटबन येथील आरसीसीपीएल सिमेंट कंपनीत जाऊन कामगारांच्या प्रश्नावर तीव्र भूमिका घेतल्यानंतर कंपनी प्रशासनाच्या तक्रारीवरून ही कारवाई करण्यात आली. सविस्तर माहिती अशी की आरसीसीपीएल कंपनीच्या कामगारांना सुविधा देण्यात येत नसल्याचा आरोप करत राजू उंबरकर यांच्यासह कार्यकर्ते २२ मे रोजी कंपनीत गेले होते. याठिकाणी उंबरकर यांनी कामगारांच्या मागण्या लावून धरल्या कंपनीतील अधिकाऱ्यांशी चर्चा केली. या चर्चेचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले. राजू उंबरकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी अपमानास्पद वागणूक दिल्याचा आरोप आहे. यानंतर अधिकाऱ्यांनी पोलिसात तक्रार दिली त्यावरून राजू उंबरकर, फाल्गुन गोहोकार व सुरज गावंडे यांच्याविरूद्ध गुन्हे दाखल करण्यात आला आहे.

## आठवडी बाजारातील जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा..

**११ जण ताब्यात, ७५ हजारांचा मुद्देमाल जप्त**

**पांढरकवडा :** शहरातील आठवडी बाजार परिसरात खुलेआम सुरू असलेल्या अवैध जुगार अड्ड्यावर पांढरकवडा पोलिसांनी धडक कारवाई करत ११ जणांना ताब्यात घेतले. या कारवाईत रोख रक्कम व मोबाईल फोन सह एकूण ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून शहरात सुरू असलेल्या अवैधधंद्यां विरोधात पोलिसांनी आक्रमक भूमिका घेतल्याचे दिसून आले. दि. २७ मे २०२६ रोजी पोलीस स्टेशन पांढरकवडा येथे कार्यरत पोलीस हवालदार प्रमोद जुनुनकर यांना गोपनीय माहितीदारामार्फत माहिती मिळाली की, आठवडी बाजार परिसरात काही इसम पैशांची बाजी लावून "एक्का बादशहा" नावाचा जुगार खेळ खेळवत आहेत. माहितीची खातरजमा होताच पोलीस निरीक्षक एल. डी. तावरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक नितीन सुशिर व डी.बी. पथकाने घटनास्थळी अचानक धाड टाकली. छाप्यामध्ये राजेश प्रल्हाद शिडाम, बैरू देवू टेकाम, पळसराम हरी राठोड, विक्रम दत्तू व्यास, रामभाऊ तुकाराम जट्टेवार, शेख आसिफ शेख अकबर, संतोष नारायण पांगडू, वंश मीठाईलाल गुप्ता, शुभम गजानन टाले, मनोज मीठाईलाल गुप्ता व कैलास गंगाराम सोनेकार हे जुगार खेळताना आढळून आले. पोलिसांनी आरोपींकडून २९ हजार रुपयांची रोख रक्कम तसेच ४६ हजार रुपये किमतीचे ५ मोबाईल फोन असा एकूण ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

या प्रकरणी आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२ (अ) तसेच भारतीय दंड विधान कलम ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.


विशेष म्हणजे, शहरातील सार्वजनिक ठिकाणी सुरू असलेल्या अवैध जुगार अड्ड्यांमुळे युवकांमध्ये व्यसनाधीनता वाढत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. त्यामुळे पोलिसांनी केवळ कारवाईपुरते मर्यादित न राहता अशा अवैध धंद्यांचे कायमस्वरूपी समूळ उच्चाटन करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात तसेच सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी रॉबिन बन्सल यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत पोलीस उपनिरीक्षक नितीन सुशिर, पोलीस हवालदार आनंद अलचेवार, प्रमोद जुनुनकर, रजनिकांत पाटील, सुनिल राठोड, सचिन काकडे, राजू मुत्यलवार आणि नरेंद्र सूर्यवंशी यांनी सहभाग घेतला.

# महागाव नगर पंचायतीचा भोंगळ कारभार..!

## प्रभाग क्र. ८ अंधारात, घाणीने नागरिक हैराण दोन स्मरणपत्रांनंतर ही प्रशासन झोपेत.. ग्रामस्थांचा आंदोलनाचा इशारा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**महागाव, दि. २८ :** महागाव नगरपंचायतीच्या ढिसाळ आणि निष्क्रिय कारभारामुळे प्रभाग क्रमांक ८ मधील नागरिकांचे जीवन अक्षरशः त्रस्त झाले असून प्रशासनाच्या उदासीनतेविरोधात आता संतापाची लाट उसळली आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून प्रभागातील पथदिवे बंद असल्याने संपूर्ण परिसर अंधाराच्या छायेत गेला आहे, तर मुख्य नाली तुंबल्याने घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे.

कचरा, गाळ आणि साचलेल्या दूषित पाण्यामुळे परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. प्रभागातील नागरिकांनी २१ एप्रिल २०२६ रोजी नगरपंचायतीकडे लेखी अर्ज देऊन बंद पथदिवे दुरुस्त करणे व तुंबलेली नाली साफ करण्याची मागणी केली होती. मात्र प्रशासनाने कोणतीही दखल घेतली नाही. त्यानंतर २१ मे रोजी पुन्हा स्मरणपत्र देण्यात आले, तरीही परिस्थिती जैसे थेच असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. "नगरपंचायत फक्त कागदावरच चालते का?" असा सवाल आता ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे. तुंबलेल्या नाल्यांमुळे डासांचा प्रादुर्भाव वाढला असून मलेरिया, डेंग्यू यांसारख्या साथीच्या रोगांचा धोका निर्माण झाला आहे. रात्री अंधारामुळे महिला, ज्येष्ठ नागरिक व लहान मुलांना मोठा त्रास सहन करावा लागत असून चोरीसारख्या घटनांचीही भीती व्यक्त होत आहे. "जनतेच्या आरोग्याशी खेळणाऱ्या प्रशासनाने तात्काळ जागे व्हावे, अन्यथा नागरिकांना सोबत घेऊन नगरपंचायत कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा ओम कुसंगवार व समाधान कदम यांनी दिला आहे.

# रेती तस्करांच्या अवैध वाहतुकीने खुनी नदी पूल झाला मृत्यूचा सापळा

## रस्त्याची अक्षरशः चाळण जीव मुठीत धरून प्रवास, प्रशासन मात्र 'मूकदर्शक'

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ जगदीश गोलेवार



**झरी, दि. २८ :** तालुक्यातील टाकळी गावाजवळील खुनी नदीवरील पूल आणि पाटणबोरी-वणी मार्गाची अवस्था अत्यंत भयावह बनली असून अवैध रेती वाहतुकीमुळे संपूर्ण रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. रस्त्यावर पडलेल्या जीवघेण्या खड्ड्यांमुळे सामान्य नागरिकांना रोज जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

मात्र एवढ्या गंभीर परिस्थितीनंतर ही सार्वजनिक बांधकाम विभाग, महसूल प्रशासन आणि पोलीस यंत्रणा मात्र ढिम्म असल्याचे चित्र आहे. पाटणबोरी ते वणी या मुख्य मार्गावरून दिवस-रात्र अवजड वाहनांची वाहतूक सुरू असते. त्यातच खुनी नदीपात्रातून होणाऱ्या अवैध रेती उत्खननामुळे ओव्हरलोड ट्रॅक्टर आणि डंपर सुसाट धावत असल्याने रस्त्याची पूर्णपणे दुरवस्था झाली आहे. पुलावर आणि रस्त्यावर एवढे मोठमोठे खड्डे पडले आहेत की, "रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ता" हेच ओळखणे कठीण झाले आहे. या खड्ड्यांचा अंदाज न आल्याने दररोज दुचाकी आणि चारचाकी वाहनांचे अपघात होत आहेत. अनेक वाहनचालकांना किरकोळ तसेच गंभीर दुखापतींचा सामना करावा लागत असून हा मार्ग आता प्रवाशांसाठी अक्षरशः मृत्यूचा सापळा ठरत आहे. विशेष म्हणजे शाळकरी विद्यार्थी, रुग्णवाहिका आणि ग्रामीण भागातील नागरिकांना या मार्गावरून प्रवास करताना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, अवैध रेती तस्करांच्या बेकायदेशीर वाहतुकीमुळेच रस्त्याची ही अवस्था झाली आहे. मात्र महसूल व पोलीस प्रशासनाने या रेती माफियांवर कोणतीही ठोस कारवाई केलेली दिसून येत नाही. त्यामुळे प्रशासनाचे या अवैध धंद्याकडे जाणीवपूर्वक 'अर्थपूर्ण' दुर्लक्ष तर नाही ना? असा संतप्त सवाल नागरिक आता उघडपणे उपस्थित करत आहेत. दररोज अपघात होत असताना प्रशासनाला जाग येत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण आहे. एखादा मोठा जीवघेणा अपघात झाल्यानंतरच प्रशासन हालचाल करणार का? असा प्रश्न उपस्थित होत असून खुनी नदी पूल व संपूर्ण रस्त्याची तातडीने दुरुस्ती करून अवैध रेती वाहतुकीवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# "मुख्यालयी वास्तव्यास" खोटे दाखवून वेतन उचलणाऱ्यांवर कारवाई करा!

## अधिकारी-कर्मचाऱ्यां विरोधात जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**बाभूळगाव, दि. २८ :** तालुका स्तरावरील अनेक अधिकारी व कर्मचारी हे प्रत्यक्षात मुख्यालयी राहत नसतानाही खोटे प्रमाणपत्र सादर करून "मुख्यालयी वास्तव्यास" असल्याचे दाखवत मासिक वेतन घेत असल्याचा गंभीर आरोप तालुका विकास मंचाने केला आहे.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जिल्हाधिकारी यवतमाळ यांच्याकडे करण्यात आलेल्या लेखी तक्रारीतून करण्यात आली आहे. या तक्रारीमुळे प्रशासनात मोठी खळबळ उडाली आहे. तालुका विकास मंचाचे अध्यक्ष इंजिनिअर प्रकाश जानकर यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अनेक अधिकारी बाहेरगावाहून येत असल्यामुळे कार्यालयात वेळेवर उपस्थित राहत नाहीत. परिणामी ग्रामीण भागातून कामासाठी येणाऱ्या नागरिकांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागते. अधिकारी अनुपस्थित असताना मिटींगला गेले.दौऱ्यावर आहेत."आत्ताच बाहेर गेले. अशा कारणांनी नागरिकांची दिशाभूल केली जात असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. ऑनलाईन कामे, सर्व्हर डाऊन, लोडशेडिंग या समस्यांमुळे आधीच त्रस्त असलेल्या सर्वसामान्य नागरिकांना अधिकाऱ्यांच्या गैरहजेरीचा फटका बसत आहे. मजुरी बुडवून तालुक्याच्या ठिकाणी येणाऱ्या मजुरांना काम न होता परत जावे लागत असल्याने त्यांचे आर्थिक व मानसिक नुकसान होत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, या तक्रारीसोबत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची नावानिशी यादी जोडण्यात आली असून त्यामध्ये कोण मुख्यालयी राहतो आणि कोण राहत नाही, याची स्पष्ट नोंद करण्यात आली आहे. तालुका स्तरावरील केवळ दोन-तीन अधिकारीच प्रत्यक्ष मुख्यालयी वास्तव्यास असून उर्वरित अधिकारी खोटे कागदपत्र तयार करून शासनाची दिशाभूल करत असल्याचा गंभीर आरोप मंचाने केला आहे. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी उपविभागीय अधिकारी (महसूल) यांच्या मार्फत करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अन्यथा धरणे, निदर्शने व लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशारा इंजिनिअर प्रकाश जानकर यांनी दिला आहे. आता उपविभागीय अधिकारी महसूल यांच्या चौकशीतून नेमके काय सत्य समोर येते आणि प्रशासन दोषींवर कोणती कारवाई करते, याकडे बाभूळगाव तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# गोदावरी अर्बन मल्टिस्टेट क्रेडिट सोसायटीतर्फे वर्धापन दिनानिमित्त रुग्णांना फळवाटप

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ किरण नरवाडे



**महागाव, दि. २८ :** सामाजिक बांधिलकी जपत गोदावरी अर्बन मल्टिस्टेट क्रेडिट सोसायटी तर्फे शाखेच्या ८ व्या वर्धापन दिनानिमित्त ग्रामीण रुग्णालय, महागाव येथे दाखल रुग्णांना फळवाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. दिनांक २५ मे २०२६ रोजी आयोजित या कार्यक्रमातून रुग्णांना फळांचे वाटप करून त्यांच्या उत्तम आरोग्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

हा सामाजिक उपक्रम संस्थापक नामदार हेमंत भाऊ पाटील, अध्यक्षा राजश्री हेमंत पाटील,तसेच बोर्ड ऑफ डायरेक्टर्स यांच्या मार्गदर्शनाखाली आणि व्यवस्थापकीय संचालक श्री धनंजय तांबेकर साहेब यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आला. उपमहाव्यवस्थापक सुरेखा दवे व सहायक महाव्यवस्थापक रवी इंगळे आणि विजय शिर्मेवार यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. कार्यक्रमास तालुका आरोग्य अधिकारी डॉ. निमिष धुळधुळे, वैद्यकीय अधिकारी डॉ. राऊत व डॉ. नीलकंठ जाधव, कार्यक्रम सहाय्यक प्रभाकर मोरे तसेच आरोग्य सहाय्यक गोपाल ठाकरे उपस्थित होते. यावेळी शाखा अधिकारी शशांक ढोबळे, सहाय्यक अधिकारी सचिन हिंगडे, जया घड्याळे, रामेश्वर शिंदे, सुयोग साकळे, ओमकुमार भोयर, प्रवीण अढागळे, अमोल रावते यांच्यासह शाखेतील कर्मचारी उपस्थित होते. समाजाप्रती आपली सामाजिक जबाबदारी जपत भविष्यातही अशा प्रकारचे उपक्रम सातत्याने राबविण्यात येतील, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# ईद हा सर्वस्व त्यागाची शिकवण देणारा सण - मुफ्ती सय्यद मुन्नवर

## फुलसावंगी येथे ईद उल अजहा उत्साहात साजरी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ मनीष ढाले



**फुलसावंगी, दि. २८ :** स्थानिक फुलसावंगी येथे ईद उल अजहा अर्थात बकरीद मोठ्या उत्साहात व धार्मिक वातावरणात साजरी करण्यात आली. पहाटेपासूनच मुस्लिम बांधवांनी नवीन वस्त्र परिधान करून ईदगाह मैदान तसेच जामा मस्जिद परिसरात मोठी गर्दी केली होती.

ईदगाह मैदानावर विशेष नमाज अदा करण्यात आली. यावेळी जामा मस्जिदचे इमाम मुफ्ती सय्यद मुन्नवर यांनी उपस्थित मुस्लिम बांधवांना धार्मिक मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, प्रेषित इब्राहिम आणि प्रेषित इस्माईल यांनी अल्लाहच्या मार्गात आपल्या आयुष्यात असंख्य त्याग करून अल्लाहवरील असीम श्रद्धा सिद्ध केली. त्या महान त्यागाची आठवण कायम राहावी यासाठी ईद उल अजहा साजरी केली जाते. "ही ईद मानवाला अल्लाहच्या मार्गात सर्वस्व त्याग करण्याची शिकवण देते. समाजात प्रेम, बंधुता, त्याग आणि मानवतेचा संदेश देणे हेच या सणाचे मुख्य उद्दिष्ट आहे," असेही मुफ्ती सय्यद मुन्नवर यांनी सांगितले.नमाजनंतर मुस्लिम बांधवांनी एकमेकांना आलिंगन देत ईदच्या शुभेच्छा दिल्या. अनेक ठिकाणी गोरगरिबांना मदत व अन्नवाटपाचे कार्यक्रमही आयोजित करण्यात आले. संपूर्ण परिसरात आनंदाचे व उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.या वेळी फुलसावंगी सह काळी, टाकळी, नारळी, हिंगणी सह जवळच्या गावांच्या मुस्लिम बांधवानी या वेळी हजारो संख्येने ईद ची नमाज अदा केली.

# स्वा. सावरकर स्वातंत्र्य संग्रामातील प्रखर देशभक्त - संजीवरेड्डी बोदकुरवार



**वणी, दि. २८ :** स्वातंत्र्य संग्रामाच्या धगधगत्या यज्ञ कुंडामध्ये स्वतः सह पूर्ण कुटुंब झोकून देणारे जगातील एकमेव उदाहरण स्वा. विनायक दामोदर सावरकर यांचे आहे.त्यांची प्रत्येक कृती ही देश प्रेमाने ओतप्रोत भरलेले होती.

देशाच्या स्वातंत्र्यासाठी हालअपेष्ठा सहन करणारे स्वा. सावरकर हे स्वातंत्र्य संग्रामातील प्रखर देशभक्त होते. असे प्रतिपादन माजी आमदार संजीवरेड्डी बोदकुरवार यांनी केले.ते येथील सावरकर चौकात आयोजित सावरकर जयंती निमित्त कार्यक्रमात बोलत होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविकातून गजानन कासावार यांनी कार्यक्रमाची पार्श्वभूमी विशद करून या चौकात स्वा.सावरकर यांचे पोर्ट्रेट तयार व्हावे यासाठी आपण सर्वांनी मिळून पुढाकार घेण्याचे आवाहन केले.यावेळी उपस्थित मान्यवरांनी सावरकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर उपस्थितांचे आभार राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा कार्यवाह दीपक नवले यांनी केले. कार्यक्रमाला भाजपचे ज्येष्ठ नेते दिनकरराव पावडे, सावरकर जयंती समितीचे प्रमुख संजय दोरखंडे,समिती सदस्य सुरेश मोरे, अनिल पोटे, सुनील ठाकरे,एकनाथ मांडवकर, डॉ. अनिरुद्ध वैद्य, संतोष इनमुलवार, डहाळकर काका, विशाल झाडे,पुरुषोत्तम आक्केवार, रहीम शेख, सोनू शेख,.राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विभाग संपर्कप्रमुख प्रशांत भालेराव,नगर सहकार्यवाह कवडू पिंपळकर,विशाल काळे, गजानन कौरासे प्रामुख्याने उपस्थित होते. व अन्य सावरकरप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कोंडवाडा घोटाळ्याची चर्चा,३२८ बैलांचा हिशोब संशयात

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पांढरकवडा, दि. २८ :** नगर परिषद कोंडवाडा व्यवस्थापनावर गंभीर गैरव्यवहाराचे आरोप समोर आल्याने खळबळ उडाली आहे. पोलिसांनी विविध कारवायांमध्ये जप्त करून कोंडवाड्यात जमा केलेल्या तब्बल ३२८ बैलांचा स्पष्ट हिशोब उपलब्ध नसल्याचा आरोप सामाजिक संघटना व नागरिकांकडून करण्यात येत आहे. युवा टायगर फोर्सचे संयोजक अंकित नैताम यांच्या नेतृत्वाखाली प्रशासनाला निवेदन देत उच्चस्तरीय चौकशीची मागणी करण्यात आली. ठेकेदाराने करारनाम्यातील अटींचे उल्लंघन करत जनावरांची योग्य देखभाल, चारा-पाणी, वैद्यकीय सुविधा व नोंदवही व्यवस्थापनात हलगर्जीपणा केल्याचा आरोप करण्यात आला आहे.तसेच बैलांच्या कथित विक्रीचा संशय, डिझेल गैरव्यवहार आणि संगनमताने सुरू असलेल्या कमिशनखोरीची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. आणखी २८ बैल जमा झाल्याने परिस्थिती गंभीर बनली असून जनावरांची अमानुष हेलसांड होत असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. दोषींवर फौजदारी कारवाई करून संपूर्ण प्रकरणाचा लेखाजोखा जाहीर करावा, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

# २०२२ मधील अतिवृष्टीग्रस्त ३४ बाधित कुटुंबांचे पुनर्वसन अधांतरीच

## १ जूनपासून बेमुदत उपोषणाचा इशारा; जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**चांदूरबाजार/वार्ताहर**

तालुक्यातील फुबगाव-सैदापूर येथील २०२२ मधील अतिवृष्टी ग्रस्त ३४ बाधित कुटुंबांचे,पुनर्वसन अद्यापही अधांतरीच आहे. शासन व प्रशासनाने आश्वासन देऊनही चार वर्षांपासून पुनर्वसनाचा प्रश्न विनाकारण प्रलंबित ठेवला आहे.परिणामी चार वर्षां पासून प्रशासनाच्या लालफीतशाहीला कंटाळलेल्या ३४ बाधीतांनी जिल्हाधिकारी यांना लेखी निवेदन देऊन आपल्या व्यथा सांगितल्या. तसेच याप्रकरणी तातडीने कारवाई न झाल्यास १ जूनपासून चांदूरबाजार तहसील कार्यालयात पुढे बेमुदत उपोषणाचा इशारा प्रशासनाला दिला आहे.

फुबगावात १९ जुलै २०२२ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे दरड कोसळून मोठी दुर्घटना घडली होती. या दुर्घटनेत एकाच कुटुंबातील आई व मुलीचा मृत्यूही झाला होता. त्यानंतर जिल्हा प्रशासनाने बाधित कुटुंबांचे, तात्काळ पुनर्वसन करण्याचे आदेश दिले होते. मात्र जवळपास चार वर्षांचा कालावधी उलटूनही अद्याप ३४ बाधित कुटुंबांचे, कायमस्वरूपी पुनर्वसन करण्यात आलेले नाही असा आरोप बाधित नागरिकांनी केला आहे.

सध्या काही कुटुंबे जिल्हा परिषद शाळेत,एक कुटुंब समाज मंदिरात राहत आहे.या दोन्ही ठिकाणी जागा न मिळालेले काही कुटुंब, जीव मुठीत धरून त्याच धोकादायक घरात वास्तव्य करून आहेत.या कुटुंबांची आगामी पावसाळ्यात पुन्हा दरड कोसळून, जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.गावातील उपलब्ध शासकीय जागेवर पुराचा धोका असल्याने, योग्य ठिकाणी पुनर्वसन होऊ शकत नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. मौजा फुबगाव येथील वर्ग-१ गट क्रमांक १०९ व ११० चे मालक, रमेश चीचखेडे यांनी पुनर्वसनासाठी स्वतःची शेती देण्याची तयारी प्रशासनाकडे दर्शवली आहे .या संबंधी त्यांनी तहसीलदारांकडे लेखी संमती ही दिली आहे. असे निवेदनात निवेदनकर्त्या कडून स्पष्ट करण्यात आले आहे.तरी ही चार वर्षापासून,हा प्रश्न प्रलंबित कां? असे निवेदन कर्तव्याचे म्हणणे आहे.

या मागणीसाठी बाधित कुटुंबांनी २६ फेब्रुवारी २०२४ ते १ मार्च २०२४, दरम्यान स्थानिक तहसील कार्यालया समोर आमरण उपोषण केले होते. त्यावेळी तत्कालीन तहसीलदारांनी प्रस्ताव पाठवून कायमस्वरूपी पुनर्वसन करण्याचे लेखी आश्वासन दिले होते.मात्र यावर अद्याप ही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही.निवेदन देतेवेळी श्रीकृष्ण वऱ्हाडे, निरंजन कुरवाडे, दिलीप वऱ्हाडे,उत्तमराव वऱ्हाडे,राजू बोरवार ,दादाराव वऱ्हाडे,भारत वऱ्हाडे,विलास वऱ्हाडे,रमेश भानगे, रोशन वऱ्हाडे, देविदास वऱ्हाडे, अशोक वऱ्हाडे, निलेश वऱ्हाडे आदी उपस्थित होते.

## पीएम किसान योजनेच्या लाभासाठी ई-केवायसी आवश्यक

**अमरावती**-प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम किसान) योजनेचा लाभ घेणाऱ्या सर्व पात्र शेतकऱ्यांनी केंद्र व राज्य शासनाने योजनेतील सर्व लाभार्थ्यांसाठी वार्षिक ई-केवायसी प्रमाणीकरण पूर्ण करणे आवश्यक आहे. चालू वर्ष २०२५-२६ साठीची ही ई-केवायसी मोहीम पूर्ण करण्यासाठी ३० जून २०२६ ही अंतिम मुदत देण्यात आली आहे. विहित मुदतीत ई-केवायसी केली नसल्यास लाभार्थी शेतकरी आगामी हप्त्यांच्या लाभापासून वंचित राहू शकतील. योजनेतील पारदर्शकता वाढवणे, गैरप्रकार व गळती रोखणे आणि केवळ खऱ्या व जिवंत लाभार्थ्यांपर्यंतच योजनेचा पैसा पोहोचावा, हा या मोहिमेमागील मुख्य उद्देश आहे. यासाठी राज्यभरात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. लाभार्थी शेतकऱ्यांना बायोमॅट्रिक आणि फेस ऑथेंटिकेशन या दोन पद्धतींनी प्रमाणीकरण पूर्ण करता येईल. बायोमॅट्रिक प्रमाणीकरणाद्वारे ई-केवायसी करण्यासाठी शेतकरी नजीकच्या सामायिक सुविधा केंद्रावर जाऊ शकतील.

## आजपासून हलक्या व मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता

**अमरावती/का.प्र.**

मागील तीन आठवड्यांपासून शहर व जिल्ह्यात उष्णतेची तीव्र लाट कायम आहे. यातून शुक्रवार २९ मेपासून दिलासा मिळण्याची दाट शक्यता असून, तापमान दोन ते तीन अंशांनी घटणार आहे. याचवेळी हलक्या व मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. पावसासोबतच ताशी ४० ते ५० किमी वेगाने वारे वाहणार असल्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.



मंगळवारी शहरात दहा ते पंधरा मिनिटे पावसाने हजेरी लावली होती. त्या पावसामुळे तात्पुरता दिलासा मिळाला होता; मात्र बुधवारी सकाळपासून कडक ऊन आणि वातावरणातील आर्द्रता वाढली होती. त्यामुळे उन्हाच्या चटक्यांसोबतच येणारा घाम, अशा विचित्र अवस्थेमुळे नागरिक अक्षरशः वैतागले होते. या वर्षीचा उन्हाळा मागील अनेक वर्षांच्या तुलनेत अधिक तप्त सलग तीन ठरला आहे. आठवड्यांपासून अमरावतीचे तापमान ४५ अंशांच्या वर राहिले असून, अजूनही ते ४५ अंशांच्या खाली गेलेले नाही. यातील दोन आठवडे सलग 'हिटवेव्ह' (उष्णतेची लाट) जिल्ह्यात होती. बुधवारीसुद्धा जिल्ह्याला उष्णतेचा 'रेड अलर्ट' दिला होता. त्यानुसार जिल्ह्यात व शहरात सकाळपासून प्रचंड ऊन होते.

सोबतच मंगळवारी दुपारी झालेल्या पावसामुळे आर्द्रतेत अचानक वाढ झाली. एरवी २६ ते ३० टक्के असणारी आर्द्रता बुधवारी ५२ टक्क्यांपर्यंत पोहोचली. दरम्यान येणाऱ्या दोन दिवसानंतर महिनाभरापासून सुरू असलेल्या या उन्हाच्या भट्टीतून आता अमरावतीकरांची सुटका होणार असल्याची शक्यता आहे.

## ईद-उल-अजहा उत्साहात साजरी

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**



मुस्लिम समाजातील पवित्र सण ईद-उल-अजहा (बकरी ईद) शहरात धार्मिक उत्साहात आणि शांततेच्या वातावरणात साजरी करण्यात आली. सर्व धर्मीयांच्या भावना जपत मुस्लिम बांधवांनी मोठ्या श्रद्धेने ईदची नमाज अदा केली.

शहरातील ईदगाह मैदानावर हजारो मुस्लिम बांधवांनी सामूहिक नमाज पठण केले.यावेळी चांदूरवाडी, मांजरखेड, अमदोरी, धानोरा, सातेफळ आदी परिसरातील मुस्लिम बांधवही मोठ्या संख्येने उपस्थित होते. ईदगाह मैदानावर कारी साजीद यांनी नमाज पठण केले.तसेच कुऱ्हा रोडवरील चौकातील मस्जिदमध्ये आलीम अक्रम लाखानी यांनी सकाळी ६.४५ वाजता ईदची नमाज पठन केली. नमाजनंतर देशात शांतता, सुख-समृद्धी, राष्ट्रीय एकात्मता आणि विकास नांदो, अशी प्रार्थना मुस्लिम बांधवांनी केली.यानंतर सर्वांनी एकमेकांना गळाभेट देत ईदच्या शुभेच्छा दिल्या. दरम्यान, ईदगाह परिसरात पीएसआय नंदलाल लिंगोट यांच्या नेतृत्वाखाली पोलीस कर्मचाऱ्यांचा चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

## अचलपुरात ईद-उल-अजहाची नमाज अदा

**अचलपूर/वार्ताहर**



शहरात ईद-उल-अजहा (बकरी ईद) हा सण धार्मिक उत्साह,शांतता आणि बंधुभावाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. शहरातील ऐतिहासिक ईदगाह मैदानावर सकाळी मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव एकत्र येऊन ईद-उल-अजहाची नमाज अदा केली.सकाळी सुमारे ८ वाजता जामा मशिदीतून शहराचे खतीब आल-ए-रसूल सय्यद सगीर हुसेन साहेब यांच्या नेतृत्वाखाली ईदगाहकडे जुलूस काढण्यात आला. या जुलूसमध्ये मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते. शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने ईदची नमाज अदा करण्यात आली.

या सणाच्या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासनाकडून कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती. ईदगाह परिसर तसेच आजूबाजूच्या भागात मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. त्यामुळे संपूर्ण कार्यक्रम शांततेत पार पडला.ईदच्या नमाजेनंतर जमील मास्टर, डॉ. रहमान, मतीन इंजिनियर, फिरोज खान, सय्यद गाणी, अमीन भाई, अब्दुल कादिर सौदागर, मुनाफ सौदागर, मोहम्मद सादिक उर्फ कल्लू चानस, खालिद जागीरदार, झहीर सर, रिजवान पहलवान, हादी सर, जुनैद हजरत शाही इमाम, अब्दुल खालिक मेकॅनिकल, कैसर बाबू यांच्यासह हजारो नागरिकांनी एकमेकांना ईद-उल-अजहाच्या शुभेच्छा देत सामाजिक ऐक्य आणि बंधुभावाचा संदेश दिला.

## जी. एच. रायसोनी विद्यापीठाच्या हॉटेल मॅनेजमेंटच्या विद्यार्थ्यांना १०० टक्के प्लेसमेंट

**अमरावती/का.प्र.**

जी एच रायसोनी विद्यापीठाच्या आतिथ्य शिक्षण क्षेत्रातील आपली उत्कृष्टता पुन्हा एकदा सिद्ध केली असून, स्कूल ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजीच्या पदवी प्राप्त विद्यार्थ्यांना नामांकित राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय हॉस्पिटॅलिटी ब्रँड्समध्ये १०० टक्के ट्रेनिंग अँड प्लेसमेंट मिळाले आहे.



विद्यार्थ्यांची निवड McDonald's, The Orchid Hotel, Radisson Blu, The Park Hyderabad, Conrad Pune तसेच Radisson Blu Crystal Beach Resort Belle Mare, Mauritius यांसारख्या प्रतिष्ठित संस्थांमध्ये झाली आहे. मॉरिशसमधील आंतरराष्ट्रीय ट्रेनिंग अँड प्लेसमेंटच्या संधीमुळे विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील अनुभव व उज्ज्वल करिअरच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.प्रशिक्षण व प्लेसमेंट विभाग तसेच प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल अभिमान व्यक्त केला असून, या यशामुळे जागतिक हॉस्पिटॅलिटी ब्रँड्सचा विद्यापीठाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणावर आणि विद्यार्थ्यांच्या कौशल्यांवर असलेला विश्वास अधिक दृढ झाल्याचे त्यांनी नमूद केले.

## कौंडण्यपूर येथे दोन वृद्धांचे मंगळसूत्र लांबविले

### नदी काठावरील घटना

**कुऱ्हा/वार्ताहर**

श्रीक्षेत्र कौंडण्यपूर येथे दर्शनासाठी आलेल्या दोन वृद्धांच्या गळ्यातील एकूण ४७ ग्रॅम सोन्याचे दोन मंगळसूत्र लांबविण्यात आले. ही घटना बुधवार, २७ मे रोजी सकाळी ९.३० वाजताच्या सुमारास नदी काठावर घडली.

बुलडाणा येथील रहिवासी एक ८० वर्षीय वृद्धा ही आपल्या नातेवाइकांसह बुधवारी सकाळी श्रीक्षेत्र कौंडण्यपूर येथे दर्शनासाठी आली होती. दर्शन आटोपल्यावर त्या आपल्या ७५ वर्षीय बहिणीसोबत नदी काठावर पूजा करायला गेल्या. दोघी बहिणी पूजा करीत असताना एका अनोळखी महिलेने अचानक त्यांना धक्का दिला. त्यानंतर ती महिला तेथून निघून गेली. दरम्यान, महिला निघून गेल्यावर दोन्ही बहिणींना आपल्या गळ्यातील मंगळसूत्र दिसून आले नाही. मंगळसूत्र चोरी गेल्याचे लक्षात आल्यावर ८० वर्षीय वृद्धेने कुऱ्हा ठाणे गाठून तक्रार दाखल केली. एकूण ४७ ग्रॅम सोन्याचे दोन मंगळसूत्र लांबविण्यात आल्याचे त्यांनी पोलिसांना सांगितले.

## खानापूर गावाला दहा दिवसांनी पाणीपुरवठा

### प्रशासनाविरोधात संताप

**मोशी/वार्ताहर**



विकासाच्या घोषणा आणि मोठमोठ्या आश्वासनांच्या गजरात खानापूर गावातील नागरिक मात्र मूलभूत सुविधेसाठी झगडत आहेत. गावात नागरिकांना दर दहा दिवसांनी पाणीपुरवठा होत असल्याने तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. महिला, शेतकरी, मजूर व सर्वसामान्य कुटुंबांना पाण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागत असून प्रशासनाच्या उदासीन भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

या गंभीर समस्येला सामाजिक कार्यकर्ते संदीप भदाडे यांच्या पुढाकाराने वाचा फोडण्याचे काम करण्यात आले आहे. गावकऱ्यांच्या अडचणी समोर आणत प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न त्यांनी केला असून, खानापूरच्या पाणीप्रश्नी तातडीने ठोस उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.'नागरिकांना दहा-दहा दिवस पाण्याची वाट पाहावी लागणे ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे. कर भरणाऱ्या जनतेला हक्काचे पाणी मिळत नसेल तर विकासाच्या दाव्यांचा उपयोग काय?' असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे. खानापूरच्या नागरिकांचा संयम आता संपत चालला असून, प्रशासनाने कागदी आश्वासने न देता प्रत्यक्ष कृती करून गावाचा पाणीप्रश्न मार्गी लावावा, अशी जोरदार मागणी होत आहे.'विकासाच्या घोषणा नकोतष्ठ खानापूरला हक्काचे पाणी द्या!संदिप भदाडे,विजय ठाकरे, अन्सार मन्सुरी, मंगेश बोराळकर,हरी खडसे, दिनेश पानपगार, प्रदीप ठाकरे, योगेश ढोमणे, संतोष तिहीले,तेजस भदाडे अशी आक्रमक भूमिका ग्रामस्थांनी घेतली आहे.


## संक्षिप्त

### जनगणना- २०२७ अंतर्गत पहिल्या टप्प्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

**अमरावती**-भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने जनगणना २०२७ अंतर्गत पहिला टप्पा अर्थात घर सूचीकरण व गृहनिर्माण जनगणना राज्यभर राबविण्यात येत आहे. हा राष्ट्रीय उपक्रम महत्त्वाच्या असून भविष्यातील नियोजन, धोरणनिर्मिती तसेच संसाधनांचे न्याय्य वितरण यासाठी अत्यंत महत्वपूर्ण आहे. महाराष्ट्र राज्यात या पहिल्या टप्प्यांतर्गत स्व-गणना कालावधी १ ते १५ मे या कालावधीत पार पडला असून नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सक्रिय सहभाग नोंदविला आहे.यानंतर प्रत्यक्ष घरभेटीमार्फत गणना १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. या कालावधीत जनगणना अधिकारी, प्रगणक व पर्यवेक्षक नागरिकांच्या घरांना भेट देऊन आवश्यक माहिती संकलित करतील. जनगणना अधिनियम, १९४८ व त्याअंतर्गत नियमांनुसार अचूक माहिती प्रदान करणे बंधनकारक असून नागरिकांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक माहिती उपलब्ध करून सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत सर्व शासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच नागरिकांना जनगणना २०२७ उपक्रमात सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. जनगणना प्रक्रिया यशस्वी करण्यासाठी सर्व घटकांचे सहकार्य आवश्यक असल्याचेही प्रशासनाने नमूद केले आहे.

### महिमा ग्रंथांचे सामूहिक पारायण ७ रोजी

**अमरावती**-श्री परमहंस परशराम महाराज सेवाधारी परिवार,



जळतापूर/पिंपळोद यांच्या वतीने रविवार,७ जून रोजी श्रीक्षेत्र शेगाव येथे भव्य सामूहिक पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. श्री परमहंस परशराम महाराज यांच्या महिमा ग्रंथांचे पारायण सकाळी ८.३० वाजता सुरू होणार असून हा ऐतिहासिक सोहळा श्री माहेश्वरी भवन, एसटी स्टँड समोर, शेगाव, जिल्हा बुलढाणा येथे संपन्न होणार आहे.या धार्मिक व ऐतिहासिक सोहळ्यात मोठ्या संख्येने भाविकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. तसेच आदल्या दिवशी येणाऱ्या भक्तांसाठी शनिवार दिनांक ६ जून रोजी श्री माहेश्वरी भवन येथे निवासाची विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. सोहळ्याचे आयोजन श्री परमहंस परशराम महाराज सेवाधारी परिवार, जळतापूर/पिंपळोद यांच्या वतीने करण्यात आले असून विविध भागांतील सेवाधारी व समाजबांधव या आयोजनात सक्रिय सहभाग घेत आहेत.आयोजक सेवाधारी म्हणून जयंत वानखडे, गोकुळभाऊ शेगोकर, शंकरराव खवले, अध्यक्ष, श्री. शैव गुरव हितकारणी मंडळ, अमरावतीचे अध्यक्ष शरदराव देवरणकर, श्री.निळकंठेश्वर संस्था अध्यक्ष, अमरावती जयंत पुसदकर, भालचंद्र कथलकर, राजू कथलकर, अशोक भारसाकळे, प्रशांत देशमुख, परशराम डोरस, पुरुषोत्तम खंडार, सुरेश रोहनकर, कैलास डांगे, शुभम पुसतकर, ओम मोरे, मोहन पंडीत, दिपक राजनकर, संतोष दुत्तोंडे, अशोक आगरकर, चंद्रकांत पुसदकर, दत्ता कापसे, सचिन चौधरी, गणेश भांडे, सचिन आरोकर, संदीप राजूरकर, हरिहर तांबस्कर, प्रभाकर शेगोकर, महेंद्र कथलकर, श्रीरामशंकर जयस्वाल, दिलीप बेलबागकर, मनोज तायडे, राजू पुसतकर, दत्ता शिंदे, अनिल निहाटकर व नारायण डांडगे हे विशेष परिश्रम घेत आहेत.

### हव्याप्र मंडळात २१ दिवसीय योग प्रशिक्षण



**अमरावती**-जागतिक योग दिनाचे औचित्य साधून श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीतर्फे सर्वांसाठी १ते २१ जून २०२६ या कालावधीत २१ दिवसीय निःशुल्क सामान्य योग अभ्यासक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.हा अभ्यासक्रम दररोज सकाळी ६.३० ते ७.३० या वेळेत ऑनलाइन पद्धतीने घेण्यात येईल. विशेष म्हणजे अमरावती जिल्ह्यातील विविध ऐतिहासिक व धार्मिक स्थळांवरून योगाचे प्रात्यक्षिक सादर करण्यात येणार असून त्यामध्ये माता अंबादेवी मंदिर, एकवीरा देवी मंदिर, कोंडेश्वर मंदिर, गविलगड किल्ला, गजाननधाम मंदिर, श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाची मुख्य इमारत, श्रीकृष्ण मंदिर, शिव टेकडी, स्वामी समर्थ मंदिर आदी ठिकाणांचा समावेश आहे. या सर्व कार्यक्रमांचे थेट प्रक्षेपण 'Department of Yoga, DCPE HVPM' या युट्यूब चॅनेलवर करण्यात येणार आहे.अभ्यासक्रमाचा लाभ जास्तीत जास्त योगसाधक, विद्यार्थी, शिक्षक आणि नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे यांनी केले आहे. अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्या सर्व सहभागींच्या ऑनलाइन प्रमाणपत्राने गौरव करण्यात येणार आहे. अभ्यासक्रमात सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी ८२७५७५३६४८ या क्रमांकावर व्हॉट्सअॅप संदेश पाठवावा किंवा योगशास्त्र विभाग, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावती येथे संपर्क साधावा, असे आवाहन योगशास्त्र विभागप्रमुख डॉ. सुनील लबडे यांनी केले आहे.

## शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅक नोंदणी त्वरीत पूर्ण करावी

### जिल्हा प्रशासनाचे आवाहन

**अमरावती/का.प्र.**

किसान सन्मान निधीचा लाभ संबंधित शेतकऱ्यांना येत्या कालावधीत मिळणार आहे. हा लाभ शेतकऱ्यांना तातडीने मिळावा, यासाठी जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅक नोंदणी त्वरीत पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

राज्य आणि केंद्र शासनाच्या मदतीचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत सुरळीत पोहोचवण्यासाठी आणि भविष्यातील सर्व योजनांसाठी पात्र होण्यासाठी सर्व शेतकऱ्यांना ॲग्रीस्टॅकची नोंदणी त्वरीत पूर्ण करावी लागणार आहे. शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅक नोंदणीसाठी आपला गाव नमुना, सातबारा उतारा व आधार कार्डसह आपले सरकार सेवा केंद्रावर जावून नोंदणी करून 'फार्मर आयडी' प्राप्त करून घ्यावा.

जिल्ह्यात अचलपूर ७ हजार ७२१, अमरावती १४ हजार ४७९, अंजनगाव सुर्जी ५ हजार ४११, भातकुली ७ हजार २०८, चांदूर रेल्वे ४ हजार १६४, चांदूरबाजार ८ हजार ३३४, चिखलदरा १ हजार ५५९, दर्यापूर ९ हजार ४०८, धामणगाव रेल्वे ५ हजार ८२१, मोर्शी ९ हजार १७६, नांदगाव खंडेश्वर ८ हजार ८९३, तिवसा ६ हजार ४७२, वरूड ८ हजार ७४९ खातेदार ॲग्रीस्टॅक नोंदणी करण्यापासून शिल्लक आहेत. मात्र धारणी तालुक्यात अधिकचे ७३१ खातेदार नोंदणी झाली आहे.

जिल्ह्यात एकूण ५ लाख १६ हजार १९५ खातेदार असून आतापर्यंत ४ लाख २२ हजार ६४९ खातेदारांची नोंदणी झाली आहे. अद्यापही ९३ हजार ५४६ खातेदारांची नोंदणी शिल्लक आहे. त्यामुळे ॲग्रीस्टॅक नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करून सर्व शेतकऱ्यांनी शासकीय योजनांच्या लाभासाठी पात्र व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.

# काय भारतीय भाषा परकीय भाषांच्या तुलनेत कनिष्ठ आहेत?

**प्रोफेसर श्रीनिवास वरखेडी**
**पंडित गंगाधर पाठक**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने इयत्ता नववीमध्ये त्रिभाषा सूत्र (R–3) लागू करण्याच्या निर्णयावरून सुरू असलेली चर्चा ही केवळ शैक्षणिक विषयापुरती मर्यादित नाही; तर ती भारताच्या सांस्कृतिक सातत्य, संज्ञानात्मक विकास, घटनात्मक भावना आणि शैक्षणिक समावेशनाशी निगडित असलेली अत्यंत महत्त्वाची बाब आहे. या धोरणाविरोधात दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेमुळे असा गंभीर प्रश्न निर्माण होतो की, एक मर्यादित पण प्रभावशाली वर्ग अशा परिवर्तनकारी शैक्षणिक सुधारणेला अडथळा आणण्याचा प्रयत्न करताहेत, ज्याचा लाभ भारतातील बहुसंख्य विद्यार्थ्यांना होणार आहे? ही जनहित याचिका सहाव्या इयत्तेपासून परकीय भाषांच्या शिक्षणाची मागणी करते, जेणेकरून संपन्न कुटुंबांतील मुले जर्मनी, फ्रान्स, जपान इत्यादी देशांमध्ये उच्च शिक्षणासाठी जाऊ शकतील.

भारत हा केवळ राजकीय संघ नाही; ते एक प्राचीन सांस्कृतिक राष्ट्र आहे, ज्याची पायाभरणी भाषिक विविधता आणि सांस्कृतिक परस्परसंबंधांवर उभी आहे. भारतीय भाषा या फक्त संवादाची साधने नसून, त्या हजारो वर्षांपासून चालत आलेल्या ज्ञानपरंपरा, मूल्यव्यवस्था, विज्ञान, कला, साहित्य, लोकबुद्धी आणि सांस्कृतिक चेतनेच्या वाहक आहेत. त्यामुळे भारतीय भाषांना बळकटी देणारे कोणतेही शैक्षणिक धोरण प्रत्यक्षात भारतालाच अधिक सक्षम बनवते.

इयत्ता नववीमध्ये R–3 ची अंमलबजावणी ही नवीन शैक्षणिक धोरण २०२० च्या दृष्टिकोनाशी पूर्णतः सुसंगत आहे. नवीन शैक्षणिक धोरण २०२० बहुभाषिकता, मातृभाषा-आधारित शिक्षण आणि भारतीय भाषांच्या संवर्धनाला, सर्वांगीण शिक्षण व राष्ट्रीय एकात्मतेचा पाया मानते. हे धोरण अशा व्यापक




संशोधनांवर आधारित आहे ज्यातून सिद्ध झाले आहे की विद्यार्थी परिचित भाषिक वातावरणात अधिक परिणामकारकपणे शिकतात, सखोल चिंतन करतात आणि भावनिक तसेच बौद्धिकदृष्ट्या अधिक विकसित होतात.

या धोरणाला विरोध करणारा वर्ग प्रत्यक्षात अत्यंत मर्यादित आहे — कदाचित एक किंवा दोन टक्के विद्यार्थी, संस्था, प्रकाशक किंवा शहरी अभिजन वर्ग, ज्यांची शैक्षणिक प्रवृत्ती परकीय भाषांच्या वर्चस्वाकडे अधिक झुकलेली आहे. निःसंशय प्रत्येक नागरिकाला आपली मते व्यक्त करण्याचा लोकशाहीत अधिकार आहे; परंतु हेही विचारात घ्यायला हवे की अल्पसंख्यक वर्गाच्या पसंतीमुळे देशातील जवळ-जवळ अठ्ठ्याण्णव किंवा नव्याण्णव टक्के विद्यार्थ्यांना त्या भारतीय भाषेच्या अध्ययनापासून वंचित ठेवणे योग्य ठरेल काय, जी त्यांनी आठवीपर्यंत शिकलेली आहे?

हा विषय परकीय भाषांच्या विरोधाचा नाही. भारताने नेहमीच जगातील ज्ञानपरंपरांचे स्वागत केले आहे. संस्कृत पंडितांनी ग्रीक खगोलशास्त्राचा अभ्यास केला, भारतीय गणितज्ञांनी फारसी आणि अरबी विद्वत्तेशी संवाद साधला आणि आजही भारतीय विद्यार्थी इंग्रजीसह अनेक आंतरराष्ट्रीय भाषा शिकतात. खरा प्रश्न संतुलनाचा आहे. जो समाज स्वतःच्या भाषांकडे दुर्लक्ष करतो, तो हळूहळू आपला सांस्कृतिक आत्मविश्वास, बौद्धिक स्वायत्तता आणि सामाजिक समावेशकता गमावतो.

इयत्ता दहावीपर्यंत भारतीय भाषांच्या अध्ययनाची सातत्यपूर्ण संधी अनेक दृष्टींनी लाभदायक आहे.

**१. संज्ञानात्मक विकास-** बहुभाषिक शिक्षण स्मरणशक्ती, सर्जनशीलता, विश्लेषणात्मक क्षमता आणि समस्या-निवारण कौशल्यांचा विकास करते. अनेक भारतीय भाषांमध्ये प्राविण्य असलेले विद्यार्थी उच्च शिक्षण आणि सामाजिक सहभागामध्ये अधिक सक्षम ठरतात.

**२. सामाजिक समावेशन-** भारतीय भाषा शिक्षणाचे लोकशाहीकरण करतात. परकीय भाषांच्या अति श्रेष्ठतावादी प्रवृत्तीमुळे कृत्रिम शैक्षणिक अभिजनवाद निर्माण होतो, ज्यामुळे ग्रामीण, वनवासी, गिरिवासी आणि आर्थिकदृष्ट्या वंचित विद्यार्थ्यांना असमानतेचा सामना करावा लागतो.

**३. सांस्कृतिक सातत्य-** भाषा या साहित्य, लोककथा, तत्त्वज्ञान, स्थानिक ज्ञान आणि नैतिक परंपरांच्या संरक्षिका असतात. विद्यार्थ्यांना त्यांच्या भाषांपासून दूर करणे म्हणजे त्यांना त्यांच्या मुळांपासून दूर करणे होय.

**४. राष्ट्रीय एकात्मता-** भारतीय भाषांचा अभ्यास विविध प्रदेशांमधील परस्पर समज वाढवतो आणि भारताच्या विविधतेतील भावनिक ऐक्य अधिक दृढ करतो.

**५. शैक्षणिक समता-** कोट्यवधी विद्यार्थी आठवीपर्यंत एखाद्या भारतीय भाषेचे अध्ययन केलेले असतात. त्यांना आणखी दोन वर्षे अभ्यासाची संधी देणे म्हणजे शैक्षणिक सातत्य आणि अधिक सखोल प्राविण्य सुनिश्चित करणे होय.

या उपक्रमाविरोधातील जनहित याचिका एक दुर्दैवी संदेशही देऊन जाते-जणू भारतीय भाषा परकीय भाषांच्या तुलनेत गौण किंवा कमी महत्त्वाच्या आहेत. अशी मानसिकता सांस्कृतिक आत्मविश्वास आणि बौद्धिक स्वातंत्र्यावर आधारित 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनेच्या विरोधात आहे. राष्ट्राची एकता कोणत्याही व्यक्तीच्या वैयक्तिक हितापेक्षा अधिक महत्त्वाची आहे. परकीय भाषांच्या शिक्षणासाठी अनेक संस्था प्रत्यक्ष किंवा ऑनलाइन उपलब्ध आहेत; परंतु भारतीय भाषांचे स्थान कोणत्याही परिस्थितीत कमी लेखले जाऊ शकत नाही.

आज आवश्यकता आहे ती संपूर्ण देशभर भारतीय भाषांच्या समर्थनार्थ व्यापक जनजागृती करण्याची, अभियान उभारण्याची. शैक्षणिक संस्था, शिक्षक, पालक, विद्वान, सांस्कृतिक संघटना आणि नागरी समाज यांनी सक्रियपणे R–3 च्या समर्थनार्थ पुढे यायला हवे. सामाजिक माध्यमे, मुद्रित माध्यमे, डिजिटल व्यासपीठे, परिसंवाद आणि सार्वजनिक चर्चांच्या माध्यमातून भारतीय भाषांच्या महत्त्वाबद्दल व्यापक जनजागृती निर्माण केली पाहिजे.

प्रत्येक शाळा आणि संस्था पुढीलप्रमाणे अर्थपूर्ण योगदान देऊ शकतात.

भारतीय भाषा शिक्षणावरील चर्चासत्रांचे आयोजन करावे.

बहुभाषिक शिक्षणाच्या समर्थनार्थ लेख, फलक आणि व्हिडिओ प्रकाशित करावेत.

विद्यार्थ्यांना भारतीय भाषांमध्ये सर्जनशील अभिव्यक्तीस प्रोत्साहन द्यावे.

भाषिक विविधतेचे घटनात्मक आणि शैक्षणिक महत्त्व याबाबत जनजागृती करावी.

भारताची भाषिक विविधता हा कोणताही भार नसून, या सभ्यतेच्या सर्वात मोठ्या शक्तींमधील एक आहे. भारतीय भाषांना बळकटी देणारी धोरणे ही कोणत्याही प्रकारचा बहिष्कार नसून राष्ट्रीय समावेशनाचे प्रभावी साधन आहेत. त्यामुळे CBSE R–3 च्या अंमलबजावणीचे समर्थन करणे म्हणजे केवळ एका शैक्षणिक धोरणाचे समर्थन नव्हे, तर शैक्षणिक न्याय, सांस्कृतिक सातत्य, बौद्धिक बहुलता आणि भारताच्या सांस्कृतिक अस्मितेच्या भविष्याचे समर्थन होय.

साभार

---

*जागतिक पचन आरोग्यदिन*

# 'स्वच्छता आणि सुरक्षित पाणी' अतिसार प्रतिबंधाची गुरुकिल्ली!

**डॉ. तारा शर्मा**

जागतिक पचन आरोग्य (डायजेसटिव्ह हेल्थ )दिन हा पचनसंस्थेच्या आजारांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी दरवर्षी २९ मे रोजी जगभरात साजरा केला जातो. जागतिक गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी संघटनेने सुरू केलेला हा वार्षिक कार्यक्रम, व्यक्तींना आणि वैद्यकीय समुदायांना आतड्यांचे आरोग्य, रोग प्रतिबंध आणि योग्य पचन यावर लक्ष केंद्रित करण्यास प्रोत्साहित करतो. २०२६ सालच्या मोहिमेची संकल्पना आहे, 'दीर्घकालीन अतिसार: लक्षणे दुर्लक्षित करू नका (क्रोनिक डायरिया डु नोट फ्लश द साईन्स अवे ).'

अतिसार दिवसातून तीन किंवा त्याहून अधिक वेळा पातळ किंवा पाण्यासारखे शौच होणे होय.

हे सहसा पोटात जंतुसंसर्ग झाल्यामुळे घडते. योग्य वेळी उपचार न केल्यास शरीरातील पाण्याची पातळी कमी होऊन गंभीर धोका निर्माण होऊ शकतो.

**कारणे-** जंतुसंसर्ग: दूषित अन्न किंवा पाण्यामुळे होणारे बॅक्टेरिया, विषाणू किंवा परजीवी (अमिबा) यांचा संसर्ग.अन्न विषबाधा.शिळे,अस्वच्छ किंवा बाहेरचे उघड्यावरील अन्न खाल्ल्यामुळे.औषधांचे दुष्परिणाम:प्रतिजैविकांचा अतिवापर.इतर आजार: पोटाचे विकार (उदा. इरिटेबल बोवेल सिंड्रोम), दुग्धजन्य पदार्थांची ॲलर्जी(लॅक्टोज इनटॉलरन्स)किंवा ताणतणाव.

जोखीम गट- अतिसार हा पाच वर्षांखालील मुलांमधील कुपोषण आणि बालमृत्यूचे एक प्रमुख कारण आहे.जागतिक आरोग्य संघटनेनुसार,दरवर्षी जगभरात अतिसाराची कोट्यवधी प्रकरणे नोंदवली जातात आणि ५ वर्षांखालील बालकांच्या एकूण मृत्यूंपैकी सुमारे १३३ मृत्यू अतिसारामुळे होतात.

जोखीम घटक-असुरक्षित पाणी आणि अन्न : अस्वच्छता आणि दूषित पाणी पिणे.कमकुवत रोगप्रतिकारशक्ती,

५ वर्षांखालील लहान मुले ,वृद्ध व्यक्ती आण,.कुपोषित व्यक्ती : कुपोषण किंवा एचआयव्ही बाधित व्यक्ती.

**लक्षणे -** दिवसातून तीन किंवा त्यापेक्षा जास्त वेळा पातळ/पाण्यासारखे शौच होणे.पोटात दुखणे, पोटात मुरडा येणे किंवा गॅस होणे.मळमळणे आणि उलट्या होणे.हलका ताप किंवा अंग दुखणे.शरीर कोरडे पडणे, खूप तहान लागणे आणि अशक्तपणा जाणवणे.

प्रतिबंध-हात धुणे:जेवणापूर्वी आणि शौचाला जाऊन आल्यानंतर साबणाने हात किमान २० सेकंद चांगले धुवा.स्वच्छता:नेहमी ताजे, गरम अन्न खा आणि उघड्यावरील अन्नपदार्थ टाळा.पाणी:उकळून थंड केलेले किंवा शुद्ध (फिल्टर) केलेले पाणी प्या

घरगुती उपचार-ओआरएस: शरीरातील पाण्याची आणि मिठाची कमतरता भरून काढण्यासाठी ओआरएसचे पाणी प्या.लिंबू-पाणी आणि मीठ: एका ग्लास पाण्यात चिमूटभर मीठ, थोडी साखर आणि लिंबाचा रस पिळून घेतल्यास त्वरित ऊर्जा मिळते.जिरे पाणी: जिरे पाण्यात उकळून, थंड करून ते पाणी दिवसातून ३ ते ४ वेळा प्यायल्याने पोटदुखी आणि पचनास आराम मिळतो.दही-भात:भातामध्ये दही किंवा इसबगोल मिसळून खाल्ल्यास जुलाब थांबण्यास मदत होते.

केळी: केळीमध्ये पेक्टिन नावाचे घटक असते, ज्यामुळे शौच घट्ट होण्यास मदत होते.

जर अतिसार दोन ते तीन दिवसांपेक्षा जास्त काळ टिकला, शौचातून रक्त किंवा चिकट आमांश पडत असेल, किंवा तीव्र अशक्तपणा जाणवल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्या.

आरोग्याची काळजी घ्या, कारण शरीरच आयुष्याचा खरा साथीदार आहे.

---

# ...आणि कोलमडली बांगलादेशातील भू-राजकीय गणिते!

**अविनाश देशपांडे**

अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री (सेक्रेटरी ऑफ स्टेट) मार्को रुबियो यांनी आपल्या पहिल्या अधिकृत भारत दौऱ्याची सुरुवात देशाची राजधानी नवी दिल्लीऐवजी थेट कोलकाता येथून केली. हा त्यांचा पूर्वनियोजित दौरा होता. यामध्ये मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांची भेट घेणे तसेच कोलकात्यातील मदर टेरेसा यांच्या संस्थेला भेट देणे समाविष्ट होते. त्यानुसार त्यांनी कोलकात्यातील मदर टेरेसा यांच्या संस्थेला भेट दिली. ते स्वतः कॅथलिक धर्मीय असल्याने त्यांना या संस्थेबद्दल आत्मीयता असणे स्वाभाविक आहे. या भेटीदरम्यान संस्थेच्या कार्यपद्धतीची माहिती घेण्यासोबतच, परदेशी मदतीबाबत केंद्र सरकारने केलेल्या कडक नियमावली वरही काहीतरी चर्चा झाली असावी. परंतु, या भेटीमागे असणारे अमेरिकेचे भू-राजकीय अंदाज आणि गणिते तृणमूल काँग्रेस पक्षाच्या पराभवामुळे पूर्णपणे चुकल्याचे आता स्पष्ट होत आहे.

अमेरिकन गुप्तहेर संघटना 'सीआयए' आणि तिथल्या धोरणकर्त्यांचा असा कयास होता की, पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकीत ममता बॅनर्जी पुन्हा विजयी होऊन सत्तेवर येईल. बांगलादेशातील स्वतःच्या अंतर्गत राजकीय हितसंबंधांसाठी आणि तिथे हस्तक्षेप करण्यासाठी अमेरिकेला पश्चिम बंगालमध्ये एका मऊ आणि प्रादेशिक राजकारणाला प्राधान्य देणाऱ्या नेतृत्वाची आवश्यकता होती.



परंतु, प्रत्यक्षात ममता बॅनर्जी या निवडणुकीत पराभूत झाल्या आणि त्या सत्तेतून बाहेर गेल्या. पश्चिम बंगालमधील या अनपेक्षित सत्ता बदलामुळे अमेरिकेचा अंदाज पूर्णपणे चुकला आणि पर्यायाने भारताच्या पूर्व सीमेवर स्वतःचा राजकीय प्रभाव निर्माण करण्याचा अमेरिकेचा डाव पार उलटला.

पूर्वी बांगलादेशात हिंदू धर्मीयांवर प्रचंड अत्याचार होऊनही, तत्कालीन मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी त्याचा तीव्र शब्दांत निषेध करण्याचे टाळले होते; उलट हा बांगलादेशचा अंतर्गत प्रश्न असल्याचे त्यांनी म्हटले होते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, या संवेदनशील मुद्द्यावर अमेरिकेची भूमिकाही तितकीच मवाळ आणि संशयास्पद होती. याशिवाय, तत्कालीन ममता सरकारने बांगलादेश सीमेवर सुरक्षेसाठी कुंपण घालण्याच्या केंद्र सरकारच्या प्रकल्पांना सातत्याने जमिनीअभावी खीळ घातली होती.केंद्र सरकारने वारंवार जमिनीची मागणी करूनही बंगाल सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले, ज्यामुळे शेवटी केंद्र सरकारला या राष्ट्रीय सुरक्षेच्या मुद्द्यासाठी कोलकाता उच्च न्यायालयात दाद मागावी लागली होती.

आता अमेरिकेचा हा राजकीय अंदाज चुकल्यामुळे आणि पश्चिम बंगालमध्ये नवीन प्रशासकीय व्यवस्था आल्यामुळे पूर्व सीमेवर भारताची पकड अधिक मजबूत झाली आहे. परिणामी, अमेरिकेला बांगलादेशात भारताला डावलून स्वतःची मनमानी करणे कठीण झाले आहे.

दुसऱ्यांदा सत्तेवर आलेल्या डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने घेतलेले अनेक निर्णय उघडपणे भारताच्या आर्थिक हितांना तडे देणारे आहेत. 'अमेरिका फर्स्ट' या धोरणाखाली भारतीय वस्तूंवर लावलेले अतिरिक्त आयात शुल्क (टॅरिफ) आणि आयटी (माहिती तंत्रज्ञान) क्षेत्रातील कंपन्यांबाबत घेतलेले जाचक निर्णय यामुळे भारतातील रोजगार निर्मितीवर थेट परिणाम होत आहे.अमेरिकेची ही आक्रमक आर्थिक धोरणे त्यांच्या दक्षिण आशियातील चुकलेल्या राजकीय गणितांच्या वैफल्यातून येत आहेत की काय, अशी शंका घेण्यास वाव आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर, भारत सरकारने परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांचे स्वागत केवळ राजनैतिक राजशिष्टाचारानुसार (प्रोटोकॉल) केले.

मात्र, या स्वागतामध्ये एरवी भारत-अमेरिका संबंधांत दिसणारा उत्साह, जिव्हाळा आणि आत्मीयता प्रकर्षाने गायब होती. अमेरिकन सरकारला अजूनही ही बाब कशी लक्षात आली नाही, याचेच आश्चर्य वाटते.

भारताचे परराष्ट्र धोरण आता जुन्या काँग्रेस सरकारसारखे मऊ राहिलेले नसून, ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे खंबीर सरकार आहे. भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेशी आणि अंतर्गत बाबींशी खेळ खपवून घेतला जाणार नाही, हा 'जशास तसे' जशास तसे म्हणजेच विटाचे उत्तर धोंड्याने देणारा स्पष्ट संदेश भारताने या थंड स्वागतातून अमेरिकेला दिला आहे.

---

# एनपीएस खाते अजूनही उघडले नाही ?

**डॉ. प्रशांत विघे**

राज्यातील टप्पा अनुदानावर कार्यरत शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा प्रश्न आज केवळ वेतन, सेवा अटी किंवा प्रशासकीय प्रक्रियेपुरता मर्यादित राहिलेला नाही. हा प्रश्न आता सामाजिक न्याय, मानवी सन्मान, संविधानिक अधिकार आणि शासनाच्या नैतिक जबाबदारीशी थेट जोडला गेला आहे. शिक्षण व्यवस्थेचा संपूर्ण भार उचलणाऱ्या हजारो शिक्षकांकडून शासन सर्व शासकीय जबाबदाऱ्या पार पाडून घेत असताना त्यांनाच सेवा सुरक्षितता, निवृत्ती संरक्षण आणि सामाजिक सुरक्षा नाकारणे ही अत्यंत विसंगत आणि वेदनादायक बाब आहे.

टप्पा अनुदानित शाळांमध्ये कार्यरत अनेक शिक्षकांचे राष्ट्रीय पेन्शन प्रणाली अंतर्गत खाते आजपर्यंत उघडले गेलेले नाही. राष्ट्रीय पेन्शन प्रणाली ही केवळ निवृत्ती निधीची योजना नसून, ती एखाद्या कर्मचाऱ्याच्या सेवेला शासनाने दिलेली अधिकृत मान्यता आणि भविष्यातील सुरक्षिततेची हमी असते. मात्र अनेक शिक्षक वर्षानुवर्षे सेवा बजावत असूनही त्यांच्या सेवेला शासनाकडून स्थैर्य आणि संरक्षण मिळालेले नाही.

यामध्ये सर्वात महत्त्वाचा प्रश्न असा निर्माण होतो की, शासन जर या शिक्षकांना कर्मचारी म्हणून स्वीकारत नसेल, तर त्यांच्याकडून निवडणुका, जनगणना, परीक्षा, ऑनलाईन माहिती नोंदणी, विविध शासकीय सर्वेक्षणे, पोषण आहार योजना आणि प्रशासनिक कामे का करून घेतली जातात? जर शासन त्यांना पूर्ण कर्मचारी मानत नसेल, तर त्यांच्यावर अशा शासकीय जबाबदाऱ्यांचा भार टाकण्याचा नैतिक आणि कायदेशीर अधिकार शासनाला कसा मिळतो?

भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद १४ प्रत्येक नागरिकाला समानतेचा अधिकार प्रदान करते. समान पात्रता, समान जबाबदाऱ्या आणि समान काम करणाऱ्या शिक्षकांना केवळ 'टप्पा अनुदान' या तांत्रिक वर्गीकरणामुळे असुरक्षित ठेवणे हे समानतेच्या तत्त्वाच्या विरोधात आहे. सर्वोच्च न्यायालयाने अनेक वेळा 'समान कामासाठी समान वेतन' हे तत्त्व मान्य केले आहे. त्याचप्रमाणे 'समान कामासाठी समान सुरक्षा' हे तत्त्वही शासनाने स्वीकारण्याची वेळ आता आलेली आहे.राज्यघटनेतील अनुच्छेद २१ प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याचा अधिकार देतो. सन्मानाने जगणे म्हणजे केवळ वर्तमानातील रोजगार नव्हे, तर भविष्यातील सुरक्षिततेची खात्रीदेखील होय. एखादा शिक्षक २० ते २५ वर्षे सेवा देतो, हजारो विद्यार्थ्यांचे आयुष्य घडवतो; पण निवृत्तीनंतर त्याच्या हातात कोणतीही सामाजिक सुरक्षा राहत नसेल, तर त्याला सन्मानाने जीवन जगण्याचा अधिकार प्रत्यक्षात मिळतो का? हा प्रश्न शासनाने गांभीर्याने विचारात घेण्याची गरज आहे.

टप्पा अनुदानित शिक्षकांच्या बाबतीत सर्वाधिक अन्यायकारक बाब म्हणजे शाळा बंद झाल्यानंतरच्या समायोजन प्रक्रियेत त्यांना स्थान दिले जात नाही. नियमित अनुदानित शिक्षकांना समायोजनाची संधी दिली जाते; परंतु टप्पा अनुदानित शिक्षकांना 'पूर्ण अनुदानित नाहीत' या कारणावरून बाहेर ठेवले जाते. ही भूमिका केवळ प्रशासनिक विसंगती नसून मानवी संवेदनांनाही धक्का देणारी आहे.

अनेक शिक्षकांनी ग्रामीण आणि दुर्गम भागात अत्यल्प वेतनात, अपुऱ्या सुविधांमध्ये आणि अस्थिर परिस्थितीत दशकानुदशके सेवा दिली. त्यांनी हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य घडवले; मात्र संस्था बंद पडली की त्यांनाच कोणतीही पर्यायी व्यवस्था न देता बेरोजगारीच्या गर्तेत ढकलले जाते. ज्यांनी विद्यार्थ्यांना आयुष्यभर भविष्य घडवण्याचे धडे दिले, त्यांच्याच भविष्यावर प्रश्नचिन्ह निर्माण करणे ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे.

कामगार कायदे आणि नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वानुसार कोणत्याही कर्मचाऱ्याला दीर्घकाळ असुरक्षित अवस्थेत ठेवणे अन्यायकारक मानले जाते. सेवा सातत्य, निवृत्ती लाभ, विमा, सामाजिक सुरक्षा आणि समायोजन या गोष्टी कोणत्याही कर्मचाऱ्याच्या मूलभूत अपेक्षा असतात. टप्पा अनुदानित शिक्षकांना या सर्व गोष्टींपासून वंचित ठेवणे म्हणजे त्यांना 'अर्धवट कर्मचारी' म्हणून वागविण्या सारखे आहे.तेव्हा या शिक्षकांचे आयुष्य सततच्या असुरक्षिततेत जात आहे. एकीकडे ते विद्यार्थ्यांना संविधान, लोकशाही, समानता आणि न्याय यांचे धडे देतात; परंतु दुसरीकडे स्वतःच्या आयुष्यात त्यांनाच अन्याय, अस्थिरता आणि दुर्लक्ष सहन करावे लागते. हा विरोधाभास शिक्षण व्यवस्थेच्या नैतिक पायालाच हादरा देणारा आहे.आज गरज आहे ती स्पष्ट, न्याय्य आणि संवेदनशील धोरणाची. शासनाने सर्व टप्पा अनुदानित शिक्षकांचे राष्ट्रीय पेन्शन प्रणाली खाते तातडीने उघडावे आणि शासनाचा हिस्सा नियमितपणे जमा करण्याची प्रक्रिया सुरू करावी. सेवा सातत्याला अधिकृत मान्यता द्यावी. शाळा बंद झाल्यास नियमित अनुदानित शिक्षकांप्रमाणेच समायोजनाची समान संधी उपलब्ध करून द्यावी. तसेच निवृत्ती वेतन, विमा आणि सामाजिक सुरक्षेबाबत ठोस धोरण जाहीर करावे.'समान कामासाठी समान सुरक्षा' हे तत्त्व केवळ घोषणांमध्ये न राहता प्रत्यक्ष धोरणात उतरले पाहिजे. कारण शिक्षक हा केवळ कर्मचारी नसतो; तो समाजाच्या भविष्यात गुंतवणूक करणारा शिल्पकार असतो. जर त्या शिल्पकारालाच सुरक्षिततेची हमी नसेल, तर शिक्षण व्यवस्थेचा पाया कधीच मजबूत होऊ शकणार नाही.

टप्पा अनुदानित शिक्षकांचा प्रश्न हा केवळ प्रशासकीय विषय नाही; तो राज्याच्या सामाजिक बांधिलकीचा, संविधानिक मूल्यांचा आणि मानवी संवेदनांचा प्रश्न आहे. शासनाने वेळेत न्याय्य निर्णय घेतला नाही, तर ही असुरक्षितता केवळ शिक्षकांपुरती मर्यादित राहणार नाही; ती संपूर्ण शिक्षण व्यवस्थेच्या गुणवत्तेवर आणि समाजाच्या भविष्यावर परिणाम करेल. त्यामुळे आता आश्वासनांची नव्हे, तर संवेदनशील आणि न्याय्य कृतीची गरज आहे.

सिनेट सदस्य संत गाडगे बाबा
अमरावती विद्यापीठ,अमरावती
मो. ९३२६८७७७४९

# जिल्हाध्यक्ष तायडे, महानगराध्यक्ष गवई यांच्या पदग्रहणातून काँग्रेसचे शक्तिप्रदर्शन



## नव्या नेतृत्वाच्या जोरावर संघटनात्मक पुनर्बांधणीची रणशिंगे ; कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य



■ प्रतिनिधी | अकोला ■

*अकोला जिल्ह्यातील काँग्रेस संघटनेला नवसंजीवनी देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेला जिल्हा ग्रामीण काँग्रेस अध्यक्ष प्रकाश तायडे आणि महानगर काँग्रेस अध्यक्ष महेंद्र गवई यांच्या पदग्रहण सोहळ्याने जिल्ह्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापविले. स्वराज भवन येथे झालेला हा कार्यक्रम केवळ पदग्रहणापुरता मर्यादित न राहता आगामी स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसच्या नव्या संघटनात्मक रणनीतीचे शक्तिप्रदर्शन ठरल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.*

### ‘‘ शहर काँग्रेसकडून हेल्पलाइन सुरू करणार : महेंद्र गवई

महानगर काँग्रेस अध्यक्ष महेंद्र गवई यांनी शहरातील प्रत्येक प्रभागात काँग्रेसचे कार्यकर्ते सक्रिय करण्याचा संकल्प व्यक्त केला. युवकांना पक्षाशी जोडण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार असून नागरिक, महिला आणि युवकांच्या समस्या सोडविण्यासाठी शहर काँग्रेस कमिटीकडून हेल्पलाइन सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा त्यांनी केली. काँग्रेस ही केवळ निवडणूक लढविणारी संघटना नसून सामाजिक बांधिलकी जपणारी विचारधारा असल्याचेही त्यांनी नमूद केले.

गेल्या काही वर्षांपासून अकोला जिल्ह्यात संघटनात्मकदृष्ट्या कमकुवत झालेल्या काँग्रेसला नव्या नेतृत्वाच्या माध्यमातून आक्रमक व गतिमान चेहरा देण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून स्पष्टपणे दिसून आला. पक्षातील ज्येष्ठ नेतृत्व, माजी पदाधिकारी, युवक कार्यकर्ते आणि विविध फ्रंटल सेलच्या प्रतिनिधींनी एकाच मंचावर उपस्थित राहत संघटनात्मक एकजुटीचा संदेश देण्याचा प्रयत्न केला. कार्यक्रमस्थळी मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहिलेल्या कार्यकर्त्यांमुळे काँग्रेसमध्ये नव्या उत्साहाचे वातावरण निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

माजी मंत्री प्रा. अजहर हुसेन यांनी आपल्या भाषणात केंद्र सरकारवर थेट टीका करत देशातील जनतेमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाविषयी नाराजी वाढत असल्याचा दावा केला. काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाकडे पर्याय म्हणून पाहिले जात असून आगामी निवडणुकांमध्ये काँग्रेसला त्याचा लाभ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. नव्या नेतृत्वाकडे संघटनात्मक ताकद वाढविण्याची मोठी जबाबदारी असून प्रकाश तायडे आणि महेंद्र गवई हे दोघेही जनसंपर्कात सक्रिय, पक्षनिष्ठ आणि कार्यकर्त्यांना एकत्र बांधून ठेवण्याची क्षमता असलेले नेते असल्याचे त्यांनी सांगितले.

ज्येष्ठ काँग्रेस नेते तथा माजी आमदार लक्ष्मणराव तायडे यांनी पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी सर्व स्तरांवरील कार्यकर्त्यांना सोबत घेऊन काम करण्याचा मोलाचा सल्ला दिला. ग्रामीण भागातील काँग्रेसची पारंपरिक ताकद पुन्हा उभी करण्याची क्षमता प्रकाश तायडे यांच्यात असून शहरातील काँग्रेस संघटनेला नव्याने सक्रिय करण्याचे काम महेंद्र गवई करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. नव्या नेतृत्वाने केवळ पदाधिकारी न राहता कार्यकर्त्यांचा आधार बनावे, अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

आमदार साजिद खान पठाण यांनी राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल करत काँग्रेस जनतेच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरून संघर्ष उभारेल, असा इशारा दिला. राज्य विधिमंडळात सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर अखेर अकोल्यातील ‘उर्दू घर’ प्रकल्पासाठी महाराष्ट्र शासनाने जीआर मंजूर केल्याची माहिती त्यांनी दिली.

माजी आमदार बबन चौधरी यांनी आगामी काळात अकोला जिल्ह्यात काँग्रेसची राजकीय ताकद वाढताना दिसेल, असा दावा करत संघटनात्मक एकजूट आणि कार्यकर्त्यांची ऊर्जा हेच पक्षाचे खरे बलस्थान असल्याचे सांगितले. बदलत्या राजकीय परिस्थितीत काँग्रेस पुन्हा प्रभावी शक्ती म्हणून उदयास येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमात काँग्रेस नेते प्रशांत पाचडे, ॲड. महेश गणगणे, आकाश कवडे, डॉ. सुधीर ढोणे, डॉ. संजीवनी बिहाडे, कपिल रावदेव यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी माजी अध्यक्ष डॉ. प्रशांत वानखडे, अशोक अमानकर, डॉ. जीशान हुसैन, प्रशांत गावंडे, मो. इरफान, गुड्डू पठाण, प्रमोद डोंगरे, कशीश खान, निनाद मानकर, अतुल ढोले, मो. अकरम, मो. असद, मो. शारिक, सत्यनारायण घाटोळे, सारंग मालानी, रमेश बेटकर, गजानन वानखेडे, राजेश गावंडे, राजुभाऊ जोगदंड, शेख मुख्तार, सैय्यद जहांगीर, अभिजीत तवर, प्रशांत प्रधान, मनिष मिश्रा, तश्वर पटेल, यांच्यासह काँग्रेसच्या विविध आघाड्या व फ्रंटल सेलचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन विजय देशमुख यांनी केले.

राजकीय जाणकारांच्या मते, या पदग्रहण सोहळ्याच्या माध्यमातून काँग्रेसने आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक पुनर्बांधणीची औपचारिक सुरुवात केली आहे. विशेषतः जिल्ह्यातील बदलत्या राजकीय समीकरणांच्या पार्श्वभूमीवर नव्या नेतृत्वाच्या माध्यमातून काँग्रेस पुन्हा सक्रिय होत असल्याचे संकेत या कार्यक्रमातून मिळाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

### ‘‘ ‘गाव तिथे काँग्रेस शाखा’ वर भर : प्रकाश तायडे

नवनियुक्त जिल्हा ग्रामीण काँग्रेस अध्यक्ष प्रकाश तायडे यांनी आपल्या भाषणात काँग्रेसची संघटनात्मक ताकद बूथ स्तरापर्यंत वाढविण्यावर भर देणार असल्याचे स्पष्ट केले. राहुल गांधी यांच्या विचारांना ग्रामीण भागापर्यंत पोहोचवत सामाजिक न्याय, शेतकरी प्रश्न, बेरोजगारी आणि महागाईविरोधात जनआंदोलन उभारण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. संघटनात्मक ताकद वाढवून आगामी प्रत्येक निवडणुकीत विरोधकांना पराभूत करणार असल्याचे सुद्धा ते म्हणाले. सोबतच सरकारच्या जनविरोधी धोरणांविरोधात काँग्रेस अधिक आक्रमक भूमिका घेईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# आक्षेपार्ह वक्तव्य प्रकरणी निमखेडच्या पोलिस पाटलाला ग्रामस्थांचा जाब

## संविधान व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयी सोशल मीडियावर आक्षेपार्ह वक्तव्य केल्याचा आरोप

■ प्रतिनिधी | खेट्री ■

चान्नी पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या निमखेड येथील पोलिस पाटील संतोष डिगांबर ओकटे यांनी सोशल मीडियावरील ‘पोलीस पाटील’ या ग्रुपवर संविधान व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी आक्षेपार्ह वक्तव्य केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. ही घटना २६ मे रोजी घडल्याचे सांगण्यात आले असून, त्यामुळे परिसरातील नागरिकांच्या भावना दुखावल्या गेल्याची प्रतिक्रिया उमटत आहे.

या प्रकरणाच्या निषेधार्थ तुलंगा खुर्द, निमखेड व तुलंगा बु. येथील ग्रामस्थांनी २७ मे रोजी चान्नी पोलीस ठाण्यात धाव घेत संबंधित पोलिस पाटलाविरुद्ध ॲट्रॉसिटी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची मागणी करत तक्रार दाखल केली. दरम्यान, संतप्त ग्रामस्थांनी पोलिस पाटील संतोष ओकटे यांना जाब विचारत निषेध नोंदविला. यावेळी त्यांनी आपली चूक मान्य करत ग्रामस्थांसमोर माफी मागितल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. तसेच, त्यांना पोलिस पाटील पदावरून निलंबित करण्याची मागणीही पोलिस पाटील संघटनेने निवेदनाद्वारे पोलिस प्रशासनाकडे केली आहे.



> ‘संविधानाविषयी आक्षेपार्ह वक्तव्य केल्याबाबत निमखेड येथील पोलिस पाटलाविरुद्ध तक्रार प्राप्त झाली आहे. या प्रकरणाची सायबर विभागामार्फत चौकशी करण्यात येणार असून वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन घेऊन पुढील कारवाई केली जाईल.’
>
> **रवींद्र लांडे,**
> ठाणेदार, चान्नी पोलीस स्टेशन

या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप करत परिस्थिती नियंत्रणात आणली असून पुढील तपास सुरू केला आहे.

# खोट्या ई-मेलचा थरार; महावितरणच्या नावाने टेंडरमध्ये डाव?

- अज्ञात व्यक्तीविरुद्ध सायबर गुन्हा दाखल
- कंत्राटदाराचे आर्थिक नुकसान झाल्याचा दावा

■ प्रतिनिधी | अकोला ■

महावितरणच्या अधिकृत ई-मेलचा वापर करून विद्युत कंत्राटदाराला निविदा प्रक्रियेतून बाहेर काढल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला असून या प्रकरणात अखेर अज्ञात व्यक्तीविरुद्ध सायबर कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खोट्या ई-मेलच्या आधारे कंत्राटदाराला टेंडरमधून अपात्र ठरविण्यात आल्याने महावितरणच्या डिजिटल सुरक्षेवरच गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

महानगरातील विद्युत कंत्राटदार गणेश सारसे यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे दिलेल्या तक्रारीत आपल्या व्यावसायिक आणि आर्थिक नुकसानीमागे मोठे कटकारस्थान असल्याचा आरोप केला आहे. तक्रारीनुसार, महावितरणच्या अकोला शहर विभागाच्या अधिकृत ई-मेल आयडीचा वापर करून नाशिक मंडळ कार्यालयांतर्गत विविध विभागांना दिशाभूल करणारी खोटी माहिती पाठविण्यात आली. या मेलमध्ये ‘अर्णव इलेक्ट्रिकल, अकोला’ या संस्थेबाबत चुकीची माहिती देण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. सदर ई-मेलच्या आधारे नाशिक मंडळातील कळवण विभागाने संबंधित कंत्राटदाराला निविदा प्रक्रियेतून अपात्र ठरवले. याबाबत ई-मेल प्राप्त झाल्यानंतर सारसे यांनी चौकशी सुरू केली असता संपूर्ण प्रकार उघडकीस आल्याचे सांगितले जात आहे.



तक्रारीनुसार, कळवण विभागाकडून अकोला शहर विभागातून आलेल्या ई-मेलची प्रत व्हॉट्सॲपवर उपलब्ध करून देण्यात आली. मात्र, याबाबत महावितरणच्या संबंधित कार्यालयाशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधला असता ‘असा कोणताही ई-मेल आमच्याकडून पाठविण्यात आलेला नाही,’ असे सांगण्यात आले. त्यामुळे प्रकरण अधिकच गूढ बनले.

यानंतर गणेश सारसे यांनी मुख्य अभियंता, अकोला परिमंडळ यांची भेट घेत संपूर्ण प्रकार निदर्शनास आणून दिला. मुख्य अभियंत्यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तत्काळ संबंधितांकडून माहिती मागवली. त्यानंतर कार्यकारी अभियंता कार्यालयाकडून संबंधित ई-मेल पाठविण्यात आला नसल्याचा खुलासा करण्यात आल्याची माहिती आहे. दरम्यान, तक्रारीत खोटा ई-मेल तयार करून तो अधिकृत मेल असल्याप्रमाणे प्रसारित करण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. तसेच संबंधित ई-मेल डिलिट करून डिजिटल पुरावे नष्ट करण्याचाही प्रयत्न झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकारामुळे आपली प्रतिमा मलिन झाली असून व्यवसाय, निविदा प्रक्रिया आणि उपजीविकेवर गंभीर परिणाम झाल्याचा दावा सारसे यांनी केला आहे. ‘अधिकृत यंत्रणेच्या नावाचा वापर करून एखाद्याला आर्थिकदृष्ट्या उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न झाला असेल, तर हा गंभीर सायबर गुन्हा आहे,’ असे त्यांनी तक्रारीत नमूद केले. या तक्रारीची दखल घेत पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध सायबर कायद्यान्वये गुन्हा दाखल केला असून सायबर गुन्हे शाखेमार्फत तपास सुरू करण्यात आला आहे. अधिकृत ई-मेल आयडीचा गैरवापर नेमका कुणी केला? खोटा मेल कुठून पाठविण्यात आला? आणि निविदा प्रक्रियेत हस्तक्षेप करण्यामागे नेमका कोणाचा हेतू होता? याचा शोध आता सायबर तपास यंत्रणा घेत आहे. या घटनेमुळे महावितरणच्या अधिकृत ई-मेल प्रणालीच्या सुरक्षेवर प्रश्न उपस्थित झाले असून, सरकारी यंत्रणांच्या डिजिटल व्यवस्थेमध्ये सायबर सुरक्षेची किती मोठी पोकळी आहे, हे पुन्हा एकदा समोर आले आहे.

# आलेगावात मोफत टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू



■ प्रतिनिधी | खेट्री ■

## निलेश कापकर यांच्या पुढाकारातून नागरिकांना दिलासा

पातूर तालुक्यातील आलेगाव येथे तीव्र पाणीटंचाईमुळे नागरिकांचे हाल होत असताना सामाजिक कार्यकर्ते निलेश तोताराम कापकर यांच्या पुढाकारातून मोफत टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमामुळे ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला असून नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

आलेगाव परिसरात मागील काही दिवसांपासून पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. अनेक महिलांना रात्री उशिरापर्यंत पाण्यासाठी भटकंती करावी लागत असल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण होते. ही परिस्थिती लक्षात घेऊन निलेश कापकर यांनी सामाजिक बांधिलकी जपत मोफत पाणीपुरवठा उपक्रम सुरू केला. विशेष म्हणजे नागरिकांची गरज लक्षात घेता रात्री उशिरापर्यंत टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. दरम्यान, टँकरमध्ये पाणी भरत असताना समाधान काका गवळी यांचा पाय घसरून ते खाली पडले. त्यांच्यावर तत्काळ उपचार करण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

नागरिकांकडून वाढत्या मागणीमुळे हा मोफत पाणीपुरवठा उपक्रम रात्रभर सुरू ठेवण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. यावेळी नितीन ढोणे, नाजीम भाई, सखाराम लहामगे यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

# पारस औष्णिक विद्युत केंद्रातील अपघातप्रकरणी सेफ्टी ऑडिटची मागणी

## जखमी कामगारांना तातडीने आर्थिक मदत देण्याचे आश्वासन

■ प्रतिनिधी | अकोला ■

पारस औष्णिक विद्युत केंद्र येथे २३ मे रोजी झालेल्या अपघातात दोन कंत्राटी कामगार जखमी झाल्यानंतर वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी अधिक्षक अभियंत्यांची भेट घेत जखमींना आर्थिक मदत व संपूर्ण प्लांटचे सेफ्टी ऑडिट करण्याची मागणी केली.

पारस थर्मल पॉवर स्टेशनमधील कोल मिल विभागात झालेल्या अपघातात शेख याकूब शेख रऊफ (रा. पारस) हे सुमारे ६० टक्के भाजले असून कांचन दिगोळे (रा. उरळ) यांच्या मणक्याला फ्रॅक्चर झाले आहे. या दोन्ही जखमी कंत्राटी कामगारांना न्याय मिळावा, तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी योग्य सुरक्षा उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीने केली.

राजेंद्र पातोडे, महासचिव वंचित बहुजन युवा आघाडी महाराष्ट्र राज्य यांच्या नेतृत्वाखाली आम्रपाली खंडारे, जिल्हाध्यक्ष वंचित बहुजन महिला आघाडी अकोला जिल्हा तसेच इतर पदाधिकाऱ्यांनी अधिक्षक अभियंता भगत यांची भेट घेतली. यावेळी जखमींच्या उपचारांची माहिती घेण्यात आली तसेच कामगार सुरक्षेबाबत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली. संपूर्ण प्लांटचे सेफ्टी ऑडिट करून दोष दूर करावेत आणि जखमी कामगारांना तातडीने आर्थिक सहाय्य द्यावे, अशी मागणी शिष्टमंडळाने केली. त्यावर अधिक्षक अभियंत्यांनी आर्थिक मदतीचे तातडीने आदेश देत प्लांटचे सेफ्टी ऑडिट करण्यास मान्यता दिल्याचे सांगण्यात आले.



यावेळी अविनाश खंडारे, किशोर खंडारे, मुकेश लोडगे, कुर्शीद राणा, अश्विन खंडारे, रणदीप खंडारे, हमीद टेलर, नरेश चावरिया, नागेश वानखेडे, नितीन मोहोड, अजय राजनकर, रामा लांडे, सोनू लांडे, आकाश खंडारे, पवन तायडे, रुतिक खंडारे, गोलू खंडारे, सागर नाकर, पवन खंडारे, अश्विन अघमकर, नयना मोरे, अणू शिरसाठ, सारिका वानखेडे आदी उपस्थित होते.

# आज माहेश्वरी भवनाच्या कथेत कृष्ण जन्माचा जल्लोष

■ प्रतिनिधी | अकोला ■

व्यक्तीचे मन हे कलुषित दुर्भावना सातत्याने निर्माण करीत असते. या कलुषित दुर्भावना व कृतीने इतरांना कष्ट व दुख होते. दुर्भावना निर्माण करून इतरांना दुख देणारा व्यक्ती हा अधः पतनास कारणीभूत होतो.उलट दुसऱ्यास दुःख देणाऱ्या व्यक्तीचे जीवन हे दुःखी होते.म्हणून कलुषित दुर्भावनेच्या समूळ उच्चाटनासाठी सत्संगाची खरी गरज आहे. सत्संगाची निर्मिती ही भगवंताचे स्मरण व संतांच्या संगतीत होत असल्याचा हितोपदेश वृंदावन निवासी आंतरराष्ट्रीय भागवत कथाकार पू राजेशकृष्णजी महाराज यांनी केला. पुरुषोत्तम मासानिमित्त नित्य सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत सुरू असलेल्या श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञात पु राजेशकृष्ण महाराज यांनी भागवत कथेचे तृतीय पुष्प गुंफले.

# झरंडी परिसरात विद्युत खांब कोसळण्याचे सत्र सुरूच

- ✦ महावितरणच्या निष्काळजीपणामुळे शेतकऱ्यांचा जीव धोक्यात
- ✦ तातडीने कायमस्वरूपी उपाययोजनेची मागणी



■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील सस्ती वीज उपकेंद्रांतर्गत झरंडी परिसरात विद्युत खांब वारंवार कोसळत असल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. निकृष्ट उभारणी व दुरुस्तीकडे होत असलेल्या दुर्लक्षामुळे मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

अतिवृष्टीनंतर बाबूसिंग लोकू राठोड यांच्या शेतातील (सर्व्हे नं. १२८/१) तसेच शेजारील एका शेतकऱ्यांच्या शेतातील विद्युत खांब कोसळले होते. याबाबत अनेकदा तक्रारी करूनही महावितरण विभागाने दीर्घकाळ दखल घेतली नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. काही महिन्यांपूर्वी राठोड यांच्या शेतातील खांब तात्पुरत्या स्वरूपात उभारण्यात आला. मात्र, या खांबावर थ्री-फेज मुख्य वीजवाहिनी असूनही तारांना योग्य ताण देण्यात आलेला नसल्याने तो पुन्हा कधीही कोसळू शकतो, अशी भीती व्यक्त होत आहे. दुसरीकडे, दुसऱ्या शेतकऱ्यांच्या शेतातील कोसळलेला खांब अद्याप हटविण्यात आलेला नसून त्याबाबतही कोणतीही कार्यवाही झालेली नाही, असा आरोप करण्यात आला आहे.

> ‘माझ्या आणि शेजारील शेतकऱ्यांच्या शेतातील दोन विद्युत खांब अतिवृष्टीमुळे कोसळले होते. अनेक महिने दुरुस्ती करण्यात आली नाही. काही महिन्यांपूर्वी तात्पुरत्या स्वरूपात खांब उभारण्यात आला. यापूर्वीही हा खांब तीन वेळा कोसळला आहे. सुदैवाने मोठा अनर्थ टळला. वारंवार तात्पुरती उभारणी केल्यामुळे आमच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. भविष्यात जीवितहानी झाल्यास त्याला महावितरण विभाग जबाबदार राहील.’
>
> **बाबूसिंग लोकू राठोड,** शेतकरी, झरंडी

या प्रकारामुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला असून, महावितरण विभागाने तात्काळ मजबूत व कायमस्वरूपी विद्युत खांब उभारून योग्य उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १७३**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# बेलोरा (ख.) गावातील नळातून होत आहे गढूळ पाणीपुरवठा

## ग्रामपंचायतीच्या निष्काळजीपणाने महिनाभरापासून नागरिक संतप्त

**आष्टी शहीद/जनमाध्यम**
वर्धा नदीच्या काठावर वसलेल्या आष्टी तालुक्यातील बेलोरा (ख.) गावात सध्या नागरिकांच्या नळातून पाण्याऐवजी अक्षरशः आजार वाहत असल्याचे भीषण चित्र समोर आले आहे. गेल्या महिनाभरापासून सार्वजनिक नळ योजनेद्वारे गावात गढूळ व दूषित पाणीपुरवठा होत असून ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले आहे. विशेष म्हणजे केवळ पाईपलाईनमधूनच नव्हे, तर थेट पाण्याच्या टाकीपर्यंतच गढूळ पाणी पोहोचत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

शुद्ध पाणी हा आमचा अधिकार आहे, मग आम्हाला विषारी पाणी का पाजले जाते असा प्रश्न आता ग्रामस्थ विचारू लागले आहेत. गावातील नागरिकांना दररोज नळातून चिखलमिश्रित, पिवळसर आणि दुर्गंधीयुक्त पाणी मिळत असल्याने लोकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक घरांमध्ये हेच दूषित पाणी पिण्यासाठी आणि स्वयंपाकासाठी वापरावे लागत असल्याने लहान मुले, वृद्ध आणि महिलांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.गावात पोटदुखी, उलट्या, जुलाब, ताप आणि त्वचारोगासारख्या आजारांचा धोका वाढल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. आरोग्य विभागाने तातडीने पाण्याचे नमुने तपासून परिस्थितीची गंभीर दखल घ्यावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. आजारी पडल्यानंतर प्रशासन जागे होणार



का असा प्रश्न ग्रामस्थांनी उपस्थित केला आह

दरम्यान, ग्रामस्थांनी अनेक वेळा ग्रामपंचायतीकडे तक्रारी केल्या. मात्र प्रशासनाकडून केवळ पाहणीचे आश्वासन देत वेळकाढूपणा करण्यात आल्याचा आरोप होत आहे. महिनाभरापासून समस्या कायम असतानाही कोणतीही ठोस उपाययोजना न झाल्याने ग्रामपंचायतीच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, पाण्याच्या टाकीची स्वच्छता नियमित होत नाही.

तसेच जुन्या व गळक्या पाईपलाईनमुळे दूषित पाणी पुरवठ्यात मिसळत असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र याकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप होत आहे.

गावकऱ्यांच्या आरोग्याशी खेळ सुरू असून प्रशासन झोपेत आहे का असा प्रश्न करत ग्रामस्थ नेते नरेश गडलिंग यांनी ग्रामपंचायत प्रशासनाला इशारा दिला आहे. तात्काळ पाण्याची तपासणी करून जलशुद्धीकरणाची योग्य व्यवस्था करावी, पाण्याच्या टाकीची आणि पाईपलाईनची स्वच्छता करावी तसेच नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.दरम्यान, उन्हाळ्याच्या तोंडावरच गावात दूषित पाण्याचा प्रश्न गंभीर बनल्याने बेलोरा (ख.) येथील नागरिकांमध्ये प्रचंड संतापाचे वातावरण आहे. प्रशासनाने तातडीने उपाययोजना न केल्यास हा प्रश्न आणखी चिघळण्याची चिन्हे आहेत.

# चार वर्षांत पहिलीची पटसंख्या राज्यात १ लाखांनी घसरली

## जिल्हा परिषद शाळांची घंटा वाजतेय धोक्याची; इंग्रजीच्या मोहात मराठी शाळा ओस

**वर्धा/जनमाध्यम**
राज्यात इंग्रजी माध्यमांच्या वाढत्या आकर्षणामुळे जिल्हा परिषद, नगरपालिका आणि महानगरपालिका शाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या झपाट्याने घटत असून, सरकारी शिक्षण व्यवस्थेसमोर मोठे अस्तित्वाचे संकट उभे ठाकले आहे. २०२२-२३ ते २०२५-२६ या चार वर्षांच्या कालावधीत पहिलीच्या वर्गातील तब्बल १ लाख ३७ हजार ६०६ विद्यार्थ्यांची घट झाल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. वर्धा जिल्ह्यातही याचे गंभीर पडसाद उमटताना दिसत आहेत.

राज्य शासनाने 'शाळा प्रवेशोत्सव'सारखे उपक्रम राबवूनही अपेक्षित यश मिळाले नसल्याने शिक्षण विभागाची चिंता वाढली आहे. सरकारी शाळांतील



शैक्षणिक गुणवत्ता, सुविधा आणि इंग्रजी माध्यमांचा वाढता प्रभाव यामुळे अनेक पालक आर्थिक ओझे सहन करूनही मुलांना खासगी शाळांकडे वळवत आहेत. परिणामी मराठी माध्यमांच्या शाळा दिवसेंदिवस ओस पडताना दिसत आहेत.

प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी आणि माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि महापालिका आयुक्तांना विशेष निर्देश जारी करत विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढविण्यासाठी नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचे आदेश दिले आहेत.यामध्ये शिक्षकांनी अंगणवाडी व बालवाड्यांना भेटी देणे, पालकांशी थेट संवाद साधणे, शिष्यवृत्ती व शाळांतील सुविधा यांची माहिती देणे, तसेच समाजमाध्यमांवर जाहिरात आणि प्रचार करण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत.

दरम्यान, वर्ध्यातील अनेक गावांमध्ये जिल्हा परिषद शाळांतील रिकामे वर्ग आणि घटती उपस्थिती हा चिंतेचा विषय बनला असून, सरकारी शिक्षण वाचवा अशी हाक आता शिक्षक आणि पालकांकडून दिली जात आहे. आगामी शैक्षणिक वर्षात तरी पटसंख्या वाढेल का, की सरकारी शाळांची अवस्था आणखी बिकट होईल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# वर्धेत बनावट बियाणांचा काळाबाजार

## खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकरी धास्तावले स्वस्ताच्या आमिषाला बळी पडू नका, प्रशासनाचे शेतकऱ्यांना आवाहन

**वर्धा/जनमाध्यम**
खरीप हंगाम अगदी तोंडावर येऊन ठेपला असताना वर्धा जिल्ह्यात बनावट बियाण्यांच्या विक्रीने पुन्हा डोके वर काढल्याचे गंभीर वास्तव समोर आले आहे. जिल्ह्यात कृषी विभागाने तीन ठिकाणी धाडी टाकून संशयित बोगस बियाणे विक्रीप्रकरणी कारवाई केल्याने शेतकरी वर्गात मोठी खळबळ उडाली आहे. या कारवायांमुळे जिल्ह्यात आणखी अनेक ठिकाणी बनावट बियाण्यांची विक्री सुरू असण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकरी धास्तावले आहेत.दरवर्षी पेरणीनंतर बियाणे न उगवणे, पीक कमकुवत येणे किंवा उत्पादनात मोठी घट होणे अशा तक्रारी समोर येतात. अनेक वेळा तपासाअंती ही बियाणे बनावट किंवा निकृष्ट दर्जाची असल्याचे उघड होते. यामुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान होते. आधीच निसर्गाच्या लहरीपणामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना आता बोगस बियाणे विक्रेत्यांचा फटका बसत असल्याने संताप व्यक्त होत आहे. कृषी विभागाच्या माहितीनुसार, काही भामटे शेतकऱ्यांना कमी दरात बियाणे देण्याचे आमिष दाखवून बनावट माल विक्री करत आहेत. गावोगावी फिरून किंवा अनधिकृत पद्धतीने बियाणे विकणाऱ्यांपासून सावध राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अधिकृत परवानाधारक कृषी सेवा केंद्रातूनच बियाण्यांची खरेदी करावी, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### खरेदीवेळी या गोष्टी तपासणे अत्यावश्यक

शेतकऱ्यांनी बियाण्याचे सीलबंद पाकीट व्यवस्थित तपासावे. पॅकिंग कुठेही फाटलेले, शिवलेले किंवा संशयास्पद नसावे. त्यावर उत्पादक कंपनीचे नाव, लॉट नंबर, उत्पादन तारीख व अंतिम मुदत स्पष्ट नमूद असणे आवश्यक आहे. खरेदी केल्यानंतर पक्के बिल, रिकामी पिशवी व टॅग जपून ठेवणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे कृषी अधिकाऱ्यांनी सांगितले. कारण बियाणे बोगस निघाल्यास किंवा उगवण झाली नाही तर हीच कागदपत्रे कारवाईसाठी महत्त्वाचा पुरावा ठरतात.

### उगवण क्षमता घरच्या घरी तपासा

पेरणीपूर्वी बियाण्यांची उगवण क्षमता तपासण्याचा सल्लाही कृषी विभागाने दिला आहे. शंका असल्यास शासकीय कृषी विद्यापीठ किंवा अधिकृत प्रयोगशाळेत बियाण्याचे नमुने तपासणीसाठी देता येतात. यामुळे मोठे नुकसान टाळता येऊ शकते. दरम्यान, जिल्ह्यात सुरू असलेल्या कारवायांमुळे बनावट बियाणे विक्रेत्यांचे धाबे दणाणले असले तरी ग्रामीण भागात अजूनही काही ठिकाणी बोगस बियाण्यांचा सुळसुळाट सुरू असल्याची चर्चा आहे. खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर कृषी विभागाने विशेष मोहीम अधिक तीव्र करण्याची मागणी शेतकरी संघटनांकडून होत आहे. शेतकऱ्यांच्या घामाचा सौदा करणाऱ्यांना कठोर शिक्षा झाली पाहिजे,अशी संतप्त प्रतिक्रिया आता उमटू लागली आहे.

# 'कार्यसम्राट' आमदारांच्या मतदारसंघात मृत्यूचे रस्ते

## नंदोरी चौक बनला अपघातांचा अड्डा

**हिंगणघाट/ जनमाध्यम**
विकासाच्या मोठमोठ्या घोषणा, राजकीय ताकदीचे प्रदर्शन आणि 'कार्यसम्राट' अशी बिरुदावली मिरवणाऱ्या सत्ताधारी लोकप्रतिनिधींच्या मतदारसंघातच नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असल्याचे संतप्त चित्र हिंगणघाटमध्ये दिसत आहे. शहरातील अत्यंत वर्दळीचा नंदोरी चौक आज अक्षरशः 'मृत्यूचा सापळा' बनला असून, अपघातांची मालिका आणि वाढती वाहतूक कोंडी यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. सलग तिसऱ्यांदा विधानसभेत पोहोचलेले आमदार समीर कुणावार यांचा स्थानिक प्रशासनावर मोठा प्रभाव असल्याचे बोलले जाते. राज्यात, केंद्रात आणि जिल्ह्यात एकाच विचारसरणीचे सरकार असताना, तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री स्वतः गृह राज्यमंत्री असतानाही नंदोरी चौकात कायमस्वरूपी पोलीस चौकी आणि वाहतूक पोलिसांची नियुक्ती अजूनही कागदावरच अडकली आहे. त्यामुळे राजकीय ताकद नेमकी कुठे वापरली जाते असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.नंदोरी चौक हा शहर आणि ग्रामीण भागाला जोडणारा प्रमुख केंद्रबिंदू आहे. चौक परिसरात शाळा, महाविद्यालये, कोचिंग क्लासेस, व्यापारी संकुले, पेट्रोल पंप, मंगल कार्यालये आणि मोठ्या बाजारपेठा असल्याने येथे दिवसभर प्रचंड वर्दळ असते. हजारो विद्यार्थी, नागरिक आणि वाहनचालक रोज जीव धोक्यात घालून या चौकातून मार्ग काढतात. त्यातच भरधाव अवजड वाहने, खासगी ट्रॅव्हल्स आणि बेशिस्त पार्किंगमुळे परिस्थिती दिवसेंदिवस भयावह बनत चालली आहे.स्थानिक नागरिकांनी अनेकदा पोलीस चौकी, वाहतूक पोलिस आणि अतिक्रमण नियंत्रणाची मागणी केली. मात्र प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी केवळ आश्वासनांची धूळफेक केल्याचा आरोप आता उघडपणे होऊ लागला आहे. मोठा अपघात झाल्यावरच प्रशासन जागे होणार का असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. नंदोरी चौकात कायमस्वरूपी वाहतूक पोलिस, पोलीस चौकी आणि वाहतूक नियंत्रणाच्या उपाययोजना तातडीने राबवाव्यात, अन्यथा जनआक्रोश रस्त्यावर उतरेल, असा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

# आंजीतील किरकोळ वादाचे खैरीत रक्तरंजित रूपांतर; तिघांविरुद्ध गुन्हा

**सेलू/ जनमाध्यम**
आंजी (मोठी) येथे झालेला किरकोळ वाद रात्री उशिरा जीवघेण्या हल्ल्यात बदलल्याची घटना खैरी (कामठी) येथे घडली. या प्रकरणी खरांगणा पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी महेश नारायणराव वाघ यांनी दिलेल्या माहितीनुसार, ते ट्रॅक्टरच्या कल्टीवेटरचे वेल्डिंग काम करण्यासाठी मित्रांसह आंजी येथे गेले होते. तेथे दर्शन मोहिजे, गणेश सहारे आणि कान्हा झामरे यांच्यासोबत किरकोळ बाचाबाची झाली होती. त्यानंतर महेश वाघ हे रात्री घरी परतले. मात्र काही वेळाने गणेश सहारे याने फोन करून गावातील जिल्हा परिषद शाळेजवळ बोलावले. तेथे पोहोचताच तिघांनी शिवीगाळ सुरू केली. वाद वाढल्यानंतर गणेश सहारे आणि कान्हा झामरे यांनी जवळ उभ्या असलेल्या बंडीतून उभारे काढून महेश वाघ यांच्यावर हल्ला चढविला. पाठीवर व मानेवर प्रहार झाल्याने महेश खाली कोसळले. दरम्यान मित्र निलेश वाघमारे घटनास्थळी येताना दिसताच आरोपी पळून गेले. जखमी अवस्थेत महेश वाघ यांना नातेवाईकांनी पोलिस ठाण्यात आणले. मेडिकल अहवाल व तक्रारीवरून पोलिसांनी तिघांविरुद्ध बीएनएसच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. आरोपींना अद्याप अटक करण्यात आलेली नाही.

# हरवलेल्या मोबाईलला माणुसकीचा 'रिंगटोन'

## वर्धेत ऑटो चालकाचा प्रामाणिकपणा ठरला आदर्श, वृत्तपत्रांच्या बातमीचा सकारात्मक परिणाम

**वर्धा/जनमाध्यम**
शहरात अजूनही माणुसकी जिवंत असल्याचा दिलासादायक अनुभव पुन्हा समोर आला आहे. एका प्रामाणिक ऑटो चालकाने प्रवाशाचा हरवलेला मोबाईल कोणताही मोह न बाळगता थेट सायबर पोलिसांच्या स्वाधीन केला आणि एका ज्येष्ठ नागरिकाला त्यांचा मौल्यवान मोबाईल सुखरूप परत मिळवून दिला. या घटनेमुळे शहरात प्रामाणिकपणाची नवी साखळी निर्माण होत असल्याचे चित्र दिसत आहे.

वर्धेतील केळकर वाडी येथील चंद्रशेखर वासुदेव भागवत (वय ८०) हे ऑटोने प्रवास करत असताना त्यांचा मोबाईल गाडीतच राहून गहाळ झाला होता. दरम्यान, संबंधित ऑटो चालक सुलतान शेख करीम शेख (रा. आर्वी नाका, वर्धा) यांच्या निदर्शनास मोबाईल आला. अनेकदा अशा वस्तूंवर डल्ला मारण्याच्या घटना घडत असताना सुलतान शेख यांनी मात्र प्रामाणिकपणाचा आदर्श ठेवत थेट सायबर पोलीस स्टेशन गाठले आणि मोबाईल पोलिसांच्या ताब्यात दिला.



सायबर पोलीस स्टेशनचे प्रभारी पोलीस निरीक्षक अनिल मेश्राम आणि पोलीस हवालदार दिनेश बोथकर यांनी तत्काळ हालचाली करत मोबाईल मालकाचा शोध घेतला. त्यानंतर सायबर पोलीस स्टेशनमध्ये मोबाईल मूळ मालक चंद्रशेखर भागवत यांच्या स्वाधीन करण्यात आला. हरवलेला मोबाईल सुरक्षित परत मिळाल्याने भागवत यांनी पोलीस प्रशासन आणि ऑटो चालकाचे मनापासून आभार मानले.

या घटनेत आणखी एक सकारात्मक बाब समोर आली. काही दिवसांपूर्वी अशाच प्रामाणिक नागरिकांच्या बातम्या स्थानिक वृत्तपत्रात ठळकपणे प्रसिद्ध केल्या होत्या. त्या बातम्यांचा समाजावर मोठा प्रभाव पडल्याचे आता दिसून येत आहे. वर्धा पोलिसांच्या माहितीनुसार, अवघ्या दोन दिवसांत तब्बल पाच नागरिकांनी त्यांना सापडलेले मोबाईल स्वतःहून सायबर पोलीस स्टेशनमध्ये जमा केले.

पोलिसांनी हे सर्व मोबाईल त्यांच्या मूळ मालकांपर्यंत पोहोचवले आहेत.

मोबाईल चोरी, फसवणूक आणि स्वार्थाच्या काळात वर्ध्यातील या सलग घटना समाजाला आशेचा किरण दाखवणाऱ्या ठरत आहेत. एका ऑटो चालकाच्या प्रामाणिकपणाने आणि सकारात्मक वृत्तांकनाने माणुसकीची साखळी आणखी मजबूत झाल्याचे दिसून येत आहे.

# नंदोरी शिवारात अज्ञात इसमाचा मृतदेह आढळला

**समुद्रपूर**-तालुक्यातील नागपूर-चंद्रपूर मार्गावरील नंदोरी शिवारातील एका शेतात ३५ ते ४० वयोगटातील अज्ञात इसमाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच समुद्रपूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला असून मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. नंदोरी येथील ईमरान अहमद शेख यांना गावातील महादेव धोटे यांनी फोनवरून शेतात मृतदेह पडल्याची माहिती दिली. त्यानंतर घटनास्थळी पाहणी केली असता अज्ञात इसम मृत अवस्थेत आढळून आला. मृत इसमाने लाल रंगाचा अर्ध्या बाह्यांचा टी-शर्ट व काळ्या-पांढऱ्या पट्ट्यांचा बरमुडा परिधान केला होता. ठाणेदार रविंद्र रेवतकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी तपास सुरू केला असून मृताची ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

# दारूच्या नशेत घरात घुसून धिंगाणा

**हिंगणघाट/जनमाध्यम**
दारूच्या नशेत थेट घरात येऊन धिंगाणा घालणाऱ्या युवकाला जाब विचारल्याचा राग मनात धरून एका इसमावर काठीने हल्ला करण्यात आल्याची संतापजनक घटना हिंगणघाट तालुक्यातील पोहणा येथे घडली. या मारहाणीत एक जण जखमी झाला असून वडनेर पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, प्रज्वल उर्फ विकी विनोद नगराळे हा दारूच्या नशेत नरेश बाबुराव मुनेश्वर (वय ५०) यांच्या घरी गेला होता. घरात महिलावर्ग असल्याने 'दारू पिऊन माझ्या घरी का आलास असा जाब नरेश मुनेश्वर यांनी विचारला. मात्र, याचाच राग आल्याने आरोपीने शिवीगाळ करत वाद घालण्यास सुरुवात केली. वाद विकोपाला गेल्यानंतर प्रज्वल नगराळे याने नरेश मुनेश्वर यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. थांबता काठीने त्यांच्या पाठीवर व कमरेवर प्रहार करून गंभीर जखमी केले. या घटनेमुळे पोहणा गावात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.जखमी नरेश मुनेश्वर यांनी वडनेर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी आरोपी प्रज्वल नगराळे याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ११८ (१) अन्वये गुन्हा नोंदविला आहे. पुढील तपास ठाणेदार घनश्याम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार धनश्री सुखदेवे करीत आहेत.

# लालपरीत महिलांच्या राखीव जागांवर पुरुषांची 'दादागिरी'

## वर्ध्यात एसटीच्या गर्दीत नियम धुळीस, महिला, ज्येष्ठ नागरिकांचा संताप उसळला

**वर्धा/जनमाध्यम**
अधिक मास, उन्हाळी सुट्ट्या आणि तीर्थयात्रांच्या वाढत्या गर्दीमुळे वर्धा जिल्ह्यातील एसटी बसस्थानकांवर सध्या अक्षरशः प्रवाशांचा महापूर उसळला आहे. लालपरीच्या प्रत्येक फेरीत जागांसाठी झुंबड उडत असून महिलांसाठी राखीव असलेल्या जागांवर पुरुष प्रवासी सर्रास बसत असल्याने महिला प्रवाशांना उभ्याने प्रवास करण्याची वेळ येत आहे. राखीव जागा असूनही उभे राहायचे, मग नियम कशासाठी असा प्रश्न आता महिला प्रवासी उपस्थित करू लागल्या आहेत.

वर्धा, हिंगणघाट, आर्वी, पुलगाव, आणि तळेगाव आगारातून सुटणाऱ्या अनेक बसमध्ये गर्दीमुळे परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे चित्र आहे. बसमध्ये चढताच सीट पकडण्यासाठी धावपळ सुरू होते आणि त्यात महिलांसाठी राखीव जागांवरही पुरुष बिनधास्तपणे बसल्याचे दिसून येते. अनेकदा महिला जागा मागतात, मात्र काही प्रवासी उर्मटपणे उत्तर देत वाद घालत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत.

एसटी महामंडळाच्या नियमानुसार महिलांसाठी १३, १४, १९ आणि २१ क्रमांकाच्या जागा राखीव आहेत. ज्येष्ठ नागरिकांसाठी ५ व ६, दिव्यांगांसाठी ४, ९, १० तर पत्रकार, स्वातंत्र्यसैनिक आणि कर्मचाऱ्यांसाठीही स्वतंत्र जागा निश्चित आहेत. बसमधील



खिडकीजवळ आणि सीटच्या मागे याबाबत स्पष्ट सूचना लिहिलेल्या असतात. मात्र प्रत्यक्षात या नियमांकडे सर्रास दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे.

विशेषतः सकाळच्या आणि सायंकाळच्या फेऱ्यांमध्ये परिस्थिती अधिक गंभीर बनत आहे.

कामानिमित्त, शाळा-कॉलेज किंवा बाजारासाठी प्रवास करणाऱ्या महिलांना उभ्याने प्रवास करावा लागत आहे. काही महिलांनी तर जागा मागितली तर उलट भांडण होते अशी खंत व्यक्त केली. ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग प्रवाशांनाही या गोंधळाचा मोठा फटका बसत आहे.

अधिक मासानिमित्त मंदिर आणि तीर्थक्षेत्रांकडे जाणाऱ्या बसमध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी वाढली आहे. त्यात उन्हाळी सुट्ट्यांमुळे कुटुंबीयांसह प्रवास करणाऱ्यांची संख्या वाढल्याने एसटीच्या अनेक बसेस हाऊसफुल्ल धावत आहेत. काही मार्गांवर अतिरिक्त बसेस सोडल्या जात असल्या तरी त्या अपुऱ्या पडत असल्याचे वास्तव आहे.

राखीव जागा मोकळी करून देण्याची जबाबदारी वाहकावर असते. मात्र गर्दी, प्रवाशांचा दबाव आणि वादाची शक्यता यामुळे अनेक वाहक ठोस भूमिका घेत नसल्याचे आरोप होत आहेत. काही वेळा महिला तक्रार करूनही त्वरित कारवाई होत नाही. त्यामुळे एसटी प्रशासन नियम फक्त कागदावर ठेवते का असा प्रश्न उपस्थित होत आहे.

दरम्यान, महिलांसाठी राखीव जागांवर बसणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी, बसमध्ये नियमित तपासणी मोहीम राबवावी आणि गर्दीच्या काळात अतिरिक्त बसेस वाढवाव्यात, अशी मागणी महिला प्रवासी आणि सामाजिक संघटनांकडून केली जात आहे.लालपरी ही सर्वसामान्यांची जीवनवाहिनी मानली जाते. मात्र त्याच लालपरीत महिलांना सन्मानाने बसून प्रवास करता येत नसेल, तर प्रशासनाच्या नियमांची किंमत नेमकी किती, असा प्रश्न आता वर्ध्यातून जोर धरू लागला आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १८१**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमातून ८७९ बालकांना नवसंजीवनी

## अमरावती जिल्ह्यात आरबीएसके योजनेचा प्रेरणादायी प्रवास

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या मार्गदर्शनाखाली अमरावती जिल्ह्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (आरबीएसके) प्रभावीपणे राबविण्यात येत असून, हा उपक्रम हजारो बालकांसाठी जीवनदायी ठरत आहे. शासनाची ही योजना केवळ आरोग्य सेवा न राहता अनेक कुटुंबांसाठी आशेचा किरण बनली आहे. या योजनेअंतर्गत गंभीर आजारांनी ग्रस्त बालकांना मोफत शस्त्रक्रिया करून नवजीवन देण्यात आले आहे. या योजनेतून मागील काही वर्षांत तब्बल ८७९ हृदय शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आल्या असून, अनेक बालकांना मृत्यूच्या दारातून परत आणण्यात यश आले आहे. याशिवाय ४५४७ इतर विविध शस्त्रक्रिया करून हजारो कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे. विशेष बाब म्हणजे या सर्व उपचारांसाठी पालकांना कोणताही आर्थिक खर्च करावा लागलेला नाही, अशी माहिती जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विनोद पवार यांनी दिली आहे.

आरबीएसके कार्यक्रमांतर्गत अंगणवाडीपासून शाळास्तरापर्यंत बालकांचे १०० टक्के आरोग्य तपासणी (स्क्रिनिंग) करण्यात येत असून, विविध आजारांचे वेळेत निदान करून तातडीने उपचार उपलब्ध करून दिले जात आहेत. दुर्गम आणि ग्रामीण भागातील बालकांपर्यंत आरोग्य सेवा पोहोचविण्यात अमरावती जिल्ह्याने उल्लेखनीय यश मिळविले आहे.

आरबीएसके अंतर्गत जन्मजात हृदय रोग, जन्मजात नेत्र रोग, कर्णदोष, दुभंगलेले ओठ व टाळू, हर्निया, हायड्रोसील, स्क्विंट (डोळ्यांचा तिरळेपणा), दंतरोग, फायमोसीस, हाडांचे आजार तसेच टॉन्सिल्स आदी विविध आजारांवर उपचार करण्यात येत आहेत. या शस्त्रक्रियांसाठी विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय अमरावती, डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय, डॉ. पाटील कान-नाक-घसा हॉस्पीटल, आचार्य विनोबा भावे रुग्णालय सावंगी, कोकिलाबेन धीरुभाई अंबानी हॉस्पिटल मुंबई, एसआयसीसी चिल्ड्रन हॉस्पिटल मुंबई, नेल्सन हॉस्पिटल नागपूर, किम्सवे हॉस्पिटल नागपूर, स्वास्तम हॉस्पीटल नागपूर, संजीवनी हॉस्पीटल मुंबई आदी नामांकित रुग्णालयांचे सहकार्य लाभत आहे.जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विनोद पवार यांनी सांगितले की, 'आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या सूचनेनुसार ही योजना जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचून प्रत्येक बालकाला योग्य उपचार मिळावेत, हे आमचे प्रमुख ध्येय आहे.'

निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्य संपर्क) डॉ. संदीप हेडाऊ यांनी सांगितले की, 'टीमवर्क, वेळेवर रेफरल आणि सातत्यपूर्ण फॉलोअप यामुळेच आम्हाला शंभर टक्के यश मिळाले आहे. भविष्यातही अधिकाधिक बालकांपर्यंत ही सेवा पोहोचविण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.'

जिल्हा कार्यक्रम पर्यवेक्षक निलेश पुंनसे यांनी अमरावती जिल्ह्यातील दुर्धर आजारांनी ग्रस्त बालकांच्या पालकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. तालुकास्तरावर कार्यरत पथकांमार्फत मोफत सेवा उपलब्ध करून दिली जात असून, ही सेवा भविष्यातही अविरत सुरू राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# बकरी ईदच्या आनंदात ऐक्याचा संदेश; जुळ्या शहरात मान्यवरांकडून शुभेच्छांचा वर्षाव



**अचलपूर/प्रतिनिधीः-** पवित्र महिन्याच्या समाप्तीनंतर आलेल्या ईदच्या चांदण्याने अचलपूर-परतवाडा या जुळ्या शहरात आनंद, उत्साह आणि बंधुभावाची एक नवी उजळणी घडवून आणली आहे. या मंगल प्रसंगी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनी नागरिकांना मनःपूर्वक शुभेच्छा देत सामाजिक ऐक्याचा संदेश दिला.

ईदच्या निमित्ताने शहरातील विविध भागात स्नेह, सौहार्द आणि परस्पर आदराची भावना ओसंडून वाहताना दिसत आहे. 'ईद हा केवळ एक सण नसून मनामनांतील अंतर दूर करणारा, तसेच प्रेम आणि विश्वासाची वीण अधिक घट्ट करणारा उत्सव आहे,' असे प्रतिपादन यावेळी उपस्थित मान्यवरांनी केले.

या सलोख्याच्या प्रसंगी अचलपूर तालुका अध्यक्ष नामदेवराव तनपुरे, शहर अध्यक्ष श्रीकांत झोडपे, सेवादल अध्यक्ष सचिदानंद बेलसरे, अनुसूचित जाती विभाग अध्यक्ष राहुल गाठे, ओबीसी अध्यक्ष दिनेश वानखडे, नगरसेवक सईद भाई मौलाना, सहजाद पठाण, कैलास आवारे, प्रमोद कांबळे, धीरज अपाले, तसेच विशाल खानझोडे प्रामुख्याने उपस्थित होते. या सर्व मान्यवरांच्या उपस्थितीमुळे सणाच्या शुभेच्छांना अधिक आपुलकीची किनार लाभली. ईदच्या या आनंदमयी वातावरणात जुळ्या शहराने पुन्हा एकदा 'विविधतेत एकता' या भारतीय मूल्याची प्रचिती दिली असून, समाजमनात सकारात्मकता आणि स्नेहाची नवी पालवी फुटल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.


महानिर्मिती

**अंतिम शिक्षा आदेश**

क्र. महानिर्मिती/को. औ. वि. के/[illegible]/क्र No. 01543

दिनांकः–06 APR 2026.

गोपनीय

नोंदणीकृत डाकेद्वारे/ई-मेल द्वारे

प्रति,
श्री. [illegible]
[illegible] कॉलनी,
[illegible], अमरावती – [illegible].
ई-मेल– १) [illegible]@gmail.com २) [illegible]@gmail.com

मार्फतः– [illegible], कोराडी

विषयः– अंतिम शिक्षा आदेश.

संदर्भः– १) [illegible]
२) [illegible]
३) [illegible]
४) [illegible]
५) [illegible]
६) [illegible]
७) [illegible]
८) [illegible]
९) [illegible]

[illegible] 'कनिष्ठ अभियंता' [illegible]

[illegible]

'' महानिर्मिती कंपनीतील सेवेमधून काढून टाकणे''

[illegible]

–स्वाक्षरी–
कार्यकारी अभियंता (संवलन)
६६० मे.वॅ तथा सक्षम अधिकारी, महानिर्मिती, औविकें, कोराडी


# मनपा आयुक्त वर्षा लड्डा यांनी केली प्रधानमंत्री आवास योजनेच्या प्रकल्पांची पाहणी

## लाभार्थ्यांशी साधला संवाद; विकासकांना बांधकाम तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील प्रधानमंत्री आवास योजना (पीएमएवाय) घटक क्र. ३ अंतर्गत सुरू असलेल्या विविध गृहनिर्माण प्रकल्पांची अमरावती महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांनी बुधवार, दि. २७ मे २०२६ रोजी सकाळी ९ वाजता प्रत्यक्ष मौका पाहणी करून कामांचा सविस्तर आढावा घेतला. शहरातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू नागरिकांना दर्जेदार व सुरक्षित निवास उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सुरू असलेल्या या प्रकल्पांबाबत आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

या पाहणी दौऱ्यादरम्यान मौजे नवसारी सर्व्हे नं. १२९/२ मधील प्लॉट नं. १०७ ते ११३ येथे उभारण्यात आलेल्या एकूण ४८ सदनिकांची पाहणी करण्यात आली. त्यानंतर याच सर्व्हे क्रमांकातील प्लॉट नं. ९१ ते ९७ येथील आणखी ४८ सदनिकांचा आढावा घेण्यात आला. तसेच मौजे राहटगाव सर्व्हे नं. १९९/३ येथील ४८ सदनिका, सर्व्हे नं. ११६/२ मधील ३२ सदनिका आणि सर्व्हे नं. १२७/२ मधील ८६ सदनिकांची प्रत्यक्ष तपासणी करण्यात आली. सदनिकांमधील बांधकामाची गुणवत्ता, पाणीपुरवठा, वीज व्यवस्था, स्वच्छता, अंतर्गत रस्ते तसेच इतर मूलभूत सुविधांची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या.

पाहणीदरम्यान आयुक्त वर्षा लड्डा यांनी लाभार्थींना हस्तांतरित करण्यात आलेल्या सदनिकांना भेट देऊन रहिवाशांशी थेट संवाद साधला.



सदनिकांमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेल्या सुविधांबाबत माहिती घेत नागरिकांच्या अडचणी जाणून घेतल्या. यावेळी अनेक लाभार्थींनी शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेमुळे स्वतःचे घर मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त केले. काही ठिकाणी प्रलंबित असलेल्या कामांबाबत नागरिकांनी मांडलेल्या समस्या तातडीने सोडविण्याच्या सूचना आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी मुलभुत सुविधा उपलब्ध करुन देण्याचे निर्देश दिले.

यावेळी आयुक्तांनी संबंधित विकासकांना बांधकामाची गुणवत्ता अबाधित ठेवत उर्वरित कामे निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश दिले. प्रकल्पांमधील प्रलंबित पायाभूत सुविधा, परिसर स्वच्छता, ड्रेनेज व्यवस्था आणि सार्वजनिक सुविधा लवकरात लवकर कार्यान्वित करण्यावर विशेष भर देण्यात आला. लाभार्थ्यांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही याची दक्षता घेण्याचे आदेशही त्यांनी दिले.

प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत सुरू असलेल्या या गृहनिर्माण प्रकल्पांमुळे शहरातील अनेक गरजू कुटुंबांचे स्वतःच्या घराचे स्वप्न साकार होत असून, या योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावी व पारदर्शक पद्धतीने करण्यासाठी महानगरपालिका प्रशासन कटिबद्ध असल्याचे यावेळी आयुक्त वर्षा लड्डा यांनी सांगितले.सदर पाहणी दौऱ्यात अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त नरेंद्र वानखडे, उपअभियंता शरद तिनखेडे, लक्ष्मण पावडे, नंदकिशोर तिखिले, आशिष अवसरे, जनसंपर्क अधिकारी भूषण पुसतकर, पीएमएवाय कक्षाचे कर्मचारी विपिन त्रिवेदी, जीशान अली, प्रज्वल शेंडे, निखील राऊत, विकासक सोनल गुप्ता तसेच इतर कर्मचारी उपस्थित होते.

# वल्लभ नगर येथे संत श्री अच्युत महाराज यांच्या पादुका पूजनाचा कार्यक्रम

## संत सचिन देव महाराजांनी मधुर वाणीतून केली गुरु महिमा वर्णन

**अमरावती/प्रतिनिधीः-** वंदनीय संत श्री अच्युत महाराज यांच्या भक्त परिवारातील नंदकिशोर पेटकर यांचे घरी दिनांक २१ मे २०२६ गुरुवारी वंदनीय गुरुमाऊली संत श्री अच्युत महाराज यांच्या पादुका पूजनाचा सोहळा अतिशय आनंदाने व भारावलेल्या वातावरणात साजरा करण्यात आला.



ह्या प्रसंगी संत श्री सचिन देव महाराज यांनी आपल्या मधुर वाणीतून गुरु महिमा वर्णन केला आणि परिसरातील भाविक भक्त व गुरु परिवारातील भक्त मंत्रमुग्ध झाले. पादुका पूजन आरती व महाप्रसादाचा सर्वांनी लाभ घेतला. नंदकिशोर पेटकर यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये विचार व्यक्त करीत असताना सांगितले की वंदनीय श्री संत अच्युत महाराज यांच्या आशीर्वादाने व संत श्री सचिन देव महाराज यांच्या कृपेने या अधिक मासामध्ये गुरुवार दिनांक २१ मे रोजी सकाळी साडेअकरा वाजता संत सचिन देव महाराजांचे आगमन झाले आणि आमची इच्छा होती की या अधिकमासा मध्येच आम्हाला तारीख मिळावी आणि योग असा आला की गुरुवारी गुरुपुष्यामृत सुद्धा होते. आदल्या दिवशी संत अच्युत महाराज गुरु परिवारातील महिलांनी श्री दुर्गा सप्तशतीचे पारायण केले.

सचिन महाराजांनी आपल्या प्रवचनामध्ये तीन प्रकारचे चरित्र सांगितले १) राजकारणी लोकांचे चरित्र, २) सामाजिक लोकांचे चारित्र्य आणि ३) सद्गुरु चे चरित्र हे कसे असते ते विस्तृतपणे समजावून सांगितले. नंतर त्यांनी भागवत गीतेतील श्रीकृष्णाने सांगितलेले योग समजावून सांगितले. त्यानंतर गुरुपुष्यामृत योग असल्यामुळे गजानन महाराज विजय ग्रंथ आणि गजानन महाराजांची महिमा समजावून सांगितली असे हे खळ्या आवाजातले प्रवचन ऐकून भाविक भक्त मंत्रमुग्ध झाले. आणि त्यानंतर चतुर्भुज गुरुजी यांनी वंदनीय श्री संत अच्युत महाराज यांच्या हार्ट हॉस्पिटल मार्डी रोड अमरावती येथील विस्तृत माहिती दिली. हार्ट हॉस्पिटल मध्ये हृदयाच्या शस्त्रक्रिया केल्या जातात. येथे सर्व सुविधा उपलब्ध आहे. ज्यांना कोणाला हार्ट चा प्रॉब्लेम असेल किंवा झाला असेल त्यांनी ह्या हार्ट हॉस्पिटलमध्ये आपली शस्त्रक्रिया करून घ्यावी तेथे संत सद्गुरू श्री अच्युत महाराजांचा सर्व आलेल्या पेशंटला दवा के साथ दुवा भी है असे महाराज सांगीत होते, तसेच आरती मध्ये आलेला संपूर्ण पैसा हा तपोवनला पाठविण्यात येतो. या कार्यक्रमाला परिसरातील सर्व भाविक भक्त आणि गुरु परिवारातील भक्त मंडळी उपस्थित होते. जयघोष राष्ट्र वंदना आणि महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# अमरावतीत वादळी वाऱ्याचा तडाखा

**अमरावती/प्रतिनिधी:-** मंगळवारी सायंकाळी शहरात अचानक आलेल्या वादळी वाऱ्यामुळे विविध भागांत झाडे कोसळण्याच्या घटना घडल्या. फरशी स्टॉप, किरण नगर, कवर नगर, मंगलधाम, प्रशांत नगर, यशोदा नगर आणि लक्ष्मी नगरसह शहरातील तब्बल आठ ठिकाणी झाडे पडल्याने काही काळ वाहतुकीत अडथळे निर्माण झाले. मात्र अमरावती महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने तातडीने घटनास्थळी धाव घेत रस्त्यावरील झाडे हटवून वाहतूक सुरळीत केली. सुदैवाने कोणतीही जीवित अथवा वित्तीय हानी झाली नाही.

अग्निशमन मुख्यालयाला सायंकाळपासून विविध भागांतून झाडे पडल्याच्या तक्रारी प्राप्त होत होत्या. फरशी स्टॉप परिसरातील आयुर्वेदिक दवाखान्याजवळ व कल्याण नगर येथे झाड पडल्याची माहिती नगरसेवक प्रशांत वानखडे यांनी दिली. त्यानंतर किरण नगर गल्ली क्रमांक ६, कवर नगर चौरे मार्केट, नरहरी मंगल कार्यालय परिसर, मंगलधाम, प्रशांत नगर हनुमान मंदिर, यशोदा नगर मटन मार्केट तसेच लक्ष्मी नगर येथेही झाडे कोसळल्याच्या घटना समोर आल्या. घटनांची माहिती मिळताच अग्निशमन विभागाचे अधिकारी व कर्मचारी तात्काळ संबंधित ठिकाणी दाखल झाले. रस्त्यावर आडवे पडलेले वृक्ष कटरच्या सहाय्याने हटवून वाहतुकीसाठी मार्ग मोकळे करण्यात आले. काही ठिकाणी वीजवाहिन्यांजवळ झाडे पडल्याने खबरदारीने काम करण्यात आले. अग्निशमन विभागाच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. रात्री ९ वाजेपर्यंत मिळालेल्या माहितीनुसार शहरात एकूण आठ ठिकाणी झाडे कोसळल्याची नोंद झाली असून, सर्व ठिकाणी मदतकार्य पूर्ण करण्यात आले आहे. दरम्यान, हवामान विभागाने पुढील काही तासांतही वादळी वाऱ्यासह वातावरण बदलाची शक्यता वर्तविल्याने नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.


**शुध्दीपत्रक**

**दिनांक १९.०५.२०२६ च्या दै.जनमाध्यम मध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या मौलाना अ.कलाम आझाद शिक्षण संस्था, टाकळी, ता.दर्यापूर, जि.अमरावती द्वारा संचालित एच.जी.उर्दु कला व विज्ञान क.म.वि.टाकळी, ता.दर्यापूर, जि.अमरावतीच्या दि.२०.०५.२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये शैक्षणिक पात्रतेच्या कॉलममध्ये एम.ए.(उर्दु)(अर्धवेळ) ऐवजी एम.ए.(उर्दु) बी.एड.(अर्धवेळ पद) असे वाचण्यात यावे.**

**आदेशानुसार**



**कार्यकारी दंडाधिकारी,तथा तहसीलदार अमरावती यांचे कार्यालय**
**जन्म/मृत्यू बाबत जाहीरनामा**

**रा.मा.क./एम.आर.सी-८१/अमरावती/२१७/२०२५-२६**

**अर्जदार -** **रेखा तुलशीराम मदारी,**
**रा.वडाळी हनुमान मंदिराजवळ, परिवार पुरा**
**ता.जि.अमरावती**

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार-** **निबंधक, जन्म मृत्यू आरोग्य विभाग**
**जन्म मृत्यू महानगरपालिका, अमरावती, ता.जि.अमरावती**

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, अर्जदार हे वरील पत्त्यावर कायम रहिवासी आहेत. रेखा तुलशीराम मदारी, रा.रा.वडाळी हनुमान मंदिराजवळ, परिवार पुरा, अमरावती, ता.जि.अमरावती यांचा जन्म दिनांक २४.०४.२००१ रोजी त्यांच्या राहत्या घरी झाला. निबंधक जन्म मृत्यू, आरोग्य विभाग, महानगरपालिका, अमरावती येथे जन्माची नोंद घेतली नाही. अर्जदाराला उपरोक्त जन्म प्रमाणपत्राची गरज असल्यामुळे जन्माची नोंद महानगरपालिका अधिनियम १९६९ मधील कलम १३(३) व त्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र जन्म मृत्यू नोंदणी नियम २००० मधील नियम ९(३) नुसार जन्माच्या नोंदणीचा आदेश होण्याबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास सदर कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, अमरावती येथील दाखल अर्जातील रेखा तुलशीराम मदारी, रा.वडाळी हनुमान मंदिराजवळ, परिवार पुरा अमरावती, ता.जि.अमरावती यांचा जन्म दिनांक २४.०४.२००१ रोजी त्यांच्या राहत्या घरी झाला. त्यांच्या जन्माच्या दिनांकास किंवा त्याबाबत हरकत असल्यास ता.०९.०६.२०२६ पर्यंत स्वतः किंवा आपल्या वकीलामार्फत येऊन हरकत न घेतल्यास सदरहू अर्जदार याची साक्ष घेवून जन्म नोंद सदर कार्यालयात घेण्याचा आदेशकिंवा तसे प्रमाणपत्र देण्यात येईल.

शिक्का

तहसीलदार
तथा तालुका दंडाधिकारी,
अमरावती.



सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

**चौकशीची जाहीर नोटीस**

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 278/2026 कलम २२
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **श्री.जनकल्याण सेवा संस्था, अमरावती, ता.जि.अमरावती** **एफ-१२७७३/अमरावती**
बाबत अर्जदार - **गोविंद जनार्दन जोग, रा.हेडगेवार हॉस्पीटल, अमरावती**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, धर्मादाय उपआयुक्त, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९/२२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--
(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत (वर्णन) - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन)** - अमरावती शहर येथील नझुल शिट नं.६५, प्लॉट नं.५/१, एकुण क्षेत्रफळ २७,५५२.९० चौ.मीटर पैकी ६६९ चौ.मीटर जागा, ह्याचा प्लॉट नं.५/१-ब, त्यावर असलेल्या बांधकामासहीत, ज्याची चतुःसिमा--
पुर्वेस - आदित्य अपार्टमेंट व त्यामागे रेल्वे लाईन
पश्चिमेस - अमरावती-बडनेरा रस्ता
उत्तरेस - प्लॉट नं.५/१-अ
दक्षिणेस - श्री.पाटील यांचे घर

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२४.०४.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती



**तहसिलदार मोर्शी यांचे कार्यालय**

क्र. रामाक्र/२४३/एमआरसी-८१/अंबाडा/२०२५-२०२६

**जाहीरनामा**

या कार्यालयाचे ज्ञापनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **सय्यद कलीमुद्दीन सय्यद अलीमुद्दीन**, रा.**अंबाडा**, ता.मोर्शी यांनी त्यांचे जन्माची नोंद ग्रामपंचायत **अंबाडा** ला करण्यास आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. त्यांनी अर्जासोबत ग्रामपंचायत निबंधक, ग्रा.पं.**अंबाडा** येथील जन्म/मृत्यू नोंदवही अनुपलब्धता प्रमाणपत्र व इतर अनुषंगीक पुरावे दाखल केले आहेत. तसेच ग्रामपंचायत कार्यालय **अंबाडा** येथे स्वतःचे जन्म दिनांक **०१.०७.१९९०** रोजीचे जन्माची नोंद घेण्याकरीता आदेश मिळण्याबाबत विनंती केली आहे.

त्याअर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेप वा हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत लेखी स्वरुपात आक्षेप वा हरकती दाखल कराव्या. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतीचा विचार करणत येणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि.२७.०५.२०२६

शिक्का

**स्वा/-**
**तहसीलदार, मोर्शी**



**तहसिलदार मोर्शी यांचे कार्यालय**

क्र. रामाक्र/२४५/एमआरसी-८१/अंबाडा/२०२५-२०२६

**जाहीरनामा**

या कार्यालयाचे ज्ञापनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **परवीन सुलताना अब्दुल सईद**, रा.**अंबाडा**, ता.मोर्शी यांनी त्यांचे जन्माची नोंद ग्रामपंचायत **अंबाडा** ला करण्यास आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. त्यांनी अर्जासोबत ग्रामपंचायत निबंधक, ग्रा.पं.**अंबाडा** येथील जन्म/मृत्यू नोंदवही अनुपलब्धता प्रमाणपत्र व इतर अनुषंगीक पुरावे दाखल केले आहेत. तसेच ग्रामपंचायत कार्यालय **अंबाडा** येथे स्वतःचे जन्म दिनांक **१५.१२.१९७६** रोजीचे जन्माची नोंद घेण्याकरीता आदेश मिळण्याबाबत विनंती केली आहे.

त्याअर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेप वा हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत लेखी स्वरुपात आक्षेप वा हरकती दाखल कराव्या. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतीचा विचार करणत येणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि.२७.०५.२०२६

शिक्का

**स्वा/-**
**तहसीलदार, मोर्शी**



**तहसिलदार मोर्शी यांचे कार्यालय**

क्र. रामाक्र/२४४/एमआरसी-८१/अंबाडा/२०२५-२०२६

**जाहीरनामा**

या कार्यालयाचे ज्ञापनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **नय्यर सुलताना अब्दुल सईद**, रा.**अंबाडा**, ता.मोर्शी यांनी त्यांचे जन्माची नोंद ग्रामपंचायत **अंबाडा** ला करण्यास आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. त्यांनी अर्जासोबत ग्रामपंचायत निबंधक, ग्रा.पं.**अंबाडा** येथील जन्म/मृत्यू नोंदवही अनुपलब्धता प्रमाणपत्र व इतर अनुषंगीक पुरावे दाखल केले आहेत. तसेच ग्रामपंचायत कार्यालय **अंबाडा** येथे स्वतःचे जन्म दिनांक **२२.०९.१९७८** रोजीचे जन्माची नोंद घेण्याकरीता आदेश मिळण्याबाबत विनंती केली आहे.

त्याअर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेप वा हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत लेखी स्वरुपात आक्षेप वा हरकती दाखल कराव्या. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतीचा विचार करणत येणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि.२७.०५.२०२६

शिक्का

**स्वा/-**
**तहसीलदार, मोर्शी**



जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २६०**
**आर.एन.आय.रजी.नं.** 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# कोणार्कच्या कंपनीच्या कचरा वाहतूक गाड्यांवर जप्ती आणा



## प्रविण हरमकर यांची मनपा आयुक्तांकडे कारवाईची मागणी

**अमरावती/ का.प्र.**
शहरात बेकायदेशीरपणे व वैध कागदपत्रांशिवाय धावणाऱ्या कोणार्कच्या कंपनीच्या कचरा वाहतूक गाड्यांवर महानगर पालिकेने कोणार्क कंपनी सोबत झालेल्या करारानाम्यात नमूद असलेल्या अटी व शर्तीचे उल्लंघन होत असल्यामुळे गाड्यांची जप्ती व त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी माजी नगरसेवक प्रविण हरमकर यांनी महापालिका आयुक्त वर्षा लड्डा यांच्याकडे केली आहे.

महानगरपालिकेने कंत्राटी पद्धतीवर दिलेल्या कोणार्क कंपनीच्या घनकचरा वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या बहुतांश गाड्या मविमा, परमिट व फिटनेस प्रमाणपत्र या वैध कागदपत्रांशिवाय सर्रास शहरभर धावत आहेत. ही बाब अत्यंत धक्कादायक आहे. ज्या महानगरपालिकेने जनतेच्या सुरक्षेची जबाबदारी घ्यायची, त्याच पालिकेच्या कंत्राटदाराकडून मोटार वाहन कायदा, १९८८ ची उघड पायमल्ली होत आहे. या बेकायदेशीर गाड्यांमुळे कोणताही अपघात झाल्यास नागरिकांच्या जिवाची हमी कोण घेणार? विमा नसल्याने मृत व जखमी नुकसान भरपाई मिळणार नाही. हा मनपाचा निष्काळजीपणा असून शासनाच्या महसुलाचे सुध्दा कोटयवधींचे नुकसान होत आहे.कोणार्क कंपनीच्या सर्व कचरा वाहतूक गाड्यांची मनपा व तज्ञ यांच्या संयुक्त पथकामार्फत ४८ तासांत विशेष तपासणी मोहीम राबवावी.यातील दोषी मनपा अधिकारी/कर्मचाऱ्यांची तातडीने विभागीय चौकशी करून निलंबनासह कठोर कारवाई करावी.ज्या निविदा महानगर पालिकेने काढल्या होत्या त्यामध्ये अटी शर्ती वेगळे आहे निविदामध्ये २०२५ / २०२६ च्या गाड्या आवश्यक आहे. मनपा लोकांपासून साफसफाईच्या नावाने वर्षा गाठी रुपये ६०० कर वसूल करते पण साफसफाई मध्ये दिरंगाई आहे. महानगरपालिकेच्या आमसभेत कोणार्क कंपनीच्या विरोधात एक समिती तयार झाली होती त्या समितीच्या अहवालाचे काय झाले ?असा सवाल हरमकर यांनी निवेदनाव्दारे केला आहे.कारवाई न झाल्यास आंदोलन छेडण्यात येईल असा ईशारा प्रविण हरमकर यांच्यासह गोविंद दायमा,रामा सोळंके, रामावत, बाळा सावरकर, तायवाडे, चव्हाण,कमलेश गुप्ता, विनोद मेंडळकर,हेरे, श्रीकांत शर्मा,विनोद बामटकर, रुपेश आलेकर, संदीप मानेकर, प्रमोद वानखडे यांनी दिला आहे.

# रेल्वे उड्डाणपुलाच्या आराखडा संकल्पचित्राला मंजुरी

## १२५ कोटींच्या प्रकल्पाला वेग

**अमरावती / का.प्र.**
शहराची लाईफ लाईन मानल्या जाणाऱ्या राजकमल चौक ते रेल्वे स्टेशनदरम्यानच्या रेल्वे उड्डाणपुलाच्या कामाला अखेर गती मिळाली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने उड्डाणपुलाच्या आराखडा संकल्पचित्राला मंजुरी दिली असून आता अंतिम मंजुरीसाठी प्रस्ताव रेल्वे विभागाच्या मुख्य अभियंत्याकडे आहे.

भविष्यात आणखी चार ट्रॅकची सुविधा मुख्य उड्डाणपूल रेल्वे हद्दीत ७६ मीटर लांबीचा असणार आहे. राजकमल चौकाच्या बाजूला पाच गाळ्याचा ११४ मीटर लांबीचा पूल राहणार असून, रुक्मिणीनगर बाजूला दोन गाळ्याचा ५१.५ मीटर लांबीचा भाग उभारला जाणार आहे. विशेष म्हणजे, भविष्यात रेल्वेचे आणखी चार ट्रॅक टाकता येतील, अशा पद्धतीने या उड्डाणपुलाची रचना करण्यात आली आहे. याशिवाय, दोन्ही बाजू मिळून ४७० मीटर लांबीचे सर्व्हिस रोडदेखील तयार करण्यात येणार आहेत. त्यामुळे स्थानिक वाहतुकीलाही मोठा दिलासा मिळणार आहे. विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य मतदारसंघ निवडणुकीची आचारसंहिता संपताच बांधकामाची निविदा प्रक्रिया सुरू होणार असून, सुमारे दीड ते दोन वर्षात हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

जुलैअखेर निविदा प्रक्रिया अपेक्षित सद्या रेल्वेच्या मुंबईतील मुख्य अभियंतांकडून संकल्प चित्रास मंजुरी येणे बाकी आहे. अशातच आचारसंहितेमुळे सध्या निविदा प्रक्रिया थांबली आहे. तरी, जुलै अखेरपर्यंत निविदा प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता सार्वजनिक बांधकाम मंडळाच्या अधीक्षक अभियंता डॉ. आर. वाय. पाटील यांनी व्यक्त केली आहे. त्यानंतर प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात होईल.

१२५ कोटी रुपयांच्या निधीतून उभारण्यात येणाऱ्या या उड्डाणपुलासाठी शासनाने अर्थसंकल्पात तरतूदही केली आहे. शहरातील वाढती वाहतूक कोंडी लक्षात घेता हा प्रकल्प अमरावतीकरांसाठी मोठा दिलासा ठरणार आहे. उड्डाणपुलाचे आराखडा संकल्पचित्र (डिझाईन) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुंबई येथील संकल्पचित्र मंडळाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आले होते. या संकल्प चित्राला तेथील मुख्य अभियंत्यांनी हिरवी झेंडी दिली आहे. त्यामुळे आता केवळ रेल्वे प्रशासनाकडील अंतिम मंजुरी प्रक्रिया सुरू आहे. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, उड्डाणपुलाचे डिझाईन आधुनिक, मजबूत आणि भविष्यातील वाहतूक गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आले आहे.

# २८८ प्रकल्पांमध्ये केवळ ३४.७२ टक्के पाणीसाठा

**आगामी काळात पाणीटंचाईची शक्यता**

**अमरावती / का.प्र.**
विभागात गतवर्षी समाधानकारक पाऊस झाला. पाचही जिल्ह्यातील प्रकल्प ओव्हरफ्लो झाले. मात्र, या कालावधीत सिंचन आणि पाण्याचा अधिक पुरवठा यामुळे पाणीसाठा कमी होत गेला. यंदा त्यामध्ये आणखी भर पडली असून आज घडीला २८८ लहान, मध्यम, मोठ्या प्रकल्पांमध्ये केवळ ३४.७२ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. यावर्षी पावसाचे प्रमाण ही कमी असल्याचे हवामान खात्याने स्पष्ट केले आहे. त्यामुळे आगामी काळात पाणी टंचाई निर्माण होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

अमरावती जिल्ह्यासह विभागात गतवर्षीच्या तुलनेत यंदा उन्हाची तीव्रता वाढली आहे. अजूनही उष्णतेची लाट कायम आहे. विभागातील नऊ मोठ्या प्रकल्पात २७मेपर्यंतच्या अहवालानुसार सरासरी ३८.३२ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. त्याकारणाने यंदा पिण्याच्या पाण्याची चिंता मिटली असली तरी आगामी काळात पाणीटंचाईची झळ बसण्याची शक्यता आहे यंदा मान्सून केरळमध्ये पोहचायला उशीर लागणार आहे. त्या कारणाने



विदर्भातही १० जूननंतर पावसाचे आगमन होणार असल्याचा अंदाज हवामान तज्ञांनी वर्तविला आहे. सोमवारी, मंगळवारी अमरावती जिल्ह्यात अनेक ठिकाणी अवकाळी पावसाने हजेरी लावली. अमरावती शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या उर्ध्व वर्धा या मोठ्या प्रकल्पात ४६.३६ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. तसेच यवतमाळ जिल्ह्यातील ३ प्रकल्पात ३६.२८ टक्के, अकोला जिल्ह्यातील दोन मोठ्या प्रकल्पात ३६ टक्के, बुलडाणा जिल्ह्यातील ३ मोठ्या प्रकल्पात २३.८४ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. नऊ मोठ्या प्रकल्पांची प्रकल्पीय उपयुक्त पाणीसाठा हा १३९९.९१ दशलक्ष घनमीटर आहे. आजचा उपयुक्त पाणीसाठा ५३६.५० दशलक्ष घनमीटर आहे.

मोठ्या प्रकल्पाच्या तुलनेत २७मध्यम प्रकल्पांत सरासरी फक्त ३७.८४ टक्केच पाणीसाठा शिल्लक आहे. परंतु पावसाळा काही आठवड्यावर येऊन ठेपल्याने यंदा प्रकल्प पुन्हा शंभर टक्के भरतील, अशी अपेक्षा आहे.

गतवर्षी बहुतांश प्रकल्प शंभर टक्के भरले होते. त्याकारणाने प्रकल्पातून रब्बीला सिंचनाकरिता पाणी देता आले. २५२ लघु प्रकल्पांत मात्र २६.६९ टक्केच पाणीसाठा शिल्लक असून पाचही जिल्ह्यातील एकूण २८८ प्रकल्पांत सरासरी ३४.७२ टक्के पाणीसाठा शिल्लक असल्याची नोंद सिंचन विभागाने घेतली आहे.

# ३२ हजार ९०० शेतकऱ्यांना जमीन आरोग्य पत्रिका

**अमरावती/ का.प्र.**
शेती उत्पादन वाढीसोबतच जमिनीची सुपीकता टिकवून ठेवण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या मृद परीक्षण मोहिमेला जिल्ह्यात चांगला प्रतिसाद मिळत आहे. कृषी विभागामार्फत विविध योजनांअंतर्गत शेतजमिनींचे मृद नमुने तपासून ३२९०० शेतकऱ्यांना जमीन आरोग्य पत्रिका वाटप केले असून, सन २०२५-२६ मध्ये जिल्ह्यातील सर्व तालुक्यांनी निर्धारित लक्षांक पूर्ण केला आहे.

जिल्ह्यात सन २०२५-२६ साठी एकूण ४२ हजार ७५८ मृद नमुन्यांचे लक्षांक निश्चित करण्यात आले होते. विशेष म्हणजे कृषी विभागाने हे संपूर्ण लक्षांक पूर्ण करत तितक्याच तालुकानिहाय पाहता मोर्शी तालुक्यात सर्वाधिक ४ हजार ६४९ नमुन्यांचे परीक्षण करण्यात आले आहे. त्याखालोखाल नांदगाव खंडेश्वर येथे ३ हजार ९०५, चिखलदरा येथे ३ हजार ८७२, तिवसा येथे ३ हजार ६५५ तर चांदुर बाजार तालुक्यात ३ हजार ५६९ नमुन्यांची तपासणी करण्यात आली आहे. अमरावती, भातकुली, चांदुर रेल्वे, धामणगाव रेल्वे, मोर्शी, वरूड, तिवसा, अंजनगाव सुर्जी, दर्यापूर, चिखलदरा आणि धारणी या तालुक्यांत मोठ्या प्रमाणावर मृद नमुने नोंदविण्यात आले आहेत. दर्यापूर तालुक्यात सर्वाधिक ६५६ नमुने ऑनलाइन करण्यात आले असून भातकुलीमध्ये ५९१, चांदुर रेल्वेमध्ये ५७३ आणि नांदगाव खंडेश्वरमध्ये ५३४ नमुन्यांची ऑनलाइन नोंद झाली आहे.

नमुन्यांची तपासणी केली आहे. यामुळे हजारो शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीतील अन्नद्रव्यांची अचूक माहिती मिळाली असून, त्यानुसार खत व्यवस्थापन करणे शक्य होणार आहे. सन २०२६-२७ साठी जिल्ह्याला ४२ हजार ७५८ मृद नमुन्यांचे नवीन लक्षांक देण्यात आले असून, १४ मे रोजीपर्यंत ६ हजार १०२ मृद नमुने ऑनलाइन नोंद करण्यात आले आहेत. कृषी विभागाने गावपातळीवर मोहिमा राबवून शेतकऱ्यांकडून मातीचे नमुने संकलित करण्याचे काम सुरू ठेवले आहे.

# श्री गुरुदेव कला मंच सेवा मंडळ द्वारा गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**गुरुकुंज मोझरी** - गुरुदेव नगर येथील श्री गुरुदेव कलामंच सेवा मंडळ द्वारा दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ नुकताच गुरुकुंज आश्रम येथील सभागृहात संपन्न झाला.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी पोलीस निरीक्षक गोपाल उपाध्याय,प्रमुख मार्गदर्शक डॉ.दिंगाबर निंघोट, प्रमुख अतिथी म्हणून वाडेकर नॅशनल स्कुलचे संचालक डॉ. रघुनाथ वाडेकर, मनोज कडू प्राचार्य श्री गुरुदेव विद्या मंदिर, माधुरी नीमकर, पत्रकार हेमंत निखाडे इत्यादी उपस्थित होते.

यावेळी गुरुदेवनगर येथील श्री गुरुदेव विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, वाडेकर नॅशनल स्कूल आणि रावसाहेब ठाकूर विद्यानिकेतन मोझरी या तीनही शाळेतील १० वि व १२ वि तिल १५ गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

त्यामध्ये वर्ग १० वीचे विद्यार्थी श्रावणी सचिन चव्हाण, वाडेकर नॅशनल स्कूल टक्केवारी ९१%,तुषार किशोर मुंगले



९०%,सिद्धी स्वप्निल साबळे ८९% तर श्रीगुरुदेव विद्या मंदिर चे विद्यार्थी पुनम रवींद्र मोरे ९२%, कृष्णाई विजय धोटे ८८%, मनस्वी गजेंद्र कठाळे ८७% व रावसाहेब ठाकूर विद्यानिकेतन मोझरी चे विद्यार्थी ओम निलेश बालपांडे ८२% , उन्नती निलेश हगवणे ८०%,श्रावणी श्रीकृष्ण तिरमारे ७७%,श्री गुरुदेव विद्या मंदिर चे १२ वी सायन्स विद्यार्थी अनुष्का दिनेश हगवणे ८८% सृष्टी अविनाश तिखे ८२%कला शाखेमधून समीक्षा प्रभाकर जाधव ७२ टक्के चंचल इंगळे ६८ टक्के या विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेतून नेत्रदीप यश मिळवल्यामुळे त्यांचे प्रमुख पाहुण्यांचे हस्ते शाल ,पुष्पगुच्छ व पेढा भरवून सत्कार करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री गुरुदेव कलामंच सेवा मंडळाचे सचिव तथा गुरुदेवनगरचे माजी उपसरपंच किरण खंडारे यांनी केले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक गुरुदेव कला मंच चे अध्यक्ष दीपक तिखे यांनी केले.तर आभार प्रदर्शन कला मंच उपाध्यक्ष नरेंद्र कठाणे यांनी केले.श्री गुरुदेव कला मंच सेवा मंडळ दरवर्षी विविध सामाजिक कार्यक्रम राबवत असून त्यांचा कार्यक्रम यशस्वीपणे होत आहे. कार्यक्रम यशस्वीतेकरीता कोषाध्यक्ष महादेव बेले, गोपाल कसर,धनश्री खंडारे, दिनेश

## निर्मल कीडस चे बहूप्रतिक्षित उन्हाळी शिबीर २ जून पासून

**तिवसा** - दर्जेदार व संस्कारक्षम शिक्षणामुळे अल्पावधितच नावारूपाला आलेल्या तिवस्याच्या निर्मल कीडस् इंग्लिश स्कूलच्या बहूप्रतिक्षित 'उन्हाळी शिबीराला २ जूनपासून प्रारंभ होत आहे. २ ते १२ जूनपर्यंत सकाळी ९ ते १२ वाजेपर्यंत चालणार्या या उन्हाळी शिबीरामध्ये ३ ते ८ या वयोगटातील मुलामुलींना सहभागी होता येणार आहे. दहा दिवस चालणार्या या शिबीरामध्ये मुलांना योगा, प्राणायम, जलतरण, ॲबकस, संगीत, क्राफ्ट मेकींग, कुकींग, स्टेज परफॉरमन्स, फोनिक्स, मॅजिक शो, रंगोली मेकींग, मॅनर्स लर्निंग, कीडस् मूव्ही शो, क्रीकेट, बॅटमिंटन, आदीसह व्यक्तीमत्व विकासाबाबतचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे.सोबतच या शिबीरामध्ये बच्चे कंपनींची खाण्यापिण्याची चंगळ राहणार आहे.या उन्हाळी शिबीरामध्ये सहभागी होण्याकरिता पालकांनी ९५५२३५७४५७,७४९८२६३२४३,८८८८९२४४६९ या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन निर्मल कीडस् इंग्लिश स्कुलतर्फे करण्यात आले आहे.

**राष्ट्रीय खत विक्री आराखड्यांतर्गत**

# आयएफएमएस व ॲग्रीस्टॅक प्रणालीचे एकत्रीकरण

## खत विक्री प्रक्रियेत पारदर्शकता व सुलभता वाढणार, खतांच्या मागणीसाठी सोईचे ॲप उपलब्ध

**अमरावती/ का.प्र.**
केंद्र शासनाच्या राष्ट्रीय खत विक्री आराखडा प्रकल्पांतर्गत IFMS व AgriStack प्रणालीचे एकत्रीकरण करण्यात येत असून, खत विक्री प्रक्रियेमध्ये पारदर्शकता, सुलभता व शेतकरी हित साध्य करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. केंद्र शासनामार्फत 'Fertilizer Sale Application System (FSAS)' हे मोबाईल आधारित ॲप विकसित करण्यात आले आहे. या ॲपच्या माध्यमातून शेतकऱ्यांनी कोडद्वारे खतांचे ऑनलाईन बुकिंग करता येणार आहे. शेतकऱ्यांनी केलेले कोड आधारित बुकिंग तीन दिवसांसाठी वैध राहणार असून, संबंधित शेतकरी त्यांच्या सोयीनुसार निवडलेल्या खत विक्रेत्याकडे जाऊन खत खरेदी करू शकतील. अशी माहिती कृषी संचालक सुनील बोरकर यांनी एका पत्राद्वारे दिली आहे.



या प्रणालीमुळे शेतकऱ्यांना खत खरेदीसाठी रांगेत उभे राहण्याची आवश्यकता भासणार नाही. तसेच, आवश्यक त्या खतांचे आगाऊ बुकिंग करता येणार असल्याने दुकानदारांकडून इतर अनावश्यक खतांची सक्ती होण्याची शक्यता कमी होणार आहे. परिणामी, खत विक्री प्रक्रियेत अधिक सुलभता व पारदर्शकता निर्माण होणार आहे. सद्यस्थितीत विविध दुकानांमध्ये खतसाठा उपलब्ध आहे अथवा नाही, याबाबत शेतकऱ्यांना अचूक माहिती उपलब्ध होत नसल्याने त्यांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याचे निदर्शनास येत आहे. नव्या प्रणालीमुळे खत उपलब्धतेची माहिती वेळेवर मिळणार असल्याने शेतकऱ्यांचा वेळ व श्रम वाचण्यास मदत होणार आहे. या नव्या वितरण प्रणालीची केंद्र शासनाच्या तज्ञ पथकाने पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील अष्टापूर येथे यशस्वी चाचणी केली आहे. तसेच, राज्यातील कोल्हापूर व छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांची केंद्र शासनाने पथदर्शी प्रकल्पासाठी निवड केली असून, खरीप हंगामापासून 'Fertilizer Sale Application System' प्रणालीद्वारे खत विक्रीस प्रारंभ करण्यात येणार आहे.

या उपक्रमामुळे खत वितरण व्यवस्थेत तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर होऊन शेतकऱ्यांना अधिक पारदर्शक, सुलभ व वेळेवर सेवा उपलब्ध होण्यास मदत होणार असल्याचे कृषी आयुक्तालयाद्वारे कळविण्यात आले आहे.


# संक्षिप्त

## श्री संत गुलाबराव महाराजांच्या साहित्यावर संशोधन करण्याचे आवाहन

**अमरावती** - संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाद्वारे दानदाते श्री वासुदेवराव राजारामजी देशमुख यांच्याकडून प्राप्त झालेल्या दाननिधीमधून श्री संत गुलाबराव महाराजांचे जीवन, साहित्य, विचार, तत्वज्ञान, शिक्षण व कवितेवर विद्यापीठात आचार्य पदवीकरिता संशोधन करणाऱ्या एका संशोधकास प्रति वर्ष रू. ६०००/- याप्रमाणे दोन वर्ष एकुण रू. १२,०००/- संशोधन आर्थिक सहाय्य प्रदान करण्यात ये [illegible] सहाय्य एका संशोधकास प्रदान करावयाचे आहे. विद्यापीठात संशोधन करणाऱ्या संशोधकांनी विहित नमुन्यात आवेदनपत्रे दि. ३० जून, २०२६ पर्यंत सादर करावयाची आहे. आवेदनपत्राचा विहित नमुना व इतर तपशील विद्यापीठाच्या वित्त विभागात नि:शुल्क उपलब्ध असून सदर आर्थिक सहाय्याचा संशोधकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे यांनी केले आहे. अधिक माहितीकरिता त्यांचेशी प्रत्यक्ष अथवा दुरध्वनी क्र. ९८८१४६५५६७ यावर संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

## आज पंचवटी चौकात भव्य सामुदायिक प्रार्थना

**अमरावती-** ग्रामजयंती पर्वा निमित्त विश्वशांतीकरिता भव्य सामुदायिक प्रार्थनेचे आयोजन ३० मे रोजी सायंकाळी ६.३० वाजता पंचवटी चौक येथील भाऊसाहेब उर्फ डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या स्मारकाजवळ सामुदायिक प्रार्थना आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.सामुदायिक प्रार्थनेमुळे आध्यात्मिक, सामाजिक आणि राष्ट्रीयतेची दिव्य अनुभूती मिळते.मानवतेचे महान पुजारी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी मानवतेच्या कल्याणासाठी आणि विश्वशांतीच्या स्थापनेसाठी सामुदायिक प्रार्थनेचा विचार समाजासमोर ठेवला. ही प्रार्थना केवळ धार्मिक विधी नसून मानवतेला एकत्र आणणारी, माणसाच्या अंतःकरणाला स्पर्श करणारी आणि समाजात प्रेम, शांतता व बंधुभाव निर्माण करणारी उपासना आहे. या सामुदायिक प्रार्थनेमध्ये ७० च्या वर सामाजिक संस्था, गुरुदेव सेवा मंडळ सहभागी होणार आहे. सायंकाळी ६ वाजता प्रार्थना स्थळी नोंदणी होईल, त्यानंतर खंजिरी भजन, सामुदायिक व भाषण तसेच राष्ट्रवंदना व समारोप होईल.प्रार्थनेतील सामाजिक स्वरूप हे आज समाजात जात, धर्म, पंथ, भाषा, प्रांत आणि विचार यांच्या नावावर भिंती निर्माण होत आहेत. माणूस माणसापासून दूर जात आहे. अशा परिस्थितीत सामुदायिक प्रार्थना समाजाला एकत्र आणण्याचे कार्य करीत असून या भव्य सामुदायिक प्रार्थनेमध्ये नागरिकांनी, गुरुदेव भक्तांनी, सामाजिक संस्थांनी सहभागी होण्याचे आवाहन सेवासामर्थ्य बहुउद्देशीय संस्था अंतर्गत युगप्रभात फाउंडेशन अमरावती च्या वतीने करण्यात आले आहे.



## तीव्र उष्णतेमुळे आंबिया बहार संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान

**कुऱ्हा** - मागील दहा दिवसांपासून झाले आहे. तीव्र उष्णतेमुळे संत्रा बागांमधील फळगळ वाढली असून अनेक झाडे करपण्याच्या स्थितीत आली आहेत. त्यामुळे संत्रा उत्पादक शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत.तिवसा तालुक्यासह परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी मोठ्या मेहनतीने व खर्च करून संत्रा बागांचे संगोपन केले होते. मात्र सततच्या उष्णतेमुळे उत्पादनावर गंभीर परिणाम झाला असून शेतकऱ्यांच्या आशा मावळल्या आहेत. विशेषतः आंबिया बहार संत्रा पिकाला सर्वाधिक फटका बसल्याने मोठे आर्थिक नुकसान झाल्याचे चित्र आहे.यासंदर्भात संत्रा उत्पादक शेतकऱ्यांची शासनाकडे तातडीची मदत जाहीर करण्याची मागणी केली आहे. त्यांनी सांगितले की, 'संत्रा उत्पादक शेतकरी आधीच आर्थिक अडचणीत असून नैसर्गिक संकटामुळे त्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शासनाने तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रति हेक्टर किमान एक लाख रुपयांची मदत द्यावी. तसेच कृषी विभागाने प्रत्यक्ष शेतात जाऊन परिस्थितीची पाहणी करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावाविदर्भातील संत्रा हे केवळ पीक नसून हजारो कुटुंबांचा उदरनिर्वाहाचा आधार आहे. त्यामुळे शासनाने या गंभीर परिस्थितीकडे संवेदनशीलतेने पाहून तातडीने आर्थिक मदत जाहीर करावी.तिवसा तालुक्यातील शेतकरी वर्गातूनही शासनाने त्वरित मदत करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

## स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती साजरी

**अमरावती** - स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती निमित्य हारार्पण



कार्यक्रम अमरावती महानगरपालिकेत संपन्न झाला. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंती निमित्य महापौर श्रीचंद तेजवानी यांचे हस्ते स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे प्रतिमेस हारार्पण विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे करण्यात आले.यावेळी अभिनेता सर्जेराव गलपट यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यावर आधारित गीत सादरीकरण केले.

यावेळी महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा, स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, झोन सभापती स्वाती कुलकर्णी, नगरसेवक मिलींद बांबल, संजय तिरथकर, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त नरेंद्र वानखडे, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, प्रमोद मोहोड, गणेश काकडे, भुषण खडेकार, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या वेशभुषेत सर्जेराव गलपट उपस्थित होते.

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण

**अमरावती** - संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या उद्यान विभागातर्फे जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून दि. ५ जून, २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता विद्यापीठाच्या मुख्य रस्त्यापासून परीक्षा विभागाच्या उत्तरपत्रिका भांडार कडे जाणाऱ्या नवीन रस्त्याच्या दुतर्फा जागेत विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे यांचे हस्ते वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न होणार आहे.

याप्रसंगी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे तसेच विद्यापीठातील सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी हे प्रामुख्याने उपस्थित राहणार आहे.तरी वृक्षारोपण कार्यक्रमाला जास्तीतजास्त संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन कार्यकारी अभियंता शशिकांत रोडे व उद्यान अधीक्षक भिमराव वाठोरे यांनी विद्यापीठाच्यावतीने केले आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय


# स्फोटकांच्या सावटाखाली प्रशासनाचा 'सायलेंट मोड'?

## सीमावर्ती सातपुड्यातील संशयास्पद हालचालींनी सुरक्षा व्यवस्थेलाच प्रश्न

**अकोला :** गाजीपूर–रुदाळी खाण पट्ट्यात कथितरीत्या सुरू असलेल्या स्फोटकांच्या संशयास्पद वापराच्या प्रकरणाने आता केवळ अवैध गौण खनिज उत्खननाचा मुद्दा आेलांडला असून, तो थेट राज्याच्या अंतर्गत सुरक्षा, सीमावर्ती नियंत्रण यंत्रणा आणि स्फोटक व्यवस्थापनाच्या विश्वसनीयतेशी संबंधित गंभीर विषय बनला आहे. विशेष म्हणजे या प्रकरणात विविध स्तरांवर प्रश्न उपस्थित होत असताना प्रशासनाकडून अद्याप कोणतीही संयुक्त चौकशी, अधिकृत निवेदन किंवा तपासाची स्पष्ट भूमिका समोर आलेली नाही. त्यामुळे स्थानिकांमध्ये संशय आणखी गडद होत चालला आहे.




सातपुड्याच्या डोंगररांगांमध्ये मानीव संवेदनशील परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या उत्खननासाठी प्रचंड प्रमाणात ब्लास्टिंग झाल्याची चर्चा स्थानिक स्तरावर सातत्याने होत आली आहे. मात्र, प्रत्यक्षात किती स्फोटके वापरण्यात आली, ती कुठून आणली गेली, कोणत्या परवानाधारक एजन्सीकडून खरेदी झाली, वापराची नोंद कुठे आहे आणि वापरानंतरचा हिशेब कोणत्या यंत्रणेकडे सादर करण्यात आला, या मूलभूत प्रश्नांची अधिकृत उत्तरे अद्याप उपलब्ध नाहीत.

खानिकर्म विभागाकडे उत्खननाचा तपशील असतो, महसूल विभागाकडे जमीन आणि परवानग्यांची माहिती असते, तर पोलिस प्रशासनाकडे स्फोटक वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्याचे अधिकार असतात. याशिवाय सीमावर्ती भागात संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्याची जबाबदारी खुफिया यंत्रणांवर असते. अशा परिस्थितीत अनेक वर्षे सुरू असलेल्या कथित ब्लास्टिंगकडे कोणत्याही यंत्रणेचे लक्ष गेले नाही, हे मान्य करणे कठीण असल्याची प्रतिक्रिया स्थानिकांमधून व्यक्त होत आहे.

विशेष म्हणजे या भागात उत्खननासाठी वापरण्यात येणारे खडक अत्यंत कठीण स्वरूपाचे असल्याने मोठ्या प्रमाणावर ब्लास्टिंगशिवाय उत्खनन शक्य नसल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. अशावेळी लाखो ब्रास गौण खनिज बाहेर पडत असताना अधिकृत स्फोटक वापराची नोंद अत्यल्प कशी राहिली? हा प्रश्न आता संपूर्ण प्रकरणाच्या केंद्रस्थानी आला आहे.

स्थानिक पातळीवर सुरू असलेल्या चर्चेनुसार, मध्यप्रदेशातून धारणी जंगलमार्गे रात्रीच्या वेळी जिलेटीन आणि डिटोनेटरचा कथित पुरवठा होत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. सीमावर्ती जंगलमार्ग, दुर्गम डोंगररांगा आणि कमी तपासणी असलेले मार्ग यांचा वापर करून ही वाहतूक होत असल्याची चर्चा असून, या सर्व प्रकारामागे संघटित आर्थिक साखळी कार्यरत असू शकते, अशीही शक्यता व्यक्त होत आहे. या चर्चांमध्ये किती तथ्य आहे, हे अधिकृत तपासातूनच स्पष्ट होऊ शकते; मात्र प्रशासनाच्या शांत भूमिकेमुळे संशयाला अधिक खतपाणी मिळत असल्याचे बोलले जात आहे.

या प्रकरणातील आणखी गंभीर बाब म्हणजे कथितरीत्या काही व्यवहारांमध्ये ब्लास्टिंगसंदर्भातील बिले आणि जीएसटी व्यवहारांचा वापर केवळ कागदोपत्री वैधता दाखवण्यासाठी करण्यात आल्याचा संशय. जर एखाद्या व्यक्तीकडे अधिकृत खाण नसेल, तर त्याच्या नावावर घेतलेली स्फोटके वापरली कुठे गेली? ती इतर खाणींमध्ये वापरली गेली का? किंवा स्फोटक पुरवठ्याचे वेगळे जाळे कार्यरत होते का?

या प्रश्नांमुळे आर्थिक व्यवहार आणि स्फोटक पुरवठा यांच्यातील संबंध तपासण्याची मागणी अधिक तीव्र झाली आहे.

या संपूर्ण प्रकरणामुळे सातपुड्यातील खाण व्यवसायावर नियंत्रण ठेवणाऱ्या यंत्रणांच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. केवळ महसूल वसुली आणि कागदोपत्री परवानग्यांच्या पलीकडे जाऊन प्रत्यक्ष क्षेत्रीय पडताळणी झाली का? अवैध उत्खनन, अतिरिक्त ब्लास्टिंग आणि स्फोटक पुरवठा यांचा परस्पर संबंध तपासण्यात आला का? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, जर संशयास्पद हालचाली सुरू होत्या, तर त्या रोखण्यात प्रशासन अपयशी का ठरले? या प्रश्नांची उत्तरे शोधल्याशिवाय संपूर्ण प्रकरणावरील धुकं दूर होणार नाही, अशी भावना आता सातपुड्याच्या पायथ्याशी तीव्र होत आहे.

### स्फोटक मॅगझिन की सातपुड्याच्या उंबरठ्यावरचा 'जिवंत बॉम्ब' ?

गाजीपूर–रुदाळी परिसरातील स्फोटक मॅगझिनमुळे स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मानवी वस्ती, खाणी आणि वनक्षेत्राच्या जवळ मोठ्या प्रमाणावर स्फोटके साठवली जात असल्याची चर्चा असून, भविष्यात एखादी दुर्घटना घडल्यास त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात, अशी भीती व्यक्त केली जात आहे. स्थानिकांच्या मते, सततच्या ब्लास्टिंगच्या पार्श्वभूमीवर या मॅगझिनची सुरक्षा व्यवस्था, साठवण क्षमता, परवानग्या आणि आपत्कालीन उपाययोजनांची स्वतंत्र चौकशी होणे आवश्यक आहे. पेट्रोलियम अँड एक्स्प्लोसिव्ह सेफ्टी ऑर्गनायझेशन (PESO) चे सुरक्षा निकष प्रत्यक्षात पाळले जात आहेत का, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. 'सातपुड्याच्या पायथ्याशी उभे असलेले हे मॅगझिन म्हणजे जणू 'जिवंत बॉम्ब'च,' अशी संतप्त प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

### संयुक्त 'मल्टी-एजन्सी' तपासाची मागणी जोरात-

स्थानिक नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि काही जाणकारांकडून आता या संपूर्ण प्रकरणाची संयुक्त उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी पुढे येत आहे. खनिकर्म विभाग, महसूल प्रशासन, पोलिस, राज्य गुप्तचर विभाग, जीएसटी विभाग, वन विभाग तसेच पेट्रोलियम अँड एक्स्प्लोसिव्ह सेफ्टी ऑर्गनायझेशन (PESO) यांच्या संयुक्त पथकाने प्रत्यक्ष पाहणी करून उत्खननाचे प्रमाण, स्फोटक वापर, वाहतूक मार्ग, आर्थिक व्यवहार, साठवणूक व्यवस्था आणि परवानग्यांची वैधता तपासावी, अशी मागणी होत आहे. विशेष म्हणजे, या प्रकरणातील संशय केवळ अवैध खाणकामापुरता मर्यादित नसून, सीमावर्ती भागातील स्फोटक नियंत्रण व्यवस्थेतील संभाव्य त्रुटींशी संबंधित असल्याने राज्य शासनानेही याकडे गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता व्यक्त केली जात आहे.

# विधान परिषदेसाठी प्रवीण पोटे भाजपाचे उमेदवार



## पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत आज दाखल करणार नामांकन

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील विधान परिषद आमदारकीसाठी १८ जून रोजी मतदान होणार आहे. भारतीय जनता पार्टी ने तिसऱ्यांदा माजी राज्यमंत्री प्रवीण पोटे यांना उमेदवारी दिलेली आहे.पोटे या निवडणुकीच्या माध्यमातून हॅट्रिक करण्यास तयार आहेत. प्रवीण पोटे आज शुक्रवार २९ मे रोजी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहे. पालकमंत्री बावनकुळे हे भाजपाचा अधिकृत बी फार्म प्रवीण पोटे यांना देणार आहे. यापूर्वी शहरातील जनसंपर्क कार्यालयात भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ती यांची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे. बैठकीनंतर मोठ्या रॅलीच्या माध्यमातून भाजपाचे शक्ती प्रदर्शन होणार असून पोटे आपला अर्ज दाखल करतील. या दरम्यान भाजपा- पदाधिकारा,लोकप्रतिनिधी ☞(पान २ वर)

## राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा धक्का

# परतवाडा शहराध्यक्ष रिंकू शुक्ला यांचा राजीनामा

**अचलपूर/प्रतिनिधीः-** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला परतवाडा शहरात मोठा राजकीय धक्का बसला असून, पक्षाचे शहराध्यक्ष अभिषेक उर्फ रिंकू शुक्ला यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांच्या राजीनाम्यामुळे पक्षाच्या स्थानिक संघटनात्मक बांधणीवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे.



दिनांक २८ मे रोजी जिल्हाध्यक्ष संतोष महात्मे यांच्याकडे सादर केलेल्या राजीनामा पत्रात अभिषेक उर्फ रिंकू शुक्ला यांनी पक्षाने आजपर्यंत दिलेल्या जबाबदाऱ्यांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे. पक्षाने विश्वास दाखवून संघटनेत विविध पदांवर काम करण्याची संधी ☞(पान २ वर)

# अमरावतीत युवक काँग्रेसचे वाढत्या महागाईविरोधात आंदोलन



**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा युवक काँग्रेसच्या वतीने वाढती महागाई, पेट्रोल-डिझेल दरवाढ तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडियावर 'मेलोडी' रील काढून देशवासीयांची केलेली टिंगल याच्या निषेधार्थ आज पेट्रोल पंपावर प्रतीकात्मक आंदोलन करण्यात आले. यावेळी नागरिकांना 'मेलोडी' वाटप करून केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात निषेध व्यक्त करण्यात आला.

सदर आंदोलन महाराष्ट्र युवक काँग्रेसचे प्रभारी अजय छिकारा, सहप्रभारी नवज्योत संधू तथा प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे यांच्या नेतृत्वात पार पडले.

यावेळी प्रदेश उपाध्यक्ष अनुराग भोयर, अमरावती जिल्हा युवक काँग्रेस अध्यक्ष राहुल येवले, कार्याध्यक्ष अनिकेत ढेंगले, प्रदेश महासचिव अक्षय हेटे, सहप्रभारी अफजल बेरा, परीक्षित जगताप, रितेश पांडव, उत्कर्ष देशमुख, नितेश वानखडे, निलेश गुहे, सागर कलाने, माजी नगराध्यक्ष वैभव वानखडे, विधानसभा ☞(पान २ वर)

# महर्षी पब्लिक स्कूलमधील चोरी उघड; आरोपी गजाआड

## ४६ हजारांचा मुद्देमाल जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** महर्षी पब्लिक स्कूलमधून लॅपटॉप व इतर साहित्य चोरी करणाऱ्या आरोपीला गाडगे नगर पोलिसांच्या डीबी पथकाने अटक केली असून त्याच्याकडून सुमारे ४६ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, महर्षी पब्लिक स्कूलच्या उपप्राचार्या शिल्पा कृष्णराव चन्ने (वय ४९) यांनी गाडगेनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. शाळेतील एका रूममधून ☞(पान २ वर)

# रहाटगांव येथे होणार ५० खाटांचे जिल्हास्तरीय आयुष रुग्णालय

## आ.सुलभा खोडके यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती जिल्ह्यातील गरजू व सर्वसामान्य घटकातील रुग्णांना आरोग्य संजीवनी मिळावी म्हणून आरोग्य सेवांना अधिक बळकटी व विस्तार करण्याला घेऊन आ. सुलभा संजय खोडके यांची सातत्यपूर्ण प्रयत्नांची मालिका सुरु आहे. शहरातील जिल्हा सामान्य रुग्णालय, जिल्हा स्त्री रुग्णालय, सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे अत्याधुनिक प्रगत व सक्षम अशी आरोग्य यंत्रणा उभी झाली असतांना आता त्यामध्ये नवीन जिल्हा शासकीय आयुष रुग्णालयाची भर पडणार आहे. आमदार सुलभा खोडके यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे अमरावती येथे ५० खाटांच्या जिल्हास्तरीय आयुष रुग्णालयासाठी मौजा रहाटगांव येथील शेत सर्व्हे नं. १२१ एकुण क्षेत्र ९.५६ हे. आर पैकी १.२१ हे. आर जागा मंजूर करण्यात आली आहे.



केंद्र शासनामार्फत आयुष मंत्रालय कक्ष स्थापन करण्यात आले असुन त्याअनुषंगाने जिल्हास्तरावरील ग्रामीण भागात आयुर्वेदिक दवाखाने सुरु करण्यात आले आहेत. परंतु जिल्हास्तरावर आयुष रुग्णालयाची इमारत उपलब्ध नाही. त्यामुळे गरीब घटकांबरोबरच ग्रामीण व दुर्गम-अतिदुर्गम भागातील लोकांना आयुर्वेद चिकित्सा पद्धतीतून चांगली आरोग्य सेवा मिळावी, यासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत ☞(पान २ वर)

# नांदगावात भोगवटाधारक नियमानुकूल मेळावा उत्साहात



**नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः-** राज्य सरकारने २०११ पूर्वीच्या अतिक्रमणधारक व भोगवटा धारक नागरिकांचे अतिक्रमण नियमानुकूल करण्याचा निर्णय घेतला असून त्या अनुषंगाने नांदगाव खंडेश्वर येथे नगरपंचायतीच्या क्षेत्रातील भोगवटा धारक नागरिकांची जागा नियमानुकुल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. या संदर्भात पाणीपुरवठा सभापती वासुदेव लोखंडे यांच्या पुढाकाराने मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यात प्रभाग क्रमांक एक मधील ७० भोगवटा धारक ☞(पान २ वर)

# मुऱ्हा देवी येथील मिनी बँकेत लाखो रुपयांचा अपहार

## बँक हात झटकत असल्याने खातेदारात घबराट

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** ग्रामीण भागातील नागरिकांना बँकिंग सेवा सुलभ व्हावी आणि मुख्य बँकांवरील ताण कमी व्हावा, या उद्देशाने राष्ट्रीयकृत बँकांनी मिनी बँक मॉडेल सुरू केले. मात्र, अंजनगाव तालुक्यातील मुऱ्हा देवी येथे मिनी बँक संचालकाने खातेदारांच्या पैशांचा अपहार केल्याची घटना उघडकीस आल्याने खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, ज्या बँकेचा लोगो बघून नागरिकांनी विश्वास ठेवला, ती सेंट्रल बँक ऑफ इंडिया (शाखा अंजनगाव सुर्जी) आता आपली जबाबदारी झटकत असल्याने गुंतवणूकदारांमध्ये भीतीचे वातावरण आहे.



मुऱ्हा देवी येथील मिनी बँक केंद्रावर गावातील शेतकरी, कष्टकरी आणि महिलांनी आपल्या कष्टाची कमाई जमा केली होती. राष्ट्रीयकृत बँकेचा अधिकृत लोगो आणि बँकेशी संलग्नता असल्याने नागरिकांनी या केंद्रावर डोळे झाकून विश्वास ठेवला. मात्र, मिनी बँक संचालकाने खातेदारांच्या रकमेत अफरातफर केल्याचे समोर आले आहे. जेव्हा खातेदार आपले पैसे काढण्यासाठी ग ☞(पान २ वर)

# तारांगण नगर बगीच्यात ज्येष्ठ नागरिक व महिलांसाठी शेडसह वाटिका द्या

## नागरिकांचे खा.बळवंत वानखडे यांना निवेदन

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती शहरातील तारांगण नगरमधिल माजी प्राचार्य दिलीपसिंह खांबरे यांचे निवासस्थानी अमरावती जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार बळवंतराव वानखडे यांनी सदिच्छा भेट दिली. खासदार झाल्यानंतर ही पहिलीच सदिच्छा भेट असल्याने खांबरे परिवार व तारांगण नगर मधिल प्रतिष्ठित नागरिकांनी बळवंतराव वानखडे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य दिलीपसिंह खांबरे,शांताबाई खांबरे, आश्विनी व भाग्यश्री खांबरे, अर्चना बेलसरे , वैशाली आमले, कल्पना भुस्कडे, प्रकाश देशमुख, गुरूदत्त बेलसरे, प्रभाकर भुस्कडे, अमर भाकरे, अरविंद विंचुरकर तसेच संत गाडगेबाबा ज्येष्ठ नागरिक मंडळाचे वतीने अध्यक्ष पुरूषोत्तम गावंडे, उपाध्यक्ष दामोदर पवार, कोषाध्यक्ष धनराज ☞(पान २ वर)



# वादळासह अवकाळी पावसाचा महावितरणला फटका

## ११ व ३३ केव्ही वाहिन्यांचे पोल पडले, अनेक भागांचा वीजपुरवठा खंडित

## -शेकडो कर्मचाऱ्यांचे युद्धपातळीवर दुरुस्ती कार्य सुरू

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती शहरासह ग्रामीण भागात गुरुवारी (दि.२८) दुपारनंतर आलेल्या वादळ, गारपीट आणि अवकाळी पावसामुळे महावितरणच्या वीज यंत्रणेला मोठा फटका बसला असून अनेक ठिकाणी वीज खांब कोसळल्याने तसेच वीज वाहिन्या तुटल्याने वीजपुरवठा खंडित झाला आहे. विशेषतः भातकुली तालुक्यात सर्वाधिक नुकसान झाले आहे. महावितरणचे युध्द पातळीवर दुरूस्ती कार्य सुरू असून या काळात वीज ग्राहकांनी सहकार्य करण्याचे आवाहन कार्यकारी अभियंता प्रफुल्ल लांडे यांनी केले आहे.

गारा आणि वादळाच्या तडाख्यामुळे लघुदाब वाहिन्यांसह ११ केव्ही व ३३ केव्ही वीजवाहिन्यांचे खांब पडल्याने वलगाव, टाकरखेडा संभू, खार तळेगाव, भातकुली तसेच बडनेरा परिसरातील अनेक गावांचा वीजपुरवठा विस्कळीत झाला आहे. काही ठिकाणी वीजवाहिन्या तुटल्याने सुरक्षेच्या कारणास्तव वीजपुरवठा बंद ठेवण्यात आला आहे.

महावितरणच्या प्राथमिक माहितीनुसार, ३३ केव्ही अकोली फिडरसह ११ केव्ही सायत, ☞(पान २ वर)

# चांगापूर परिसरातील कार्यालयामध्ये चोरी, २.४४ लाखांची रोख लंपास

## सीसीटीव्हीची वायर कापून चोरट्यांचा डाव

**अमरावती/प्रतिनिधीः-** गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील चांगापूर फाटा परिसरात एका कार्यालयातून तब्बल २ लाख ४४ हजार ९०७ रुपयांची रोकड चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. विशेष म्हणजे, चोरी करण्यापूर्वी चोरट्यांनी कार्यालयातील सीसीटीव्ही कॅमेऱ्याची वायर कापून पुरावे नष्ट करण्याचाही प्रयत्न केला. या प्रकरणी शेख समीर शेख जब्बार (वय ३०, रा. राहुल नगर, अमरावती) यांच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, शेख समीर हे चांगापूर फाटा येथील माऊली मंगल कार्यालयाजवळील एका कार्यालयात कार्यरत आहेत. बुधवारी (दि.२७) रोजी त्यांच्या सहकारी पंकज यांनी ☞(पान २ वर)

# पैसे दुप्पट करण्याचे आमिष, १९.५० लाखांने गंडविले

## हरी ओम मल्टी कंपनीच्या नावाखाली महिलेची आर्थिक लूट

**अमरावती/प्रतिनिधीः-** अल्पावधीत पैसे दुप्पट करून देण्याचे आमिष दाखवत एका महिलेची तब्बल १९.५० लाख रुपयांची फसवणूक केल्याचा गंभीर प्रकार गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आला आहे. महिलेच्या लेखी तक्रारीवरून पोलिसांनी चार आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला नवसारी परिसरातील अंजू कॉलनी येथील रहिवासी आहे. आरोपी प्रमोद लकडे, मिलिंद वाघपंजन, संतोष तुषार आणि राज महेंद्र ढाले यांनी संगनमत करून तिला हरी ओम मल्टी ☞(पान २ वर)